संपादकीय

अमर चित्रकथा

'अमर चित्रकथा' द्वारे अनंत पै यांनी भारतीय कथानके आणि भारतीय वीरनायक यांना चित्रकथांच्या माध्यमातून आकर्षकपणे पेश केले; आणि इंग्लिश कॉमिक्सनाही उत्तम पर्याय आहे हे इंग्लिशमधून शिकणाऱ्या भारतीय मुलांना दाखवून दिले. परदेशी कॉमिक्सच्या तोडीची चित्रे आणि निर्मिती करून'भारताचा सांस्कृतिक ठेवा अनंत पै यांनी मुलांसाठी खुला केला. नुसता मजकूर वाचायचा नवशिक्षित मुलांना कंटाळा येतो. चित्रांसोबत थोडा मजकूर असला की मुले तो सहजपणे वाचण्यास प्रवृत्त होतात. पालकही मुलांना चित्रे दाखवून बरोबरची वाक्ये वाचून दाखवू शकतात.

'हस्तिनापूरचा राजा शंतनू शिकारीसाठी नदीकाठी गेला', 'त्याला एक सुंदर मुलगी दिसली; तिला त्याने विचारले, ''तू माझी राणी होशील का?'', तिने म्हटले, ''होईन मी तुमची राणी; पण माझ्या दोन अटी आहेत. एक-मी कोण हे मला तुम्ही कधी विचारायचे नाही.; आणि दोन मला कधी कटू बोलायचे नाही.''

शंतनू राजा म्हणाला, ''ठीक आहे.'' मग त्या दोघांनी लग्न केले...

या प्रत्येक वाक्याला चित्राची जोड मिळाल्याने मुलांना दृश्य व श्राव्य या दोन्ही माध्यमांतून कथा उमगत जाते. त्यांचे लक्ष कथेवर केंद्रित होते. त्यामुळे मुलांना शालेय वयात चित्रकथांचे मोठे आकर्षण वाटते. इंग्रजीत अनेक चित्रमालिका वर्षानुवर्षे नवनव्या कथानकांनिशी प्रसिद्ध होत असून त्यांनी पिढ्यानुपिढ्या बालमनावर प्रभाव गाजवलेला आहे. डोनाल्ड डक, मिकी माऊस सारख्या व्यक्तिरेखा या तेथील मुलांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेल्या आहेत. वाचनाची गोडी लावण्यास कॉमिक्सचा सर्वात जास्त उपयोग होऊ शकतो.

मुलांसाठी प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकात कमीजास्त चित्रे असतात; पण 'चित्रकथां'मध्ये चित्रांनाच प्राधान्य असते. इंग्रजीत पिक्चर बुक्स आणि कॉमिक्स यात फरक केला जातो. 'कार्टून्स' व कार्टून फिल्म्स हा पुन्हा वेगळा प्रकार ठरतो. अनंत पै यांनी चित्रकथा हा शब्द कॉमिक्स बुक्स या अर्थाने आरंभापासूनच वापरल्याने त्याबाबत गोंधळ होण्याचे कारण नाही.

कॉमिक्स ही मुलामुलींच्या भाषिक, बौद्धिक, भावात्मक व ज्ञानात्मक विकासात मोलाची कामगिरी बजावतात, याबद्दल सर्वजणांची खात्री पटलेली आहे. जेव्हा पालक आपल्या चार पाच वर्षांच्या मुलांना या चित्रकथांतील चित्रे दाखवून कथा सांगतात, तेव्हा मुले त्यात विशेष रंगून जातात आणि पुस्तके हाताळण्याची त्यांना सहजपणे सवय लागते असा अनुभव आहे. चित्रकथांतील चित्रांद्वारे मुलांची रंगरूपाबद्दलची जाणीवही समृद्ध होते. त्यांची कल्पनाशक्ती वाढीला लागते.

व्यक्तिव्यक्तीमधील फरक त्यांना ओळखता येतो. प्राण्यांबद्दलही माहिती झाल्याने त्यांच्याविषयीची आत्मीयता वाढते. मासिकाच्या रूपात कॉमिक्स वर्षानुवर्षे त्यामुळेच प्रसिद्ध होत आली आहेत आणि वृत्तपत्रे-साप्ताहिके यातूनही चित्रकथा देण्याचा परिपाठ सर्वत्र रुजला आहे. कॉमिक्सच्या माध्यमातून इंग्रजीत ऐतिहासिक कथा, क्लासिक्स, चरित्रे, साहसकथा, प्राणीकथा, विज्ञानकथा, हास्यकथा, नावाजलेल्या कथाकादंबऱ्या मुलांसाठी उपलब्ध आहेत. त्यातून एक प्रकारे विश्वसाहित्याचा व मुलांचा बालपणापासूनच संबंध दृढ होत जातो. 'पिक्चर बुक्स' सारखे कॉमिक्सना वाङमयीन व कलात्मक मोल दिले जात नाही. परंतु त्यांची मुलांमधील लोकप्रियता वादातीत राहिली आहे.

भारतीय कथा, वीरनायक, महाकाव्ये, यांना प्राधान्य दिल्याने आपल्या मुलांना भारतीय संस्कृतीची ओळख करून देण्याच्या दृष्टीने अमरचित्रकथांनी मोलाची कामगिरी बजावली आहे. अमर चित्रकथा या गेली तीस वर्षे इंग्रजी, हिंदी वगैरे भाषांतून नियमितपणे प्रसिद्ध होत आहेत. मराठीतही काही काळ त्यांचे प्रकाशन होत होते. परंतु ते नंतर स्थगित झाले होते. मेहता पब्लिशिंग हाऊसने संपादक अनंत पै आणि आणि वितरक इंडिया बुक हाऊस यांच्याकडून मराठीत अमरचित्रकथांची पुस्तके प्रसिद्ध करण्याचे हक्क मिळवले असून, आठ पुस्तकांचा पहिला संच हा नुकताच बाजारात आणला आहे.

भीष्म (लेखन-कमला चंद्रकांत, चित्रांकन- पेडणेकर), अभिमन्यू (चित्रांकन- प्रताप मुळीक), सम्राट अशोक (शब्दांकन- मीना तालीब, चित्रांकन- राम वाईरकर) राजा हरिश्चंद्र (प्रदीप पाल. चित्रांकन- प्रताप मुळीक) विक्रमादित्य (आनंद प्रकाश. चित्रांकन- हरिश्चंद्र चव्हाण), पृथ्वीराज चौहान (यज्ञ शर्मा, चित्रांकन-प्रभाशंकर कवडी), राणा प्रताप (यज्ञ शर्मा, चित्रांकन - प्रताप मुळीक) छत्रपती शिवाजी (भा. रा. भागवत, चित्रांकन- मुळीक) यांचा या संचात समावेश आहे. उत्तम चाररंगी छपाई असल्याने या चित्रकथांची वाचनीयता वाढलेली आहे. भीष्म, हरिश्चंद, राणा प्रताप, शिवाजी महाराज यासारख्या नामवंत वीरनायकांची संपूर्ण जीवनगाथा सत्तर-ऐंशी चित्रांतून आणि मोजक्या प्रसंगघटनांतून उलगडत जाते. डोळ्यांमधे ठसून राहते. मनात घर करते. शब्दांतूनही मनाचा ठाव घेते. प्रताप मुळीक, राम वाईरकर प्रभाशंकर कवडी प्रभृती चित्रकारांनीही या चित्रकथांमधील चित्रे आपल्या संपूर्ण ताकदीनिशी अत्यंत कलात्मक काढलेली आहेत. आपली चित्रे लाखो मुलांच्या नजरेला येणार, तेव्हा त्यांच्या कलादृष्टीला समृद्ध करणारी ही चित्रे हवीत अशी त्यांची भावना पानोपानी जाणवते. प्रसंगातले नाट्य, चेहऱ्यावरचे भाव, आवेश-आनंद, हर्षखेद-सर्व अत्यंत नेटकेप्रमाणे चित्रांमधून व्यक्त होतात. संपादक म्हणून अनंत पै यांनी ही पुस्तके तयार करून घेताना खूप चोखंदळपणा दाखविलेला आहे यात शंकाच नाही. 'टाइम्स' च्या इंद्रजाल कॉमिक्समध्ये ते कामाला होते. तेव्हा परदेशातील तयार कॉमिक्सच त्यात वापरली जात. फक्त मजकूर हिंदीमध्ये भाषांतरित केला जाई. त्यांना त्यावेळी वाटे, हा कोण कुठला जादूगार मँड्रेक्स; त्याचे आपल्या मुलांशी काय घेणे देणे? त्याऐवजी आपल्या पराक्रमी वीरांच्या जीवनगाथांवर आधारलेली अशी पुस्तके का नसावीत?.... त्यातून अमरचित्रकथेच्या निर्मितीची कल्पना त्यांना सुचली आणि अनेक अडचणीतून मार्ग काढत त्या कल्पनेला त्यावेळी त्यांनी मूर्त रूप दिले. गेली पस्तीस वर्षे अमर चित्रकथांनी भारतीय मुलामुलींच्या शालेय जीवनातील जडणघडणीला हातभार लावलेला आहे.

जागतिकीकरणामुळे भारतीय भाषांमध्ये आता वॉल्ट डिस्नेची कार्टून्स आणि कॉमिक्स

टेलिव्हिजनवर आणि नियतकालिकातून मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झालेली आहेत. वॉल्ट डिस्नेने ॲनिमेशन द्वारे चित्रपट काढण्याच्या तंत्रात प्रभुत्व संपादन केले. १९३७ साली स्नोव्हाइट ही पहिली ॲनिमेटेड कार्टून फिल्म तयार करून, त्याने चित्रपटक्षेत्रात तसेच बालसाहित्यात क्रांती केली. सिंडरेला, पीटर पॅन, वगैरे परीकथांना त्याने अमेरिकेतील घराघरात पोचवले. त्याच्या मृत्यूनंतरही त्याच्या संस्थेतर्फे चित्रपट-पिक्चर बुक्स इत्यादींची निर्मिती होतच राहिली.

पिनोचिओ (१९४०), फॅन्टासिया (१९४०), डम्बो (१९४१), सिंडरेला (१९५०), ॲलिस इन वंडरलँड (१९५१), पीटर पॅन (१९५३) , स्लीपिंग ब्युटी (१९५९), मेरी पॉपिन्स (१९६३), दि लायन किंग (१९९४), हर्क्युलिस (१९९७),- या वॉल्ट डिस्ने प्रॉडक्शन तर्फे निघालेल्या चित्रपटांनी जगभर उत्तम यश मिळवले. पुस्तके, चित्रकथा, भेटवस्तू यांद्वारेही त्याने अफाट पैसा मिळवला. डिस्नेवर्ल्ड, डिस्नेलँड याद्वारे फँटसीला वास्तवरूपात आणून आबालवृद्धांना कल्पनेच्या जगात मनसोक्त विहार करण्यास प्रवृत्त केले. डिस्ने स्टुडिओ एखाद्या कथेची कार्टून फिल्ममध्ये पेशकश करतो तेव्हा कथेत आपल्याला हवे तसे बदल करतो. प्रत्येक तपशीलाकडे लक्ष देतो, त्याला उपयुक्त असे वातावरण तयार करतो.

भारतापुरता विचार करायचा झाला तर अनंत पै यांनी चित्रकथांच्या बाबतीत महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.

अमर चित्रकथा आपल्या मराठी बालवाचकांची करमणूक तर करतीलच; त्यांच्यातील कलाप्रवृत्तीला चालना देतील, त्यांच्या बौद्धिक, भावनिक प्रगतीला हातभार लावतील, त्यांच्यातील सांस्कृतिक जाणिवा समृद्ध करतील. अमर चित्रकथा या घरोघर पोचल्या पाहिजेत; शाळाशाळांतून पोचल्या पाहिजेत. पालकांनी त्या आपल्या मुलांच्या हाती दिल्या पाहिजेत. आपल्यातील भारतीयत्वाच्या भावनेचे पोषण करण्यासाठी त्यांचा चांगला उपयोग होईल.

बंगाली 'हॅरी पॉटर'वर गंडांतर

* हॅरी पॉटरच्या व्यक्तिरेखेच्या लोकप्रियतेचा फायदा घेऊन रशियाने 'तान्या ग्रॉटर' या नायिकेद्वारे त्याचे अनुकरण करणाऱ्या कादंबऱ्या बाजारात आणल्या. दि मॅजिक डबल बॅस (लेखक - दिमित्री येमेट्स)' हे पुस्तक म्हणजे हॅरी पॉटरची चक्क नक्कल आहे असे जे. के. रोलिंगच्या वकिलाने न्यायालयात सांगितले; तर हॅरी पॉटरचे हे विडंबन आहे असे येमेटसच्या तर्फे सांगण्यात आले. कोर्टाने त्यावर हॅरी पॉटरची बाजू ग्राह्य धरून ट्रॉटरच्या पुस्तकाचे प्रकाशन - वितरण थांबवण्याचा आदेश दिला. ट्रॉटरच्या डच भाषेतील अनुवादाच्या संदर्भात ॲमस्टरडॅम येथे हा खटला भरण्यात आला होता.

* हॅरी पॉटरच्या पुस्तकांचे बंगालीतही अनेक अनुवाद प्रसिद्ध झाले आहेत. त्यासाठी अधिकृत परवानगी घेण्यात आलेली नाही. त्यामुळे साहित्यतीर्थ आणि नंदिता पब्लिशर्स यांना रोलिंगचे वकील आकाश चित्रांशी यांनी नोटिसा पाठवल्या. आमचे पुस्तक हे भाषांतर नव्हे तर हॅरी पॉटर याच्या जीवनातील काही प्रसंगांचे संपादित सादरीकरण आहे हा युक्तिवाद रोलिंगच्या वकिलांनी अमान्य केला. टाइम वॉर्नर एंटरटेन या कंपनीने हॅरी पॉटर या नावाचे व त्याच्या संबंधित वस्तूंचे उत्पादन/वितरण करण्याचे हक्क घेतलेले आहेत. त्यामुळे हॅरी पॉटर या ब्रँड इक्विटीचा वापर इतर कोणाला करता येणार नाही. तेव्हा बंगाली पुस्तकांचे वितरण थांबवण्याचे प्रकाशकांनी मान्य केले.

साहित्यवार्ता

डॉ. कणबरकर यांना महर्षी शिंदे पुरस्कार

शिक्षणातून तयार झालेला बहुजनांतील नवमध्यमवर्ग सरंजामशाहीकडे कसा वळतो आहे, असा सवाल हमाल पंचायतीचे नेते डॉ. बाबा आढाव यांनी केला. शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर यांना 'महर्षी वि. रा. शिंदे पुरस्कार' प्रदान करताना ते बोलत होते.

वाई ब्राम्हो समाज आणि रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान यांच्या वतीने हा पुरस्कार दिला जातो. डॉ. आढाव पुढे म्हणाले की, या समाजाच्या विकासाची गती नेमकी कुठे खुंटली? त्यांच्याच नेत्यांना आज शाहू-फुले-आंबेडकरांचे नाव घेताना लाज का वाटते? यामागे बहुजनांच्या नेतृत्वाचे वैचारिक खुजेपणच दिसून येते. आपली मुलगी आणि संभाजीची मोठी बहीण ही मुसलमान बनलेल्या बजाजी नाईक-निंबाळकरांच्या मुलाला देणाऱ्या शिवाजी महाराजांमध्ये मात्र वैचारिक पुढारलेपण होते, हे विसरता येणार नाही.

सत्काराला उत्तर देतारा रा. कृ. कणबरकर पुढे म्हणाले, वाई ही मला तीर्थक्षेत्र म्हणून नव्हे तर विठ्ठल रामजी शिंदे यांच्यामुळे महत्त्वाची वाटते. सनातनी परंपरेच्या या भूमीत ब्राह्मेसमाजाद्वारे धर्मचिकित्सा होऊ शकते, हे विशेष.

'शापित महात्मा' असलेला हा विचारवंत कुठे आणि पंचतारांकित हॉटेल्समध्ये संस्था जन्माला घालणारे आजचे शिक्षणसम्राट कुठे ? आजचा शिक्षकसुद्धा कोठारी आयोगामुळे मिळालेल्या वाढीव वेतनाचा लाभ घेणारा एक 'जॉब वर्कर' बनून राहिला आहे. त्यामुळेच शाहू व कर्मवीरांनी उभारलेल्या व कार्यकर्ते निर्माण करणाऱ्या कार्यशाळांची आज पुन्हा एकदा आठवण येते. संगणकामुळे आतापर्यंत विशिष्ट वर्गाच्या कनवटीला असलेल्या ज्ञानकुलुपाच्या किल्ल्या निसटून एकलव्याच्या हातात आल्या आहेत, असेही ते म्हणाले. यावेळी रमेश चव्हाण संपादित 'डॉ. रा. ना. चव्हाण विचारधना'चे प्रकाशन झाले.

चित्रपट संग्रहालयासाठी १० कोटी रुपये

राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाच्या विकासासाठी केंद्र सरकारने दहा कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सध्या या संग्रहालयाकडे कृष्णधवल चित्रपट जतन करण्याची सुविधा आहे. नव्या अनुदानामुळे रंगीत चित्रपट जतन करण्याच्या कामास प्राधान्य दिले जाणार आहे, अशी माहिती या संग्रहालयाचे संचालक शशिधरन यांनी दिली.

संग्रहालयासाठी ठिकठिकाणी इमारती बांधल्या जातील. प्रसंगी परदेशातून प्रिंटस मागविल्या जातील, असे ते म्हणाले. चित्रपट निर्मात्यांकडून संग्रहालयासाठी अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. संग्रहासाठी एखादी प्रिंटदेखील द्यायची त्यांची तयारी नसते, स्वातंत्र्यपूर्व काळात सुमारे बाराशे

मूकपट तयार झाले. त्यापैकी जेमतेम दहा ते बारा दुर्मिळ चित्रपट या संग्रहालयात आहेत.फाळणीनंतर बऱ्याच चित्रपटांच्या प्रिंटस् पाकिस्तानात गेल्या. नूरजहान यांच्यासारख्या दिग्गज कलाकाराच्या मदतीने काही प्रिंटस संग्रहालयासाठी मिळविता आल्या असत्या. पण ते झाले नाही.

कलामहर्षि बाबूराव पेंटर फिल्म सोसायटी आणि राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय यांच्या संयुक्त प्रयत्नांनी 'प्रतिमा १९१३-१९५३' हा महोत्सवही पार पडला. यात दुर्मिळ चित्रपटांचे प्रदर्शन झाले. शशिकांत किणीकर यांनी जुन्या जमान्याती चित्रपटांचा इतिहास यावेळी सांगितला. या महोत्सवात चंडीदास, पुकार, किस्मत, अनमोल घडी, चंद्रलेखा, शबनम, बरसात, रामशास्त्री यासारखे जुने चित्रपट प्रदर्शित झाले.

मारुती चितमपल्ली यांचे कोकणातले पक्षी निरीक्षण

'काय हो, तुमच्या कोकणात खेकड्यांचे प्रकार किती?'

'कुर्ल्या... भरतुल्या... काळ्या पाठीचे खडकातले!...'

'बस्स, दोन-चारच! मला तर १७ प्रकार आढळले आणि वाळूतलं होरं कधी पाहिलंत. ते केळशीजवळ आहे...'

'मुरूडचे डॉल्फिन पाहिलेत की नाही? झाडावर चढणारा खाडीतला मासा तरी पाहिलाय?' मारुती चितमपल्ली प्रश्नांचा भडिमार करतात आणि त्यांचे अफाट ज्ञान पाहून कोकणी माणूसही आश्चर्यचकित होतो.

निसर्गविषयक संशोधन करणारे प्रख्यात लेखक मारुती चितमपल्ली सध्या कोकणातील हर्णे गावी मुक्काम ठोकून आहेत. सागरकाठची जीवसृष्टी, तेथील प्राणी-पक्ष्यांची स्थानिक नावं, त्यांचं प्रजनन याचा अभ्यास करण्यासाठी ते येथे आले आहेत. वयाच्या ७२व्या वर्षीही त्यांचा उत्साह अफाट आहे. पहाटे पाच वाजता चितमपल्लींचा दिवस सुरू होतो आणि मग माहिती गोळा करीत, मच्छिमारांशी संवाद साधत ते गावोगाव हिंडतात. दिवसभर पाळंदे खाडीवरील निरीक्षणे आटोपली की, मग सायंकाळी बंदरावर काही नोंदी, उशीरापर्यंत चर्चा, चालू होतात. अफाट निरीक्षणशक्ती लाभलेल्या चितमपल्लींना खेकड्यांची पिल्ले पाण्यात कशी आणि कधी सोडली जातात, समुद्री गरुडाची निवासस्थाने कुठे-कुठे आहेत, शंख-शिंपले या सजीवांची काय भाषा असते, खेकडा नारळ खातो का, मासा झाडावर कसा चढतो, वाळूतली होरं न समजल्याने माणूस त्यात कसा फसतो, डॉल्फिनच्या सवयी काय आहेत या साऱ्या गोष्टींचा अभ्यास त्यांना करायचा आहे.

'गझलेला मराठी बनविण्याचे श्रेय सुरेश भट यांचेच'

''मराठीत गझलेची परंपरा असली, तरी गझलेला खऱ्या अर्थाने मराठी बनविण्याचे श्रेय सुरेश भट यांचेच आहे.'' असे प्रसिद्ध संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांनी सांगितले.

कवी सुरेश भट यांचा वाढदिवसानिमित्त पुण्यात चाहत्यांकडून सत्कार करण्यात येणार होता; त्याऐवजी त्यांच्या आठवणींना उजाळा देण्याची वेळ आली. त्यांच्याच एका काव्यसंग्रहाचे शीर्षक घेऊन त्यांच्या शिष्यांनी 'रूपगंधा' ही संस्था स्थापन केली. या संस्थेद्वारे भट यांच्या गझला, गाणी व आठवणी यांचा 'अजूनही चांदरात आहे' हा कार्यक्रम करण्यात आला. श्री. मंगेशकर, प्रसिद्ध गायक अरुण दाते, गीतकार सुधीर मोघे, 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष उल्हास पवार, सुधीर मुजुमदार, प्रदीप निफाडकर व अनिल

कांबळे यांनी त्यांच्या आठवणी सांगितल्या.

या कार्यक्रमात भट यांच्याविषयी बोलताना श्री. मंगेशकर म्हणाले, ''त्यांना मृत्यूची चाहूल लागली होती. मृत्यूपूर्वी तीन तास आधी त्यांनी दूरध्वनी केला होता. 'प्रकाशाच्या पावलांची चाहूल येताना' या कुसुमाग्रजांच्या ओळी त्यांनी ऐकवल्या होत्या आणि मृत्यू हेच उत्तम ज्ञान आहे, त्या 'प्रकाशा'ची चाहूल लागली आहे, असे ऐकवले होते. त्यांच्या मागे अनेकदा दुर्दैव लागले होते. अत्यंत आनंदाच्या क्षणी त्यांच्या मागे दुर्दैव उभे असायचे.''

'मेंदीच्या पानावर' या त्यांच्या पहिल्या गीताला चाल लावल्यानंतरचा संवाद, 'सुन्या सुन्या मैफलीत माझ्या' या गाण्याची आठवण, 'सुहास्य तुझे मनास मोही' हे दीनानाथ मंगेशकर यांचे गाणे ऐकल्यावर 'मी मज हरपून बसले गं' हे रचलेले गाणे अशा आठवणी त्यांनी जागवल्या. ते म्हणाले, 'मुक्तेश्वर, मोरोपंत , माधव ज्युलियन यांनीही मराठीत गझल लिहिली, पण सुरेश भट यांनी खऱ्या अर्थाने 'मराठी गझल' लिहिली. त्या अर्थाने सुरेश भट यांचा नव्हे, तर मराठी गझलेचा मृत्यू झाला आहे.''

केवळ गझलकार नव्हे, तर मराठीतील एक मोठा कवी म्हणून भट यांचे स्थान आहे, असे सांगून श्री. दाते म्हणाले, ''शब्दप्रधान, अर्थप्रधान असे त्यांचे गाणे असे, त्यामुळे गायला आवडायचे. आपण चांगले काही गातो आहोत, याचे समाधान मिळायचे. उर्दू गझलांच्या तोडीस तोड अशा गझला त्यांनी मराठीला दिल्या. राग, अग्नी, मृत्यू याबरोबरच कोमल प्रेमभावना व्यक्त करणारेही काव्य त्यांनी रचले.''

भट यांच्या गझलेतून प्रचंड धग अनुभवाला येत होती, असे श्री. मोघे यांनी सांगितले. 'स्पष्ट, परखड बोलणारा, तितकीच मनापासून दाद देणारा माणूस' असे त्यांचे वर्णन श्री. पवार यांनी केले. श्री. दीक्षित म्हणाले, ''सामान्य माणसाचे दुःख शब्दांना पेलता येते, हे सांगणारी समर्थ कविता भट यांनी लिहिली. जगण्यातील व्यावहारिकतेकडे बेदरकारपणे पाहणारा हा कलंदर कवी होता. भाषेला भूगोलाच्या सीमा नाहीत, ती सृष्टीचा श्वास आहे, हे जाणून 'महाराष्ट्र गीत' त्यांनी रचले.''

सुरेशचंद्र नाडकर्णी यांचे मनोगत वाचून दाखवण्यात आले. संस्थेच्या अध्यक्षा संगीता जोशी यांनी प्रास्ताविक केले. सुधीर कुबेर यांनी आभार मानले. अरुण नूलकर यांनी सूत्रसंचलन केले.

मंचरमध्ये यादवकालीन शिलालेख

पुण्याजवळील मंचर येथे जुन्या चौकोनी बागेत यादवकालीन शिलालेख असल्याचे स्पष्ट झाले असून त्यातून १४ शतकात तेथे समृद्ध राजवट नांदत असल्याचा पुरावा मिळाला आहे.

मंचरजवळ १९६० च्या दशकात झालेल्या उत्खननात अश्मयुगीन अवशेष सापडले होते. आता उत्तर यादवकाळातील वैशिष्ट्यपूर्ण बांधकाम असलेल्या चौकोनी बागेतील शिलालेखामुळे मंचरच्या ऐतिहासिकतेवर शिक्कामोर्तब झाले आहे. पुण्यातील डेक्कन कॉलेजमधील प्रा. गिरीश मांडके यांनी या शिलालेखाचे वाचन केले आहे. मंचर शहराच्या पश्चिमेला असलेल्या चौकोनी बागेला तळाच्या बाजूला लहान होत गेलेल्या पायऱ्या आहेत. पूर्वेकडून या विहिरीत उतरण्यास जागा आहे. त्याला समोरच्या पश्चिमेच्या भिंतीवर ''३/२६''आकाराचा २५ ओळींचा संस्कृत भाषेतील शिलालेख कोरलेला आहे. शिलालेखाच्या दोन्ही बाजूंना कोरीव खांब आहेत. या शिलालेखावर १२६६ या काळाचा उल्लेख ''रसवैरीलोचनमहि'' असा केलेला आहे. या शकसंवतप्रमाणे

१२४४ हा शिलालेखाचा काळ होता.

शिलालेखाच्या वर दोन्ही बाजूंना सूर्य चंद्राच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. श्रीगणेश व रामाच्या स्तुतिपर या शिलालेखात लादिदेव या राजाने लोककल्याणासाठी ही विहीर बांधल्याचा उल्लेख आहे. ही बाग 'मणिचर' (सध्याचे मंचर) शहरात विश्वकर्म्याने बांधली असाही दुसऱ्या श्लोकांत उल्लेख आहे. तीन ते सात श्लोकांत लादिदेवाच्या वंशावळीचे वर्णन आहे. शिलालेखात लादिदेवाच्या वडिलांचा उल्लेख 'कड्डित्तु पट्टेलवर्य' संबोधले आहे. गावचा पाटील या गावच्या अधिकाऱ्याचा संदर्भही १४ व्या शतकापासून आहे. मात्र या निमित्ताने महाराष्ट्रातील 'पाटील पदाचा' हा पहिलाच उल्लेख असावा.

प्राचीन व मध्ययुगीन काळात जुन्नर ते पैठणला जोडणारा मार्ग मंचरूवन जात असे. मान्यवर व्यापारी या रस्त्यावरून ये-जा करीत- या व्यापारीमार्गावरील पांथस्थांसाठी ही विहीर बांधली असावी असा अंदाज आहे. यानिमित्ताने मंचर परिसराचा पुरातत्त्वीय अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली आहे.

भाषांतरकारांचे पहिले संमेलन पुण्यात

कोणत्याही भाषेतील साहित्य समृद्ध करण्यात भाषांतरित साहित्याने मोलाची भर घातली आहे. भाषांतरित साहित्यामुळेच जगभरातील विविध देशांमधील सांस्कृतिक परंपरांची माहिती व अनुभवांची देवाणघेवाण करणेही शक्य झाले आहे. त्यादृष्टीने भाषांतरकारांच्या कार्याची स्वतंत्रपणे दखल घेऊन त्यांच्या कार्याचे महत्त्व ठसले जावे आणि भाषांतरकारांना योग्य ती प्रतिष्ठा मिळावी, म्हणून भाषांतरकारांचे पहिलेच संमेलन पुण्यात भरवण्यात आले. त्याचे उद्घाटन सिम्बॉयसिस संस्थेच्या विश्वभवन सभागृहात शरद पवार यांच्या हस्ते झाले. प्रसिद्ध साहित्यिक भालचंद्र नेमाडे प्रमुख पाहुणे होते.

'केल्याने भाषांतर' त्रैमासिक, 'सृष्टी' सांस्कृतिक आणि विकास प्रतिष्ठान, आणि पुणे आणि राज्य मराठी विकास संस्था, मुंबई या संस्थांच्या वतीने हे संमेलन भरवण्यात आले. मुंबईच्या नेहरू सेंटरकडून आर्थिक पाठबळ देण्यात आले.

विविध भारतीय आणि परकीय भाषांमधील साहित्य मराठीत आणले जात असताना, त्याची भाषाशैली, मूळ संहितेचा काळ, भाषांतराचा काळ, चपखल समांतर वाक्प्रचार, यासारख्या अनेक दुर्लक्षित बाबींचाही उहापोह होऊन त्याविषयी काही ठोस विचार या संमेलनातून पुढे यावा, असा उद्देश होता.

डॉ. भालचंद्र नेमाडे, सरोजिनी वैद्य, दि. पु. चित्रे, अरुण साधू, भाषाशास्त्राचे अभ्यासक प्रमोद तलगेरी, राज्य मराठी विकास संस्थेच्या अध्यक्षा वसुंधरा पेंडसे नाईक, राम पटवर्धन, ज्येष्ठ पत्रकार अशोक जैन, अशोक शहाणे, उमा कुलकर्णी, मृणालिनी गडकरी, माधुरी पुरंदरे यांचा सहभाग होता. विविध प्रकारच्या भाषांतरित साहित्यावर आधारित 'चालता-बोलता' या अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

वनस्पतींच्या शरीरातील घड्याळ

वनस्पतींमध्येही प्राण्यांप्रमाणेच २४ तासांच्या क्रिया ठरविणारे जैविक घड्याळ असते, असा शोध इस्रायल आणि अमेरिकेच्या कृषिसंशोधन विभागातील संशोधकांनी लावला आहे.

हे घड्याळच सूर्य उगवण्याअगोदर वनस्पतीला तशी सूचना देते व सुप्रभाती झाड पाने पसरवून प्रकाशसंश्लेषणाची सज्जता करते. तेव्हा आपल्याला झाड 'जागे' झाल्याचे दिसते. सूर्य डोक्यावर येण्याच्या सुमाराला हेच घड्याळ तीव्र उन्हाची सूचना झाडाला देते. याच यंत्रणेद्वारे वनस्पतींमधील डी१ प्रथिनाचे हरितलवकात सापडणाऱ्या उपयुक्त प्रथिनात रूपांतर करणारे स्राव नियंत्रित केले जातात, असे या शास्त्रज्ञांना आढळले आहे. हे रूपांतरित प्रथिन वनस्पतीला तिचे चयापचय कसे असावे याची सूचना देते, असाही त्यांचा अंदाज आहे. या प्रक्रियेतून तीव्र सूर्यप्रकाशात स्वरक्षणाची सूचना झाडाला मिळते. वनस्पती आपल्या जागेहून हलू शकत नसल्यामुळे, प्रतिकूल परिस्थितीत तिच्या रक्षणासाठी तिच्या आतले हे गुप्त 'घड्याळ'च सहाय्यकारी ठरते असे त्यांना आढळले आहे.

मराठी माणूस जोपर्यंत आहे, तोपर्यंत लावणी जिवंत राहील - खेबुडकर

मराठी भाषा व मराठी माणूस जोपर्यंत आहे, तोपर्यंत लावणी ही जिवंत राहणार असल्याचे नमूद करून रसिकांनी टवटवीत शिडकाव्यातून लावणीला फुलवावे, असे आवाहन प्रसिद्ध गीतकार जगदीश खेबुडकर यांनी चिंचवड येथे केले.

पिंपरीतील साई कला आविष्कार नाट्य संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय लावणी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. खेबुडकर यांना ग्रामीण पोलीस अधीक्षक माधवराव सानप यांच्या हस्ते 'लावणीरत्न' कार्य गौरव पुरस्कार देऊन देण्यात आला. अध्यक्षस्थानी दूरदर्शन पुणे केंद्राचे संचालक भगवंत इंगळे होते.

लावणी नृत्य करताना कमरपट्टा घातला जातो, असे नमूद करून खेबुडकर यांनी लावणी अमरपट्टा घेऊन आली असल्याचे सांगितले. मधल्या काळात झोपलेली लावणी सुरेखा पुणेकर यांनी जागी केली, त्याचप्रमाणे, लावणीपासून दूर असलेल्या महिला वर्गाला सहभागी करण्याबरोबरच नर्तिकांनी लावणी घराघरात पोहोचविली, असेही ते म्हणाले.

या महोत्सवात मुंबईच्या तेजल देवकर या नृत्यांगनेला पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले. द्वितीय क्रमांक सुजाता कुंभार तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक शीतल चोपडे हिला देण्यात आले. याशिवाय, उत्तेजनार्थ गटात सोनाली लष्करे, सारीक तिडवाई यांना पारितोषिके देण्यात आली.

कवी नारायण गंगाराम सुर्वे यांच्यावर लघुपट

कविवर्य सुर्वे यांची यशोगाथा सांगणारा अरुण खोपकर दिग्दर्शित 'नारायण गंगाराम सुर्वे' हा व्यक्तिचित्रपर, इंग्रजी निम्नशीर्षकांसहितचा मराठी लघुपट तयार झाला आहे.

खयाल ट्रस्टचे अमरेंद्र धनेश्वर यांनी, फोर्ड फाऊंडेशनच्या सहकार्याने निर्मिलेल्या या लघुपटाचा प्रथम-प्रदर्शनाचा खेळ जिंदाल आर्टस क्रिएटिव्ह इंटरॲक्शन सेंटरने, नॅशनल सेंटर फॉर द परफॉर्मिंग आर्ट्सच्या सहकार्याने टाटा थिएटरमध्ये आयोजिला होता.

पत्रकार शांता गोखले यांनी लिहिलेल्या व्यक्तिचित्रणात्मक संहितेवर सव्वा वर्षे मेहनत करून खोपकरांनी हा लघुपट दिग्दर्शिला. मुंबई शहरालाच आपलं विद्यापीठ मानणाऱ्या, ग्रंथवाचन करण्यापेक्षाही 'माणूस' वाचण्याचा आग्रह धरणाऱ्या, अल्पशिक्षित सुर्वे यांच्यातील कृष्णाबाईंशी प्रेमविवाह केलेला माणूस; कामगाराला जात/धर्म काहीही नसतो-असतो केवळ वर्ण-हे उमजल्यावर

डाव्या चळवळीत पडलेला, पण त्या चळवळीचे गुणदोषही जाणतेपणी उमजून घेतलेला कार्यकर्ता- असे सुर्वे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्व पैलू या संहितेत नेमकेपणी उभरून येतात.

मुख्य म्हणजे साध्या सरळ, निष्कपट स्वभावाच्या सुर्वे यांचं वागणं बोलणं जसं साधं सरळ तसंच या चित्रपटातील प्रसंगही दिग्दर्शक उलगडत जातो. खरं तर, त्यात नाट्यमयता आणण्यासाठी सुर्वे यांच्या भूमिकेत कवि-अभिनेता किशोर कदम याचा वापर त्यांनी केला आहे. सुर्वे यांच्या कवितेतील पोस्टरवाला उस्मान्या, गावाकडे पत्र लिहवणारी वारांगना, गोदीतील गोऱ्या साहेबांविरुद्ध फाडलेल्या लाल शर्टाचा बंडाचा बावटा उभारून कवीचा गुरू बनलेला अफगाणीचाचा आदि बोलक्या माणसांचे पडद्यावर दिग्दर्शकाने नाट्यीकरण केलं आहे; नालठोक्या चाचाकडे बालपणी कवी काम करीत असताना घोड्यांच्या थरारत्या कातडीच्या काव्यगत वर्णनाचंही सादरीकरण होतं; तरीही पाऊण तासाचा हा चित्रपट कुठेही कृत्रिम होत नाही. 'या सामाजिक वास्तवात आपण जगतो; त्याच्याशी साधलेला संवाद म्हणजेच कविता' अशी कवितेची सोपी व्याख्या करणाऱ्या या 'सुर्वेनारायणा'वरील हा लघुपट म्हणूनच स्वतःच एक कविता होऊन गेला आहे.

युद्धविरोधी कलाकारांचा मोर्चा

आपल्या देशातल्या तेल कंपन्यांचं राष्ट्रीयीकरण करणाऱ्या सद्दाम हुसेनला संपवून त्या तेलावर कब्जा मिळवण्यासाठी युद्ध पुकारणाऱ्या बुशचा आम्ही निषेध करतो. अमेरिकेची ही दादागिरी चालणार नाही. लाखो मुलांच्या भाळी अनाथपण लादणाऱ्या, हजारो निष्पाप जिवांचे प्राण घेणाऱ्या युद्धाचा जनक जॉर्ज बुश याचे क्रूरकर्मा हिटलरशीच तुलना करावी लागेल आणि एक दिवस हिटलरप्रमाणेच या बुशचीही गत होईल', असा ज्येष्ठ नाट्य-चित्रपट अभिनेते ए. के. हंगल यांनी तीव्र शब्दात धिक्कार केला. त्यांच्या मागोमाग नादिरा बब्बर, दिनेश ठाकूर, वामन केंद्रे,अतुल तिवारी यांचेही निषेधाचे स्वर घुमले. जुहू चौपाटीवर महात्मा गांधी स्मारकामध्ये मेणबत्त्यांच्या प्रकाशात कलावंत उभे होते. सर्वत्र शांतता होती.

'आर्टिस्ट अगेन्स्ट वॉर', 'मुंबई आर्टिस्टस् वॉन्ट पीस', 'डोन्ट ड्रॉप बॉम्बस, ड्रॉप बुश', 'युद्ध नको बुद्ध हवा' असे फलक आणि हाती पेटत्या मेणबत्त्या घेऊन ३० मार्चच्या सायंकाळी पृथ्वी थिएटरपासून गांधी स्मारकाच्या दिशेने २०० कलावंतांचा मूक मोर्चा निघाला होता. अमेरिकेने इराकवर लादलेल्या युद्धाचा निषेध करणारे सूर जगभर उमटत असताना त्याचे पडसाद असे मुंबईतही ऐकू येत होते. 'इप्टा' च्या पुढाकाराने हिंदी, मराठी, इंग्रजी, गुजराती रंगभूमीवरच्या कलावंतांनी हा मूक मोर्चा काढला होता. मोर्चात ए. के. हंगल, दिनेश ठाकूर, नादिरा बब्बर, राकेश बेदी, वामन केंद्रे, मधुश्री दत्ता, कुलादीप सिंह, अवतार गिल, इला अरुण, अतुल तिवारी, अफाअत खान, सलिम आरिफ,मीना नाईक कमलाकर नाडकर्णी, लुबना सिद्धिकी असे अनेक कलावंत आणि जागर लोककला मंच सारख्या संघटना सहभागी झाल्या होत्या. गांधीजीच्या पुतळ्यापाशी युद्धाचा तर जाहीर निषेध व्यक्त झालाच, पण काश्मीरमध्ये अलीकडे अतिरेक्यांनी केलेल्या हत्याकांडाचाही धिक्कार करण्यात आला. कुलदीप सिंह आणि जागरचे कलावंत यांनी शांतीचा नारा देणारं समूहगान केलं. युद्धखोर अमेरिकेचा निषेध करण्यासाठी ४ एप्रिल रोजी चर्चगेट येथून आझाद मैदानापर्यंत ५० हजारांचा मोठा मोर्चा निघाला.

'समाजातील नैतिकता जपण्याची जबाबदारी पत्रकारांची'

सध्याच्या काळातील पत्रकारिता ही आक्रमक आणि पक्षपाती असून समाजाच्या कल्याणाऐवजी स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी पत्रकारितेचा वापर केला जात आहे आणि त्यामुळेच सध्याच्या पत्रकारितेमध्ये नैतिक मूल्यांची घसरण झालेली दिसून येते, असे प्रतिपादन 'लोकसत्ता' चे संपादक कुमार केतकर यांनी ११ एप्रिलला केले.

आचार्य महायज्ञ व्यवस्था समिती, अणुव्रत समिती आणि मुंबई दूरदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पत्रकारितेतील नैतिक मूल्यांची स्थिती' या परिसंवादात अनुराग त्रिपाठी, इंडियन मोशन पिक्चर्स असोसिएशनचे सचिव दिनकर चौधरी, मुंबई दूरदर्शनचे संचालक मुकेश शर्मा, पत्रकार निरंजन परिहार, नंदकिशोर नौटियाल आदी सहभागी झाले होते.

पत्रकारांनी आपल्या जबाबदाऱ्यांकडे पाठ फिरवल्यामुळे सध्याच्या पत्रकारितेमधील नैतिकता कमी होत चालली असल्याचे सांगून केतकर पुढे म्हणाले की, पत्रकारिता व्यावसायिक झाल्यामुळे त्यातील नैतिक मूल्ये ढासळली असे म्हणणे चुकीचे ठरेल. पूर्वीची पत्रकारिता ही समाजाचा आरसा होती. सध्याच्या काळात पत्रकारितेने लोकांना मार्गदर्शन केले पाहिजे. आणि त्यासाठीच सध्याच्या काळात पत्रकारांची जबाबदारी वाढलेली आहे. परंतु आजची पत्रकारिता हे आव्हान व जबाबदारी उचलण्यास तयार नाही.

नौटियाल म्हणाले, सध्याच्या पत्रकारितेमध्ये पक्षपातीवृत्ती वाढीस लागल्यामुळेच नैतिक मूल्ये लोप पावत चालली आहेत. असे असले तरी पत्रकारांनी विचलित न होता समाजात नैतिकता वाढीस लागण्यासाठी प्रयत्न करावेत. तर मुकेश शर्मा म्हणाले, खासगी उपग्रह वाहिन्या निव्वळ पैसे कमावण्याच्या उद्देशाने चालवल्या जात आहेत तर दूरदर्शन सामाजिक ज़बाबदारीचे भान ठेवून आपले कार्यक्रम सादर करत आहे. खाजगी वाहिन्यांच्या मनमानीला आळा घालून त्यांच्यावर नियंत्रण आणण्यासाठी सेन्सॉर बोर्ड असले पाहिजे.

अमर चित्रकथाचे संपादक अनंत पै, वासुदेव भट्ट, आचार्य महाप्रज्ञ यांनीही आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वनाथ सचदेव यांनी केले.

महाराष्ट्रीय हिंदी लेखकांना पुरस्कार

महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीतर्फे हिंदी लेखकांना दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांसाठी विविध साहित्यप्रकारांतील हिंदी पुस्तके मागविण्यात येत आहेत. लेखकास एकापेक्षा अधिक साहित्य प्रकारात पुरस्कार दिला जाणार आहे. डी. लिट. पीएच्. डी., एम्. फिल करिता सादर केलेले प्रबंध संपादित व संकलित अभिनंदनपर ग्रंथांचा या पुरस्कारासाठी विचार केला जाणार नाही. अर्ज करणाऱ्या व्यक्तीचे महाराष्ट्रात १५ वर्षापासून वास्तव्य असावे. न्यायालयाकडून वास्तव्याचे प्रमाणपत्र, लेखकाचे शपथपत्र, पासपोर्ट आकाराचे एक रंगीत छायाचित्र, पुस्तकाच्या चार प्रती ३० जून पर्यंत पुढील पत्त्यावर पाठवाव्यात : महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, ओल्ड कस्टम हाऊस, विकास विभाग इमारत, दुसरा मजला, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई २३.

सुनील सावंत यांना पीएच्. डी.

किसन वीर महाविद्यालय, वाई येथील इंग्रजी विभागातील अधिव्याख्याता प्रा. सुनील रघुनाथ

सावंत यांचा 'द अमेरिकन नॉव्हेल इन मराठी-अ स्टडी इन ट्रान्सलेशन कल्चर' या संशोधन प्रबंधास शिवाजी विद्यापीठाने पीएच्. डी. दिली आहे.

प्रा. सावंत शिवाजी विद्यापीठाचे सुवर्णपदक विजेते असून, डॉ. चंद्रशेखर जहागीरदार, प्रमुख, इंग्रजी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे मार्गदर्शन लाभले.

दीड हजार ग्रंथालये केवळ कागदावर!

राज्यातील सहा हजार सार्वजनिक ग्रंथालयापैकी दीड हजार ग्रंथालये बंद पडलेली असल्याची माहिती उच्च शिक्षणमंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे यांनी विधान परिषदेत दिली.

'ड' वर्गातील वाचनालये कागदावरच चालविली जातात. एकाच वेळी सर्व ग्रंथालयांची अवस्था सुधारणे शक्य नसल्याने येत्या दोन वषात टप्प्याटप्प्याने ग्रंथालयांची परिस्थिती सुधारण्यात येईल. या ग्रंथालयातील नऊ हजार कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी व सेवाशर्तींची समस्या सोडविण्यारिता येत्या महिन्याभरात व्यंकप्पा पत्की यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासनही ढोबळे यांनी या चर्चेच्या वेळी दिले.

पुरस्कार योगिनी नेने - दि. वि. गोखले

विद्यापीठाच्या मराठी पत्रकारिता पदविका अभ्यासक्रमात २००१-२००२ साली प्रथम आलेल्या योगिनी सुधीर नेने या विद्यार्थिनीला अडीच हजार रुपयांचा कै. दि. वि. गोखले स्पृतिपुरस्कार प्रकुलगुरूंच्या हस्ते देण्यात आला.. गरवारेचे संचालक डॉ. सतीश रत्नपारखी यांनी स्वागतपर भाषण केले तर इंग्रजी पत्रकारिता वर्गाचे समन्वयक गंगाधरन यांनी आभार मानले. संगणक विभाग प्रमुख एस. ए. पाशा यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

विश्वचरित्र कोशाच्या दुसऱ्या खंडाचे प्रकाशन

विश्वचरित्र कोशाच्या पांडुरंग कामत यांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पातील दुसऱ्या खंडाचे गुढी पाडव्याला साध्या समारंभात प्रकाशन झाले.

भारतीय भाषांतील हा पहिलाच विश्वचरित्र कोश आहे. दोन हजार नोंदींचा त्यात समावेश आहे. पु. ल. देशपांडे आणि मे. पुं. रेगे यानीं विश्वचरित्र कोशाच्या कामात मोलाचा आधार आणि मार्गदर्शन दिले. त्यांच्या अकाली जाण्याने प्रकल्पाच्या कामाची मोठी हानी झाली, असे कामत यांनी सांगितले. 'गोमन्तक'चे संपादक शरद कारखानीस यांच्या हस्ते प्रकाशन झाले. नवप्रभा वृत्तपत्राचे संपादक सुरेश वाळवे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

श्रीराम कामत या एकांड्या शिलेदाराने प्रामुख्याने आपल्या पत्नीच्या आणि कुटुंबियांच्या मदतीने या महाकाय प्रकल्पाचे काम पूर्ण करीत आणले आहे. त्यांच्यासारखी माणसे ध्येयवेडी बनून समाजाचा सांस्कृतिक स्तर उंचावर नेतात, अशा शब्दांत कारखानीस यांनी कामत यांचे कौतुक केले.

बा. भ. उर्फ बाकीबाब बोरकर यांनी १९७७ मध्ये स्थापन केलेल्या विश्व चरित्र संशोधन केंद्रातर्फे विश्वचरित्र कोशाचे काम चालू आहे. एकूण सहा खंड आणि सातवा सूची खंड अशा या प्रकल्पाच्या पहिल्या खंडाचे प्रकाशन २००१ मध्ये झाले होते. उर्वरित सर्व खंडांचे प्राथमिक काम पूर्ण होत आले असून आपल्या हयातीतच प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे, असा निश्चय कामत यांनी व्यक्त केला.

रणजित देसाईंचे 'श्रीमान योगी' रंगभूमीवर येत आहे

मराठी रंगभूमीवर संप्रति एक 'रणांगण' आणि दुसरे प्रभाकरपंत पणशीकरांचे जुनेच 'इथे ओशाळला मृत्यू' वगळता ऐतिहासिक नाटकांच्या आघाडीवर सामसूम आहे. पुण्यनगरीहून 'श्रीमानयोगी' च्या आगमनाची उल्हसित करणारी बखर आली आहे. 'स्वामी'कार रणजीत देसाईच्या जबाबदार लेखणीतून उतरलेल्या या कादंबरीमय शिवचरित्राचे रंगमंचीय दर्शन मराठी रसिकांना लवकरच घडणार आहे, अशी तुतारी 'श्री'ची इच्छा' या संस्थेचे निर्माते विजय जोशी यांनी फुंकली आहे.

'श्रीमान योगी' कादंबरीचे नाट्यरूपांतर खरे तर रणजित देसाईनीच पूर्वी करून ठेवले होते. परंतु ती संहिता बाजूस ठेवून कादंबरीतून नव्याने नाटक कोरून काढण्याचे ठरविण्यात आले. अभिनेते प्रमोद पवार यांची त्यांनी 'श्रीमान योगी'ची नरहर कुरुंदकरांनी लिहिलेली प्रस्तावना पुन: पुन्हा वाचली त्यांना कादंबरीत दडलेली वेगळी बलस्थाने खुणावू लागली. पेटाऱ्यातून पळालेले महाराज, साक्षात भवानीमातेने दर्शन देऊन तलवार अर्पण केलेले महाराज अशा अद्भुताचे आवरण असलेली प्रतिमा बाजूस ठेवून त्यांनी अंमलात आणलेली राजनीती, त्यांचे व्यवहारकौशल्य यांच्याकडे डोळसपणे पाहिल्यावर त्यांचे द्रष्टेपण आणि उत्तुंगता खऱ्या अर्थाने कळून येते, हा बोध प्रमोद पवार यांनी कुरुंदकरांच्या प्रस्तावनेतून घेतला आणि मग त्यांना वाटू लागले की, महाराजांचे हेच पैलू नाटकामधून प्रकर्षाने पुढे आणले आणि त्यामागची वैचारिकता नीट बिंबवली तर महाराजांचे आगळे दर्शन आपण रसिकांना घडवू शकू. आज खरी गरज आहे ती त्याची! प्रस्तावनेतल्या वाटांनी कादंबरीचा शोध घेत जाण्यासाठी नवी संहिता लिहिणे क्रमप्राप्त झाले. त्यासाठी पुण्याचे नाटककार प्रताप गंगावणे यांचे नाव मुकर झाले. दीड वर्षे ही विचारांच्या आदानप्रदानाची, चर्चेची, लेखन-पुनर्लेखनाची प्रक्रिया चालली. नाटकाचे दिग्दर्शन प्रमोद प्रवार करणार असून शिवाजीमहाराजांची भूमिकाही तेच साकारणार आहेत. ते म्हणतात, 'शिवछत्रपतींनी काढलेली राजमुद्रा ही ऐतिहासिक महत्त्वाची घटना आहे. आम्ही या राजमुद्रेलाच बोलते केले आहे. तिच्या निवेदनातूनच नाटक उलगडत जाईल. बजाजी निंबाळकराच्या धर्मांतर प्रवेशाने नाटकास प्रारंभ होऊन शिवराज्याभिषेकाने ते संपेल. पुतळाबाईंना आजवर शिवचरित्रात मोठे महत्त्व दिले गेलेले नाही. आम्ही ते दिले आहे. अनेक ऐतिहासिक गोष्टींचा यात वेगळा विचार केलेला दिसेल. हत्ती, घोडे आणि लढाया दाखविण्यात आम्हाला रस नाही. आम्ही लढायांमागच्या रणनीतीला, राजकारणाला महत्त्व दिले आहे. हे एक वैचारिक नाटक व्हावे, असा आमचा प्रयत्न आहे.

बाबा पार्सेकर यांचे नेपथ्य आणि अशोक पत्की यांचे संगीत यांनी सजणाऱ्या या नाटकासाठी पात्रयोजना करण्यासाठी कलावंतांच्या मुलाखती घेण्याचे काम चालू आहे. एकूण २० कलावंतांचा ताफा नाटकात ४० व्यक्तिरेखा साकारेल. राजमुद्रेचे निवेदन चित्तरंजन कोल्हटकर यांच्या आवाजात ध्वनिमुद्रित केले जाणार आहे. अ. भा. मराठी नाट्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी नाटकाला सर्वतोपरी साह्य देण्याचे मान्य केले आहे. 'श्रीमानयोगी' मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात रंगभूमीवर पाऊल टाकणार आहे.

वेबसाईटवर आता कोल्हापूरचा जोतिबाही पहाता येईल

महाराष्ट्राचे कुलदैवत आणि लक्षावधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेला श्री जोतिबा आता संगणकाच्या प्रणालीमध्ये माहिती तंत्रज्ञानाच्या महामार्गावर संकेतस्थळाच्या रूपाने आला आहे

DAKKHAN KEDAR com या नावाने तयार करण्यात आलेल्या जोतिबाच्या वेबसाईटचे प्रकाशन १२ एप्रिल रोजी क्षेत्र वाडी रत्नागिरी (जोतिबा डोंगर) येथे करण्यात आले.

कोल्हापूर शहरापासून २१ कि. मी. अंतरावरील श्री क्षेत्र जोतिबा हे प्रसिद्ध तीर्थस्थान आहे. श्री क्षेत्र जोतिबाचे धार्मिक महत्त्व, अख्यायिका, स्तोत्र, देवाचे नित्य विधी, आरत्या, यात्रेची माहिती, उपलब्ध सोयासुविधा, विविध कार्यक्रम आदींचा अंतर्भाव असणाऱ्या या संकेतस्थळाच्या निर्मितीसाठी जोतिबा डोंगरावरील कार्यकर्ते सुनील आमाणे, रमेश धडेल, दत्तात्रय धडेल, उत्तम झूगर आदींनी परिश्रम घेतले नेटसर्फ कम्युनिकेशनचे सुजित जैन, प्रमोद सुगरे, जिनेंद्र देसाई, प्रदीप चिकुर्डे, संदीप जोग यांनी तांत्रिक सहकार्य उपलब्ध केले. १२ एप्रिल रोजी मंदिराच्या आवारात मोठा एल. सी. डी. स्क्रीन लावून भाविकांच्या उपस्थितीत या संकतस्थळाचे उद्घाटन झाले.

जोतिबाच्या चैत्री यात्रेसाठी प्रतिवर्षी सुमारे ५ लाखांहून अधिक भाविक येतात. गुढीपाडव्यादिवशी करवीर तालुक्यातील निगवे दुमाला येथील हिम्मत बहाद्दूर चव्हाण यांची मानाची सासनकाठी वाजत गाजत डोंगरावर प्रवेश करते आणि चैत्री यात्रा सुरू होते.

निखळलेल्या ताऱ्यांचे काव्यमय अस्तित्व

कोणाची कविता प्रांजळ, साध्या-सोप्या शब्दांतून अवतरणारी, कोणाची सामाजिक, राजकीय भान असलेली, तर कोणाची मानवी जीवनमूल्ये जपणारी... 'त्यांच्या' कवितेविषयीच्या आठवणी जाग्या होत गेल्या आणि साहित्यविश्वातून अजूनही आपल्यात आहेत याची साक्ष पटली.

डॉ. नानासाहेब परुळेकर प्रबोधन मंडळाच्या वतीने शांताबाई शेळके, वसंत बापट आणि सुरेश भट यांच्या प्रतिभेचे दर्शन घडविणाऱ्या 'निखळलेले तारे' या कार्यक्रमात डॉ. कल्याणी दिवेकर, डॉ. माधवी वैद्य आणि रमण रणदिवे यांनी यामध्ये भाग घेतला.

डॉ. दिवेकर म्हणाल्या, ''कविता ही हौसेपोटी करायची गोष्ट नसून, प्रेमाची गोष्ट आहे, असे मानून शांताबाईंनी कविता लिहिल्या. त्यांची साहित्यावर अव्यभिचारी निष्ठा होती. त्यांची माणसांची आवड त्यांच्या कवितेतूनही दिसते. जातीची, वर्गाची चौकट नसल्याने त्यांच्या कवितेतील प्रसन्नता वाचकांनाही भावली.''

वसंत बापट हे खास पुण्याचे कवी होते, असे नमूद करून डॉ. माधवी वैद्य म्हणाल्या, ''त्यांची कविता जीवनातील रंगांनी जशी बहरलेली होती, तशीच सामाजिक सामिलकीचीही होती. कविता हा उद्गार आहे, म्हणून बापटांनी कवीने सामूहिक गीतसंस्कृती रुजविण्याचे काम केले.''

श्री. रणदिवे म्हणाले, ''सुरेश भट हे शब्दांवर हुकमत असलेले कवी होते. मराठी ढंगाची खरी गझल त्यांनीच सर्वप्रथम लिहिली. मराठी गझलेला उर्दूची नजाकत येत नाही ही टीका त्यांनी खोटी ठरवली. त्यांच्या कवितेने मराठी रसिकता व्यापक केली.''

मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. शरच्चंद्र गोखले यांनी आभार मानले. मानद चिटणीस सविता भावे यांनी सूत्रसंचालन केले.

'मराठीला ज्ञानभाषेचा दर्जा ज्ञानकोशाने मिळवून दिला'

''मराठी भाषेला ज्ञानभाषेचा दर्जा मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ज्ञानकोशाने केले आहे,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेमध्ये ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'ज्ञानकोश ते विश्वकोश' या विषयावर ते बोलत होते. तत्पूर्वी सकाळी कमला नेहरू उद्यानातील केतकर यांच्या समाधीवर परिषदेतर्फे पुष्पांजली अर्पण करण्यात आली.

प्रा. जाधव म्हणाले, ''विसाव्या शतकाने सर्वच क्षेत्रांतील आव्हाने यशस्वपणे पेलली. ज्ञानकोश ते मराठी विश्व यांच्यातले एक वर्तुळ विश्वकोशाने पूर्ण केले. त्याने महाराष्ट्राला आधुनिक ज्ञानविज्ञान दिले. या शतकाचे संचित या कोशामध्ये मांडले आहे.''

'कोशाच्या निर्मितीसाठी ज्ञानविज्ञानाचे अधिष्ठान व ज्ञानासाठी उत्सुक असलेला वाचकवर्ग असावा लागतो,' असे नमूद करून ते म्हणाले ''जिज्ञासू, संशोधक व सामान्य वाचक असे वाचकांचे तीन प्रकार असतात. मात्र विश्वकोशाच्या बाबतीत तसा वाचक वर्ग निर्माण झाला नाही. ज्ञानकोश ही सतत चालणारी प्रक्रिया आहे, असे मानले पाहिजे. माहितीचे ज्ञानात रूपांतर व्हावे; परंतु त्यामध्ये ज्ञानाची दिशाभूल होऊ देऊ नये.

इंग्रजी शाळांमधून होणारी मराठीची उपेक्षा भयावह

इंग्रजी माध्यमाच्या शाळांतून होणारी मराठीची उपेक्षा हे मराठी संस्कृतीवर आलेले एक फार भयावह गंडांतर असल्याचा इशारा ३२ व्या मुंबई महानगर अध्यक्षा व ज्येष्ठ साहित्यिका शिरीष पै यांनी दिला. संघाच्या सभागृहात भरलेल्या या संमेलनाचे उद्घाटन साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्रा. रा. रं. बोराडे यांनी केले. ग्रंथदालनाचे उद्घाटन कविवर्य शंकर वैद्य यांच्या हस्ते झाले.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील शाळांमध्ये व मुंबई महापालिकेच्या मराठी शाळांमध्ये मराठी भाषेविषयीची प्रेमभावना मला दिसली. अशा साध्यासुध्या गरिबांच्या घरातच उद्या मराठी भाषेचे प्रेम जिवंत राहाणार आहे. गरीब मध्यमवर्गीय, कष्टकरी आणि दलित वर्ग हेच उद्याच्या मराठी भाषेचे खरे आधार ठरतील असा विश्वास शिरीष पै यानी व्यक्त केला. त्या म्हणाल्या, 'मुंबई-पुण्यासारख्या बड्या शहरातील सुशिक्षित मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीयांनी मराठी भाषेकडे उघड उघड पाठ फिरवली आहे. ते 'डॅडी-मम्मी' संस्कृतीच्या मागे धावत सुटले आहेत. आज इंग्रजी माध्यमातून शिकणाऱ्या मुलांना आपल्या मातृभाषेची गोडीच वाटत नाही. या उच्चमध्यमवर्गीय मराठी माणसांची मुले जेव्हा इंग्रजीतून बोलतात, तेव्हा मनाला तीव्र दु:ख होते, अशी खंत शिरीष पै यांनी व्यक्त केली. तसेच, सर्व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना सुरवातीपासूनच मराठी भाषेचे शिक्षण सक्तीचे करण्याची सूचना त्यांनी क़ेली. आमच्या मराठी भाषेला शेक्सपियरसारखा आधारवड नाही. अशी मागे कुणीतरी खंत व्यक्त केली होती, इंग्रजी साहित्याला तरी ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्यासारखे आधारवड कुठे आहेत, असा प्रतिसवाल त्यांनी केला.

समाजजीवनाशी समरस होते तेच खरे साहित्य अशी घोषणा आचार्य अत्रे करीत. मात्र माझे मन मला हेच समजावून सांगते की, जर तू तसे लिहिले असतेस तर ते कृत्रिम, यांत्रिक, निर्जीव आणि प्रचारकी थाटाचे झाले असते. त्यातून तुझा अंतरात्मा प्रगटला नसता. प्रत्येक लेखकाचा अंतरात्मा त्याला हाक मारत असतो. ती हाक हीच तुमची खरी वाङ्मय प्रेरणा. त्या हाकेशी प्रामाणिक राहिला तोच लेखक वाचकांच्या हृदयाला स्पर्श करणारे लेखन करू शकतो.

अभिरुचिसंपन्न साहित्याची दखल घेणारे वाङमयीन नियतकालिक असण्याची गरज आहे

असे प्रा. सुभाष भेण्डे यांनी म्हटले. संघाच्या ‘साहित्य’ या त्रैमासिकाला अनुदान देण्याची घोषणा प्रा. रा. रं. बोराडे यांनी केली. साहित्य संघाच्या ‘साहित्य’ त्रैमासिकाचे व ‘मुंबई मराठी साहित्य सांस्कृतिक सरिता’ या पुस्तिकांचे प्रकाशन प्रा. सुभाष भेण्डे यांच्या हस्ते झाले. विविध पुरस्कार मिळविल्याबद्दल प्रा. गंगाधर गाडगीळ, सरोजिनी वैद्य, डॉ. बाळ भालेराव, निरंजन उजगरे, मोनिका गजेंद्रगडकर आदींचा यावेळी सत्कार करण्यात आला.

जिमी कार्टर यांची कादंबरी प्रकाशनाच्या मार्गावर

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दोन शतकांचा संपन्न इतिहास असणाऱ्या अमेरिकेकडे कमतरता होती ती एकाच गोष्टीची. ती गोष्ट म्हणजे त्यांच्या आजवरच्या कोणत्याही राष्ट्राध्यक्षाने कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न केला नव्हता. आता ती कमतरता दूर झाली असून, शांततेचा नोबेल पुरस्कार विजेते माजी राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर यांची ‘द हॉर्नेट्स नेस्ट’ ही ऐतिहासिक कादंबरी प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

वयाची अठ्ठ्याहत्तरी पार केलेल्या जिमी कार्टर यांनी, अमेरिकन क्रांतीच्या काळात ब्रिटिशांविरुद्ध लढलेल्या आपल्या पूर्वजांचा इतिहास या कादंबरीत चितारला आहे.

कार्टर कुटुंबियांचे पूर्वज १६ व्या शतकाच्या सुरुवातीपासून अमेरिकेच्या दक्षिणेस वास्तव्य करून होते. तो काळ उभा करण्यासाठी कार्टर यांनी बरेच संशोधन केले. त्यांनी अनेक प्रकारची हस्तलिखिते, ब्रिटिश आणि अमेरिकन सैनिकांच्या रोजनिशी यांचा अभ्यास केला, इतिहासतज्ज्ञांशी चर्चा केली आणि स्वत:च्या कुटुंबाच्या पाळामुळांचाही धांडोळा घेतला. या कादंबरीत असणारे एथन प्रॅट याचे व्यक्तित्व काहीसे कार्टर यांच्या व्यक्तिमत्त्वाशी जुळणारे आहे.

इतिहास लेखन करताना अमेरिकेच्या दक्षिणेकडील राज्यांकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही, असा कार्टर यांचा दावा आहे. त्यामुळेच उत्तरेतील जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या कर्तृत्वाचा सगळ्यांना परिचय झाला, परंतु दक्षिणेकडील लढवय्ये मात्र दुर्लक्षित राहिले. या कादंबरीत काही ब्रिटिश अधिकाऱ्यांचे चित्रणही सहानुभूतिपूर्वक करण्यात आले आहे.

कादंबरीविषयी प्रतिक्रिया देताना सिमॉन ॲण्ड श्रेष्टर या प्रकाशन संस्थेने म्हटले आहे क़ी, रणांगणावर लढली जाणारी युद्धे आणि त्यांच्या येणाऱ्या बातम्या या बऱ्याच वेळा धूळफेक करणाऱ्या ठरतात. या पार्श्वभूमीवर आपण नेमकी कोणती बाजू घ्यायची, याचा निर्णय करणे अवघड होऊन जाते. ही कादंबरी याच वास्तवाचा प्रत्यय आणून देते.

इराक युद्धाबाबत कार्टर यांना या परिस्थितीचा पुरता अनुभव आला असणार. कारण त्यांनी घेतलेल्या युद्धाविरोधी भूमिकेवर बरीच झोड उठली होती. इराकमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या शस्त्रास्त्र निरीक्षकांना आणखी कालावधी द्यायला हवा होता, असे मत कार्टर यांनी व्यक्त केले होते.

अव्यावसायिक नाटकाने मनोरंजनाच्या व्याख्या बदलाव्यात

‘प्रत्येकाच्या मनोरंजनाच्या कल्पना वेगळ्या असतात. त्यांची मनोरंजनाची व्याख्या वेगळी असते. पण ती सर्वकालिन राहात नाही. त्यात सतत बदल होत राहतात. म्हणूनच आता अव्यावसायिक नाटक करणाऱ्यांनी लोकांच्या मनोरंजनाच्या व्याख्या बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे’, असे उद्गार प्रायोगिक रंगभूमीवरील प्रसिद्ध अभिनेते डॉ. शरद भुथाडिया यांनी काढले. तरुण कवी-लेखक अनिल सरमळकर यांच्या ‘राजकीय नाटक: एक विचार’ या पुस्तकाचे प्रकाशन

क़रताना काढले. भुथाडिया म्हणाले, ‘सामाजिक विषयावरची सगळीच नाटके सामाजिक होत नाहीत. त्या नाटकात त्याची कारणमीमांसा प्रभावीपणे मांडली जावी लागते. प्रत्येक व्यक्ती राजकीय असते. अनिल सरमळकर यांचे हे लेखन मोठ्या वकुबाचे असून रंगकर्मी व नाट्य संस्थांसाठी ते उपयोगी ठरेल.

समारंभाचे अध्यक्षस्थान सावंतवाडीचे कादंबरीकार विद्याधर भागवत यांनी भूषविले. प्रा. विजय फातर्फेकर यांनीही सरमळकर यांच्या भाष्य करण्याच्या शैलीबद्दल आणि धाडसाबद्दल कौतुक केले. प्रा. प्रवीण बांदेकर म्हणाले की, सरमळकर यांची कविता, गद्यलेखन आणि नाटके अस्वस्थ करणारे समाजवास्तव मांडतात आणि लोकविलक्षण राजकीय आकलनासाठीच ओळखली जातात.

साहित्य संस्थांच्या अनुदानात चाळीस टक्के कपात

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आणि अन्य सहा साहित्य साहित्य संस्थांना देण्यात येणाऱ्या अनुदानात चाळीस टक्के कपात करण्यात आली असून, आता या संस्थांना दर वर्षी एक लाख रुपये एवढेच अनुदान मिळणार आहे.

याबरोबरच महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने या सर्व साहित्य संस्थांवर निर्बंध घालण्याचा निर्णय घेतल्यामुळे साहित्य संस्थांचे पदाधिकारी अस्वस्थ झाले असून, त्यांचे एक शिष्टमंडळ लवकरच या संदर्भात मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ; तसेच अन्य सहा विभागीय साहित्य संस्थांना राज्य सरकार दर वर्षी एक लाख रुपये अनुदान देते. हे अनुदान महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळामार्फत देण्यात येते. अलीकडेच राज्य सरकारने एक अध्यादेश काढून राज्य सरकार देत असलेल्या अनुदानातून साहित्य संस्थांनी कोणते कार्यक्रम घ्यावेत, यावर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार साहित्य संस्कृती मंडळाला बहाल केले. त्याला अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आणि मंडळाच्या चार घटक संस्थांनी विरोध केला. आता त्यांच्या अनुदानात चाळीस टक्के कपात करण्याचा निर्णय साहित्य संस्कृती मंडळाने घेतला आणि तो तडकाफडकी अमलातही आणला! ‘साहित्य संस्कृती मंडळाला राज्य सरकारकडून मिळणाऱ्या सहाय्यक अनुदानात चाळीस टक्के कपात वरून वितरित करण्यात येत आहे,’ असे मंडळाचे म्हणणे आहे. दुसरीकडे साहित्य संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे, की राज्य सरकारने साहित्य संस्थांच्या अनुदानात कपात केलेली नसून, साहित्य संस्कृती मंडळाच्या निधीत कपात केली आहे. त्यामुळे मंडळाला साहित्य संस्थांच्या अनुदानात कपात करण्याचा काहीही अधिकार नाही.

गेल्या मार्चअखेर बडोदा अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाची बैठक झाली. या बैठकीत उपरोक्त दोन्ही विषयावर चर्चा झाली. ‘साहित्य संस्कृती मंडळाच्या दंडेलीविरुद्ध आवाज उठविण्याचा’ निर्धारही या बैठकीत करण्यात आला! त्यानुसार आता अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आणि महामंडळाच्या चार घटक संस्थांचे एक शिष्टमंडळ मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांची भेट घेऊन त्यांच्याशी या संदर्भात चर्चा करणार आहे.

दरम्यान, गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ या दोन संस्थांमध्ये ‘पत्रयुद्ध’ सुरू आहे. एकमेकांच्या मर्यादा

वगैरे दाखवून देण्यात येत आहेत. भाषेबद्दल आक्षेप घेण्यात येत आहेत. ज्याने पत्र पाठवले त्यालाच उत्तर पाठवणे काटेकोरपणे चालू आहे. या हमरीतुमरीतून आता मुख्यमंत्र्यांनीच मार्ग काढावा, यासाठी एक शिष्टमंडळ त्यांना भेटणार आहे.

ब्रिटिश ग्रंथालयातर्फे 'ऑनलाईन' सेवा

ब्रिटिश ग्रंथालयातर्फे पुढील वर्षापासून ऑनलाईन सेवा सुरू करण्यात येणार आहे. यामुळे या ग्रंथालयाच्या सदस्यांना जगभरातील सर्व प्रमुख नियतकालिके; तसेच विविध ग्रंथ संगणकावर उपलब्ध होणार आहेत.

ग्रंथालयातर्फे प्रथमच 'ऑनलाईन' सेवेचा प्रकल्प राबविण्यात येत आहे. भारतात तो यशस्वी ठरल्यास अन्य देशांमध्येही तो राबविला जाणार आहे. या प्रकल्पासाठी दहा लाख पौंडांची गुंतवणूक करण्यात आली आहे. ब्रिटिश कौन्सिलचे संचालक एडमंड मार्सडेन यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, ''ब्रिटिश कौन्सिलची देशात अकरा ग्रंथालये असून सुमारे एक लाख सदस्य आहेत. पुण्यात तेरा हजार सदस्य आहेत. काळाची गरज ओळखून आम्ही माहिती तंत्रज्ञानावर भर देत आहोत. 'ऑनलाईन'चा प्रकल्प हा त्याचाच एक भाग आहे. त्यामुळे जागतिक दर्जाची नियतकालिके 'ऑनलाईन' स्वरूपात उपलब्ध होणार आहेत. त्यासाठीची संगणकप्रणाली विकसित केली जात आहे. इंग्रजी भाषेच्या शिक्षणाबद्दलची संगणकप्रणाली हा या प्रकल्पाचा मुख्य भाग आहे. ते काम सप्टेंबर-ऑक्टोबर या काळात पूर्ण होईल आणि त्यानंतर जानेवारीपासून 'ऑनलाईन' सेवाही उपलब्ध होईल.''

''पहिल्या टप्प्यात आमची ग्रंथालये असणाऱ्या केंद्रांमध्ये ही सेवा दिली जाणार आहे. त्यानंतर देशातील आणखी चौदा शहरांत सेवेचा विस्तार केला जाईल, तीन लाख लोकांना 'ऑनलाईन' सेवा देण्याइतपत पायाभूत सुविधा विकसित केली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

ब्रिटनमधील विद्यापीठ अनुदान मंडळाने (यूएफसी) 'ई-युनिव्हर्सिटी' ही 'ऑनलाईन' शिक्षण देण्यासाठीची कंपनी स्थापन केली आहे. या कंपनीमार्फत ब्रिटिश विद्यापीठांमधील व्यवस्थापनशास्त्र, अभियांत्रिकी आदी शाखांमधील उच्च शिक्षण भारतात 'ऑनलाईन' पद्धतीने देण्याची योजना कार्यान्वित झाल्याची माहिती श्री. मार्सडेन यांनी दिली.

भारत व ब्रिटन येथील विद्यापीठांद्वारे संयुक्तपणे सुमारे पन्नास उपक्रम राबविले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

इंग्रजी भाषेच्या शिक्षणासाठी ब्रिटिश कौन्सिलतर्फे संगणकप्रणाली विकसित केली जात असल्याचे श्री. मार्सडेन यांनी सांगितले. इंग्रजीच्या शिक्षकांना ही प्रणाली उपयुक्त ठरेल, असे त्यांनी नमूद केले. ''इंग्रजी भाषेची वैशिष्ट्ये, विविध पद्धतीचे उच्चार, वाक्प्रचार आदींबद्दलची माहिती या प्रणालीत असणार आहे. स्वयंअध्ययन व भाषा शिकण्यासाठीचे साहित्यही पुरविले जाणार आहे,''

'नवतेच्या शोधात मुलांनी अंतर्नाद जागवावा'

''नवनिर्मितीची आस मुलांमध्ये असतेच; ती जोपासताना त्यांना त्यांच्यासारखे वागू द्या, बोलू द्या. नवतेच्या शोधात मुलांनी अंतर्नाद जागवला पाहिजे,'' असे 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित यांनी सांगितले.

'सकाळ नाट्यवाचन समिती' तर्फे घेण्यात आलेल्या आंतरशालेय नाट्यवाचन स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. विद्यार्थी गटात अभिनव विद्यालयाने (मराठी माध्यम) व विद्यार्थिनी गटात नू. म. वि. मुलींच्या प्रशालेने नैपुण्यपद मिळविले. भावे स्कूल व अहिल्यादेवी प्रशाला यांना उपनैपुण्यपद मिळाले.

रंगभूमीवर सतत शिक्षणाची प्रक्रिया सुरू असते, असे सांगून दीक्षित म्हणाले, ''पुस्तकेच नव्हेत, तर माणसांचे आयुष्य अधिक शिकविणारे असते. त्यामुळे रंगभूमीवर यशस्वी ठरण्यासाठी माणसे वाचायला शिका. उत्तम निरीक्षणशक्ती कमवा. शरीराबरोबरच मनाची जोपासना करा. दुसऱ्याकडून चांगल्या गोष्टी जरूर शिका, परंतु कोणाचेही अनुकरण करू नका. स्वत:चे व्यक्तिमत्त्व व्यक्त होणे महत्त्वाचे असते. उत्तम प्रेक्षक होता येणे हीसुद्धा नाटकाची गरज असते, हे विसरू नका.''

परीक्षकांच्या वतीने बोलताना सेवा चौहान म्हणाल्या, ''मुलांना त्यांच्यासारखे नाट्यवाचन करू द्या. त्यांना त्यांचे नाटक करू द्या.''

अरविंद व्यं. गोखले यांना ठाकूर स्मृती निर्धार पुरस्कार

स्वातंत्र्यसेनानी व बेळगाव तरुण भारतचे संस्थापक बाबूराव ठाकूर याच्या स्मृतिदिनानिमित्त आजरा येथील 'निर्धार' संस्थेच्या वतीने देण्यात येणारा पुरस्कार' लोकसत्ताचे सहायक संपादक अरविंद व्यं. गोखले यांना जाहीर झाला आहे. पुरस्काराचे हे पहिले वर्ष असून, रोख रक्कम व सन्मानचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे. गोखले यांची सहा पुस्तके प्रकाशित झाली असून, भारत-पाकिस्तान संबंध, संयुक्त महाराष्ट्राचा लढा, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न हे त्यांच्या विशेष अभ्यासाचे विषय आहेत.

'आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांनीही इतिहास घडविला'

''आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांनीही इतिहास घडविला. या चळवळीतील काही स्त्रियांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे,'' असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखिका उर्मिला पवार यांनी केले. पुणे विद्यापीठातील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र आणि आंबेडकर अध्यासन यांनी आयोजिलेल्या कार्यक्रमात 'आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांचे योगदान' या विषयावर बोलताना त्या म्हणाल्या ''दलित महिलांनीही पराक्रम गाजविला आहे. राणी लक्ष्मीबाई ब्रिटिशांनी हल्ला केला तेव्हा झरकारी देव या मागासवर्गीय महिलेने राणीचा वेष परिधान करून ब्रिटिशांशी लढा दिला. मुक्ता साळवे या मागासवर्गीय मुलीने वयाच्या बाराव्या वर्षी अस्पृश्यता व महिलांच्या प्रश्नावर त्या काळ जाहीरपणे आपले विचार मांडले होते. शिऊबाई हिने आपल्याला मुरळी बनविणाऱ्या समाजावर कडाडून टीका केली होती. महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहात शांताबाई भालेराव यांनी सक्रिय भाग घेतला होता.''

स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालिका डॉ. विद्युत भागवत यांनी प्रास्ताविक केले. आंबेडकर अध्यासनाचे समन्वयक नागनाथ कोत्तापल्ले यांनी स्वागत केले. दलित चळवळीच्या अभ्यासिका डॉ. गेल ऑमवेट यांनीही या वेळी विचार व्यक्त केले.

पुण्यात क्रॉसवर्डची चौथी शाखा

चोखंदळ वाचकांसाठी व संगतीप्रेमींसाठी पुस्तके, सीडी रॉम्स, म्युझिक, चित्रपट आणि

खेळणी, स्टेशनरी असे सर्व एकाच ठिकाणी मिळेल, असे मोठे आकर्षक क्रॉसवर्ड डिपार्टमेंटल स्टोअर्स जंगली महाराज रस्त्यावर १२ एप्रिलपासून सुरू झाले आहे. क्रॉसवर्डची ही पुण्यातील चौथी शाखा आहे. पुणे स्टेशन परिसराजवळ सोहराब हॉल, पिरॅमिड मेगा स्टोअर्स आणि पुणे-मुंबई महामार्गावरील शॉपर्स स्टॉपनंतर आता रेनेसन्स या नवीन इमारतीत हे दुकान सुरू झाले आहे.

मुंबई, दिल्ली, अहमदाबाद, बडोदा व चेन्नई येथे क्रॉसवर्डच्या शाखा असल्या, तरी चार मोठे बुकस्टोअर्स असलेले पुणे हे भारतातील एकमेव शहर आहे, असे क्रॉसवर्डचे फ्रेंचाइजी दिनेश गुप्ता यांनी सांगितले. भारतात अशी किरकोळ पुस्तकविक्रीची १७ ठिकाणे वाढवण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. मासिके व पुस्तक विक्रीसाठी आकर्षक सजावट, सोबत संगीताची सुरावट आणि वेलक कॅफे सुविधाही जंगली महाराज रस्त्यावरील पाच हजार चौरस फूट क्षेत्रफळाच्या जागेत आहे. यानिमित्ताने ग्राहकांसाठी फोन, फॅक्स आणि ईमेलवरून पुस्तके आर्डर करण्याची अत्याधुनिक सुविधाही क्रॉसवर्ड पुरवणार आहे. या स्टोअरचे उद्‌घाटन क्रॉसवर्डचे मुख्य कार्यकारी अधिकारी आर श्रीराम यांचे हस्ते झाले.

'आणखी कानोकानी'चे प्रकाशन

रोहन प्रकाशनतर्फे अशोक जैन लिखित 'आणखी कानोकानी' या लेखसंग्रहाचे प्रकाशन 'साप्ताहिक सकाळ'चे संपादक सदा डुंबरे यांच्या हस्ते करण्यात आले. दिलीप माजगावकर, प्रा. पुष्पा भावे, अनंत भावे, श्रीकांत लागू, लालन सारंग, दीपा श्रीराम आदी या वेळी उपस्थित होते. प्रदीप चंपानेरकर यांनी प्रास्ताविक केले.

राष्ट्रीय नाट्य विद्यालयात बालनाट्याचा अभ्यासक्रम

नवी दिल्ली येतील राष्ट्रीय नाट्य विद्यालयात जुलैपासून संहिता लेखन व बालनाट्य या संदर्भातील दोन नवे अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचे संचालक देवेंद्र राज 'अंकुर' यांनी ही माहिती दिली.

'अभिजात'च्या वतीने आयोजित कथाविष्कार महोत्सवाच्या उद्‌घाटनासाठी ते पुण्यात आले होते. सध्या राष्ट्रीय नाट्य विदयालयात अभिनय, नेपथ्य व दिग्दर्शन या विषयांचा तीन वर्षांचा अभ्यासक्रम शिकवण्यात येतो. परंतु आगामी वर्षापासून संहिता लेखन व बालनाट्य हे दोन नवे अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांना अधिक पर्याय उपलब्ध होऊ शकतील. या दोन्ही विषयांच्या अभ्यासक्रमाची रचना निश्चित करण्यात येणार असून त्या दृष्टीने विविध नाट्यप्रशिक्षण संस्थांशी संपर्क साधण्यात येत आहे. संहिता लेखनाचा अभ्यासक्रम आखण्यासाठी पुण्यातील भारतीय चित्रपट व दूरचित्रवाणी संस्थेमध्ये (एफ्. टी आय. आय.) चालणाऱ्या संहिता लेखनाच्या अभ्यासक्रमाची माहिती मागवली आहे.

राष्ट्रीय नाट्य विद्यालयाची चार केंद्रे सुरू करण्याचा प्रस्ताव दहा वर्षांपूर्वीच केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला होता. मात्र, त्यावर अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही. एन. एस. डी. ही नाट्य प्रशिक्षण देणारी सर्वोच्च संस्था असावी व तिची विभागवार केंद्रे असावीत अशी शिफारस १९८९ मध्ये एम. अक्सर समितीने केली होती. विभागवार, केंद्रांमध्ये दोन वर्षाचा अभ्यासक्रम शिकवला जावा व त्यांनतर पुढील शिक्षण दिल्लीला, तसेच राष्ट्रीय नाट्य विद्यालयाला 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ड्रॅमॅटिक आर्ट्स' असे नाव देण्यात यावे व देशभर त्याच्या शाखा असाव्यात, अशी

शिफारसही केली होती. मात्र या शिफारशींवर अजून निर्णय घेण्यात आलेला नाही.

एन. एस. डी. च्या जडणघडणीत नाटककार मामा वरेरकर यांचे मोठे योगदान आहे. वरेरकर यांच्यामुळेच इब्राहिम अल्काझी यांच्यासारख्या जाणकार संचालक एन. एस. डी.ला प्रारंभीच्या काळात मिळाला. १९५९ साली स्थापन झालेल्या या विद्यालयात महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांची सर्वाधिक संख्या असून सई परांजपे, अरुण जोगळेकर, कमलाकर सोनटक्के, सविता प्रभुणे, सुहासिनी जोशी, अभिराम भडकमकर, कुमार सोहोनी, वामन केंद्रे आदी कलावंत याच विद्यालयातून प्रशिक्षण घेऊन बाहेर पडले आहेत.

कथाविष्कार या रंगमंचीय प्रकाराबद्दल अंकुर म्हणाले की, कथा नाटकात रूपांतरित न करता कथेच्याच स्वरूपात सादर करण्याचा प्रयत्न कथाविष्कार या प्रकारातून केला जातो. अलिकडच्या काळात चांगल्या नाट्यकृती लिहिल्या जात नसल्याची ओरड रंगकर्मींकडून केली जाते. त्यांची ही सृजनशील उर्मी शमवण्यासाठी कथाविष्काराचे माध्यम उपयुक्त ठरेल.

समाजाच्या भवितव्यासाठी लेखकशिक्षकांची गरज

समाजाच्या भवितव्याला आकार देण्यासाठी प्रयोगशील बुद्धीचे नवे लेखक व शिक्षक यांची नितांत गरज आहे. असे विचार प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी पिंपरी येथे व्यक्त केले.

सुयश प्रकाशनाच्या 'पिंपरी-चिंचवड. गाव ते महानगर' या श्रीकांत चौगुले यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन प्राचार्य भोसले यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक डॉ. श्री. श्री. घारे होते. महापालिका आयुक्त अनिल डिग्गीकर, उद्योजक कृष्णकुमार गोयल, इतिहास संशोधक प्र. रा. अहिरराव, उपस्थित होते.

प्राचार्य भोसले म्हणाले की, इतिहासात पूर्वी चांगले लोक होऊन गेले, मात्र आता तसे काहीच नाही असे सांगण्याची वेळ वर्तमानातील माणसावर येत आहे. त्यामुळे इतिहास सांगावा की नाही हा प्रश्न आहे. समाजात चांगले काही घडावे असे वाटत असेल तर काही करू इच्छिणाऱ्यांना मोकळीक देणे गरजेचे आहे. साहित्याची निर्मिती व विचारांची अनुभूती आपल्याला प्रिय आहे. त्यातून समाजाला प्रतिभेचा प्रकाश मिळतो. मात्र नव्या उमेदीच्या लोकांनी त्यात येणे आवश्यक आहे. समाजकल्याणासाठी विधायक कामे करणाऱ्यांची आज गरज आहे. पालकांनीही आपल्या मुलांना हे संस्कार दिले पाहिजेत. माणसाकडे पाहून समाधान वाटेल, असा माणसाचा विकास झाला पाहिजे. त्यामुळे इतिहासापेक्षा वर्तमानात आपापल्या गावातला प्रत्येक माणूस घडत गेला तर तो विकासाचा खरा राजमार्ग ठरेल. चांगले शिक्षक लेखक तयार झाले तर समाजाला आपण चांगली दिशा देऊ शकतो. त्यातून माणसाचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्याचे मोलाचे काम होऊ शकते. देश काय आहे हे उगवत्या पिढीला कळायला पाहिजे. त्यासाठी सर्व शाळांनी बाकीचे तास कमी केले तरी चालतील पण मुलांना एकदा कन्याकुमारी ते काश्मीरपर्यंतचा भारत दाखवावा. समाजाच्या भवितव्याला आकार देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

चौगुले यांनी सांगितले की, पिंपरी- चिंचवड गावांचा इतिहास नव्या पिढीपुढे येऊन त्याबद्दल आपुलकी निर्माण व्हावी, हा या पुस्तकाचा उद्देश आहे.

कोलकात्यात दोन साहित्यिकांचा गौरव

कोलकाता येथील 'आपली भाषा' या संस्थेच्या वार्षिकोत्सवात 'जस्टिस शारदाचरण मित्र स्मृति सम्मान'' प्रथम पुरस्कार अलिकडेच मराठी-हिंदीचे गणमान्य समीक्षक मुंबईचे डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर यांना प्रसिद्ध लेखिका महाश्वेता देवी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

भारतीय भाषा परिषद या कोलकत्यातील अग्रगण्य संस्थेतर्फे भारतातील आठ साहित्यिकांचा 'रचना समग्र पुरस्कार' देऊन अलीकडेच गौरव करण्यात आला. मराठीचे गौरवमूर्ती होते प्रख्यात कवि श्री. दिलीप चित्रे. श्रीमती महाश्वेतादेवी यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. या नेत्रदीपक सोहळ्यानंतर ''सद्य:स्थितीची आव्हाने-माझी भूमिका'' या विषयावर झालेल्या चर्चासत्रात श्री. चित्रे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

'कालिदासाला पृथ्वीवर स्वर्ग आणायचा होता'

इंदूरच्या सौ. पद्मजा नातू यांनी लिहिलेल्या 'कालिदास : एक परिचय' या पुस्तकाचे प्रकाशन लोकसभेचे सभापती मनोहर जोशी यांच्या हस्ते इंदूरच्या माई मंगेशकर सभागृहात 'मराठी समाज' संस्थेतर्फे झाले. अध्यक्षस्थानी इंदूरचे महापौर कैलाश विजयवर्गीय हे होते. विशेष पाहुणे म्हणून विक्रम विश्वविद्यालयाचे माजी कुलपती डॉ. प्र. ना. कवठेकर हे उपस्थित होते. कालिदासाच्या कथानकात खलनायक नाहीत. तसेच सूडभावनेलाही जागा नाही. पृथ्वीला स्वर्ग बनविण्याची त्याची मनीषा होती; त्याच दृष्टीने त्याच्या कथानायकांचे आणि देवतांचे संबंध घनिष्ठ असतात याकडे सौ. पद्मजा नातू यांनी लक्ष वेधले आहे, असे ना. मनोहर जोशी यांची सांगितले. (प्रकाशक- सौ. पद्मजा नातू, १६ रेसकोर्स रोड, इंदूर, फोन- २५३५०६७)

नागपूरच्या माग्रसने निवडलेली पुस्तके

गेल्या ३६ वर्षापासून 'माग्रस'द्वारे विविध-व्यवसायातील कुटुंबांचा व्यक्तिगत ग्रंथसंग्रह समृद्ध करून देण्याचे कार्य चालू आहे. उत्तमोत्तम ग्रंथांची निवड करून दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी होणाऱ्या स्नेहभेटीत त्यावर वाचकांसोबत चर्चा होत असते. ग्रंथांचे लेखकही या स्नेहभेटीत आपलेपणाने येत असतात. फेब्रुवारी २००३ पासून प्रारंभ होणाऱ्या स्नेहभेटींमध्ये पुढील पुस्तकांचा समावेश होतो.

१. आणि तरीही मी - सौमित्र (कवितासंग्रह) (पॉप्युलर)

२. प्रारंभ - गंगाधर गाडगीळ (इतिहास) (पॉप्युलर)

३. चाकाची खुर्ची - नासिमा हूरजूक (आत्मकथन) (मेहता)

४. खूप लोक आहेत - श्याम मनोहर (कादंबरी) (पॉप्युलर)

५. भीमसेन - वसंत पोतदार (चरित्र) (राजहंस)

६. कस्तुरबा - शलाका तेजाची. अरुण गांधी- अनु. अशोक जैन (चरित्र) (रोहन)

७. गार्गी अजून जिवंत आहे - मंगला आठवलेकर (चरित्र) (राजहंस)

८. पक्षिकोश - मारुती चितमपल्ली (कोश) (साप्रकेंद्र)

९. उत्खनन - गौरी देशपांडे (कादंबरी) (मौज)

१०. राहीच्या स्वप्नाचा उलगडा - भारत सासणे (कादंबरी) (मौज)

११. जनांचे अनुभव पुसता - मिलिंद बोकील (लेख) (मौज)

१२. एका रानवेड्याची शोधयात्रा - कृष्णमेघ कुंटे (लेख) (मौज)

१३. गान सरस्वती - दत्ता मारुलकर (चरित्र) (श्रीपाद)

१४. त्यानंतर - सानिया (कादंबरी) (नवचैतन्य)

१५. मराठी ज्ञानकोश, ज्ञानकोश रचनाशास्त्र - डॉ. शोभा बुचे (प्रबंध) (श्री मंगेश)

१६. उत्कट जीवघेण्या धगीवर - प्रज्ञा लोखंडे (कविता) (लोकवाङ्मय)

'अमृतानुभवावरील वासुदेव टीका हा टीकेचा आदर्श नमुना'

श्री ज्ञानेश्वरकृत अमृतानुभवावरील अभंगात्मक 'वासुदेवी टीके'चे प्रकाशन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. अशोक कोळस्कर म्हणाले, ''विद्यापीठ एखादे काम करताना शैक्षणिक बाजू सर्वप्रथम पाहते; पण सामजिक दृष्टिकोनातूनही विचार व्हायला हवा. याच भूमिकेतून विद्यापीठाने संत व्यासपीठ सुरू केले आहे.''

प्रा. सदानंद मोरे यांनी रामदास आणि वारकरी संप्रदायातील देवाणघेवाण स्पष्ट केली. ज्ञानेश्वरांनी अमृतानुभवमध्ये शक्यतेची आणि इष्टतेची सिद्धता व्यक्त केली, असे सांगून मोरे म्हणाले, की यावर रामदास पंथाच्या वासुदेव देशपांडे यांनी पहिले अभंगात्मक भाष्य लिहिले.

वा. ल. मंजूळ म्हणाले, मासिकाच्या पानाएवढी १५०० पाने मूळ टीका होती. दीड फूट उंचीचा हा ग्रंथ होता. त्यातील ८०० पानी ओवीबद्ध अभंग तपासण्याकरिता दीड दोन वर्षे लागली. वासुदेवी टीका छापण्यास श्री ज्ञानेश्वर संस्थान व पुणे विद्यापीठ यांनी केलेल्या साहाय्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

बातमीतल्या माणसाचा वेध घेणाऱ्या पत्रकाराचे 'गेटवे' प्रकाशित!

प्रकाश जोशी हे माणसाकडे, जीवनाकडे पाहण्याची विशेष दृष्टी असलेले पत्रकार आहेत. त्यांची दृष्टी हीच त्यांची भाषा आहे, असे गौरवोद्गार कवी मंगेश पाडगावरकर यांनी काढले.

टाइम्स ऑफ इंडियाचे पत्रकार प्रकाश जोशी यांच्या 'गेटवे' या पुस्तकाचे प्रकाशन पत्रकार भवनात मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते झाले. प्रकाश जोशी हे निव्वळ बातमीचा वेध घेणारे पत्रकार नाहीत, तर ते बातमीतल्या, बातमीबाहेरच्या माणसाचाही शोध घेतात, असे सांगून पाडगावकर म्हणाले की, त्यांच्यातील तत्त्वज्ञ या लेखनातून प्रकट होतो.

'आज दिनांक' या सायंदैनिकातील निवडक लेखांचे हे संकलन लोकमुद्रा प्रकाशनाने काढले आहे. हे लेखन वाचल्यावर मुंबईचे आत्मचरित्र वाचल्याचे समाधान मिळते, असे महाराष्ट्र टाइम्सचे संपादक भारतकुमार राऊत म्हणाले. मुंबई इतर अनेकांनी वापरली, प्रकाशने मात्र तिच्यावर प्रेम केले असेही ते म्हणाले. संवेदनशील पत्रकाराने लिहलेले गद्यकाव्य अशा शब्दांत मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी 'गेटवे' चा गौरव केला. मुंबईत बॉंबस्फोटाची मालिका घडल्यानंतर शहरातील वेगवेगळ्या घटकांकडे त्यांनी बघितल्याचे त्यांच्या लिखाणातून जाणवते. लेखक प्रकाश जोशी यांनी आपली पत्नी आणि 'लोकमुद्रा'चे कपिल पाटील यांना या लेखनाचे श्रेय दिले. पुस्तकातील 'चालणारा

पोपट' हा लेखही वाचून दाखवला.

जीवनाच्या निर्मितीबाबतचे उत्तर गीतेतून मिळते

''विज्ञानाने कितीही क्षेत्रे व्यापली, तरी त्याला मर्यादा आहेत. जीवनाची निर्मिती कशासाठी, या प्रश्नाचे उत्तर विज्ञानाकडे नाही. त्याचे उत्तर गीतेसारख्या ग्रंथातूनच मिळते.'' असे मत राष्ट्रीय जलविकास प्रकल्पाचे अध्यक्ष सुरेश प्रभू यांनी व्यक्त केले.

प्रणवतीर्थ चॅरिटेबल ट्रस्टने प्रसिद्ध केलेल्या व डॉ. अनुपमा क्षीरसागर यांनी संपादिलेल्या 'प्रणवगीताई' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. शालेय शिक्षण सचिव जयराज फाटक यांनी पुस्तकाचे प्रकाशन केले. ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. अशोक मराठे या वेळी उपस्थित होते.

श्री. प्रभू म्हणाले, ''जन्माचे फलित काय, हा प्रश्न अर्जुनाला पडला तेव्हा श्रीकृष्णाने त्याला ज्ञान दिले. आजही या गीतेतून श्रीकृष्ण सगळ्यांना उपलब्ध आहे. ही गीता सामान्यांपर्यंत पोचावी म्हणून विनोबांनी 'गीताई' लिहिली. श्रीमती क्षीरसागरांनी 'प्रणवगीताई'द्वारा विनोबांचाच वारसा पुढे नेला आहे.''

'संत तुकारामांच्या अभंगांवरील नाट्यकृती रंगमंचावर आणणार'

''संत तुकाराम महाराज यांच्या पाच क्षेपक अभंगांवर आधारित एक अभिनव नाट्यकृती आपण लवकरच मराठी रंगमंचावर आणणार असून, तिचे निरूपण आपण स्वत: करणार आहोत,'' अशी माहिती प्रसिद्ध नाट्यचित्र अभिनेते व दिग्दर्शक सदाशिव अमरापूरकर यांनी दिली. मराठी रंगभूमीवरील या नव्या प्रयोगाची माहिती देताना ते म्हणाले,''मी खूप वर्षांनी नाटक करीत आहे व त्याचा आनंद इतरांना मिळावा, हा हेतू आहे. या प्रयोगाची संहिता आनंद जातेगावकर यांची, दिग्दर्शन विजय केंकरे यांचे व निर्मिती 'सुयोग'ची आहे. या प्रयोगाचा फॉर्म भारतीय असला, तरी तो कीर्तन अथवा प्रवचनाचा नाही. सुमारे अडीच तासांच्या या कार्यक्रमाचे दृक्‌श्राव्य सादरीकरण रंगमंच व पडद्यावर होत राहील. कलारंजनातून संतांचे शाश्वत व त्रिकालाबाधित विचार लोकांपर्यंत पोचविले जावेत, असा प्रयत्न आहे. कालौघात नामशेष झालेली रोमन संस्कृती आज युरोपात काही चालीरीतींच्या स्वरूपात जिवंत आहे. भारतीय संतांचे अभंग विचार भावी शतकातील बदलातही असेच तग धरून कायम राहतील. त्या दृष्टीने हे विचार नाट्यबद्ध करणे महत्त्वाचे ठरणार आहे.''

या वर्षी प्रकाशित होणारा आपला 'वास्तुपुरुष' हा मराठी बोलपट प्रेक्षकांच्या पसंतीला पडून, तो यंदाची शासनाची अनेक बक्षिसे मिळवेल, असा विश्वास श्री. अमरापूरकर यांनी व्यक्त केला. ''सुमित्रा भावे निर्मित '१० वी फ' हा चित्रपट अनपेक्षितपणे मोठा व्यवसाय करून गेला आहे. त्याची हिंदी आवृत्ती आता निघण्याच्या बेतात आहे. मुंबईहून प्रेक्षक स्वतंत्र बस करून तो पाहायला पुण्याला येतात.'' असे सांगून ते म्हणाले, ''मराठी निर्माते अजूनही भिकारपणे करकपातीच्या मागे लागले आहेत. त्यांना '१० वी फ'ने चपराक दिली. चांगले चित्रपट काढले, तर ते आजही चांगले चालतात. 'नर्मदा बचाव' आंदोलनाच्या प्रचारासाठी नाट्याचा फॉर्म वापरला गेला. आज मात्र पथनाट्यांना राजकीय पक्षांचा वास येतो. आपले हिंदी व इंग्रजीतील सात-आठ चित्रपट आता प्रदर्शित होण्याच्या मार्गावर आहेत.''

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ वार्ता

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाची पंचवार्षिक निवडणूक होऊन दि. १ एप्रिल २००३ पासून नवीन कार्यकारिणीने संघाचे काम पाहण्यास सुरुवात केली. नवीन कार्यकारिणीच्या पहिल्या बैठकीत पदाधिकाऱ्यांची निवड झाली; कामाचे वाटप कारण्यात आले. या बैठकीस निवडणूक अधिकारी म्हणून काम केलेले श्री गजाभाऊ क्षीरसागर हेही उपस्थित होते.

मिलिंद परांजपे (ज्योत्स्ना प्रकाशन) व प्रदीप चंपानेरकर (रोहन प्रकाशन) यांना स्वीकृत सदस्य म्हणून कार्यकारिणीवर घेण्यात आले. नवीन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे.

अध्यक्ष	श्री. शरद गोगटे (शुभदा सारस्वत)
उपाध्यक्ष	१. सौ. शशिकला उपाध्ये (चंद्रकला प्रकाशन)
	२. श्री कृष्णकुमार ठोकळ (श्री लेखन वाचन भांडारे)
कार्याध्यक्ष	श्री. सुनील मेहता (मेहता पब्लिशिंग हाऊस)
कोषाध्यक्ष	श्री. मिलिंद परांजपे (ज्योत्स्ना प्रकाशन)
कार्यवाह	१. श्री. सुनील अंबिके (मंजुळ प्रकाशन)
	२. श्री. ल. म. कडू (गमभन प्रकाशन)
सदस्य	श्री मकरंद कुलकर्णी (साहित्य प्रसार केंद्र, नागपूर)
	श्री. प्रदीप चंपानेरकर (रोहन प्रकाशन)
	श्री. निषाद देशमुख (करियर पब्लिकेशन, नाशिक)
	श्री. जिग्नेश फूरिया (प्रगती बुकसेंटर, पुणे)
	श्री. राजीव बर्वे (दिलीपराज प्रकाशन)
	श्री. सुकुमार बेरी (अभिनव पुस्तक मंदिर, पुणे)
	श्री. राजेंद्र मंत्री (अनुभव प्रकाशन, मुंबई)
	श्री. हरिभाऊ लिमये (लिमये विश्वप्रकाश पब्लिकेशन)

पहिल्या बैठकीमध्ये नागपूर विभागाचे काम श्री. मकरंद कुलकर्णी यांनी, नाशिक विभागाचे काम निषाद देशमुख यानी तर मुंबई विभागाचे काम राजेंद्र मंत्री यांनी पाहावे असे ठरले. ग्रंथप्रदर्शनांची विशेष जबाबदारी सुकुमार बेरी यांच्याकडे सोपविण्यात आली. प्रेसॲक्ट नुसार प्रकाशकांनी विविध ग्रंथालयांना जी पुस्तके पाठवायची असतात, ती संघामार्फत पाठवायची जबाबदारी सुनील मेहतांनी स्वीकारली आहे. ग्रंथविषयक विविध सरकारी योजनांची माहिती मिळवून ती संघाच्या सदस्यांना कळविण्याचे काम मकरंद कुलकर्णी करणार आहेत. आपल्या संघातर्फे प्रकाशकांसाठी निर्मिती पुरस्कार देण्याची योजना असून अनिल मेहता व प्रदीप चंपानेरकर या समितीचे काम पहणार आहेत.

नव्या वर्षातील पहिला कार्यक्रम दि. २३ एप्रिलला जागतिक पुस्तक दिनानिमित्त संपन्न झाला. अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ व पाथफाइंडर ग्रंथविक्रेते यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा. अविनाश बिनीवाले यांचे 'पुणे, पुस्तके व मराठी' या विषयावर व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचा लाभ पुस्तकप्रेमींनी घेतला.

संघाच्या विद्यमान सदस्यांनी आपली वार्षिक वर्गणी त्वरित भरावी व जे प्रकाशक अद्याप सदस्य झाले नसतील त्यांनी सदस्य होऊन संघाच्या कार्यात सहभागी व्हावे. असे आवाहन करण्यात आले आहे.

पुस्तक परिचय

स्वप्नाकडून सत्याकडे...

लेखिका : माधुरी शानभाग

पहिली भारतीय अंतराळवीर स्त्री

कल्पना चावला



'पहिली भारतीय अंतराळवीर स्त्री' म्हणून कल्पना चावला हिचा भारतीयांना अभिमान वाटतो. १ फेब्रुवारी २००३ रोजी कोलंबिया यान पृथ्वीकडे झेपावताना अपघातग्रस्त झाले आणि कल्पना चावलाचाही त्यात बळी गेला, या घटनेने प्रत्येक भारतीयाला हळहळ वाटली. 'स्वप्नाकडून सत्याकडे जाणारा मार्ग अस्तित्वात आहे. फक्त तो शोधायची दृष्टी आणि धैर्य तुमच्या अंगी असायला हवे' असे २५ जानेवारी २००३ रोजी कोलंबिया अवकाशयानातून पाठवलेल्या संदेशात तिने म्हटले होते; आणि 'अवकाशात प्रचंड वेगाने त्या पोकळीत फिरण्यामधली रोमांचकता मला पुन:पुन्हा भोगावीशी वाटते; मृत्यू सतत आपल्या आसपास घोटाळत असतो, पण तो तर सर्वत्र आहे. आणि धोका पत्करणे हा आमच्या कामाचा एक भाग आहे. कोणत्याही आनंदाची किंमत कशाना कशा रूपात द्यावीच लागते.' असे एका मासिकाला दिलेल्या मुलाखतीत तिने आधीच म्हटले होते. त्यामुळे तिच्या या धीरोदात्त वृत्तीबद्दलचा आदर अधिक दाट होतो.

नामवंत कथाकार माधुरी शानभाग यांना कल्पना चावलाच्या व्यक्तिमत्त्वाने भारावून टाकावे यात नवल नाही. अगदी अल्प अवधीत इंटरनेट व वृत्तपत्र-साप्ताहिकांतून आलेले तपशील यांच्या आधारे कल्पना चावला हिच्या जीवनचरित्राचा वेध घेणारे छोटेखानी पुस्तक त्यांनी लिहून पूर्ण केले; आणि मेहता पब्लिशिंग हाऊसने ते तितक्याच त्वरेने छापून मराठी वाचकांपुढे ठेवले आहे. 'कर्नाल ते केप कॅनव्हेराल', 'निळ्या नभाच्या पलीकडे' आणि त्यानंतर अशा तीन प्रकरणात हे पुस्तक विभागलेले आहे.

कर्नाल (पंजाब) येथे १ जुलै १९६१ रोजी कल्पनाचा जन्म बनारसीलाल व संयोगिता यांच्या घरात झाला. बिन्री मिलच्या कपड्यांचे विक्रेते आणि नंतर 'सुपर टायर्स' उत्पादक म्हणून बनारसीलाल यांनी जम बसवला होता. कल्पना ही सर्वात धाकटी मुलगी. सुनीता व दीपा या दोन बहिणी आणि संजय हा भाऊ. सर्व मोठे. कर्नालच्या टागोर बालनिकेतन शाळेत तिची गणना हुशार विद्यार्थिनींमध्ये होई. सायकलवरून वेगाने दौडत जाणे तिला आवडे. तब्येतही टुणटुणीत; त्यामुळे तिला सगळेजण मोटू म्हणत. भरतनाट्यम, कराटे, पिकनिक,

'स्वप्नाकडून सत्याकडे जाणारा मार्ग अस्तित्वात आहे. फक्त तो शोधायची दृष्टी आणि धैर्य तुमच्या अंगी असायला हवे.

खेळ, यात तिला रस वाटे. विज्ञानाची तिला आवड होती. तिचा मोठा भाऊ कर्नालच्या फ्लाइंग क्लबमध्ये जात असे. त्यामुळे मला वैमानिक व्हायचे असे ती म्हणे. त्याप्रमाणे चंदीगडच्या पंजाब इंजिनिअरिंग कॉलेजात एरॉनॉटिक्सला तिने प्रवेश मिळवला. तेव्हा तिच्यासोबत राहण्यासाठी आईनेही आपला मुक्काम चंदीगडला हलवला. इंजिनिअरिंगच्या शेवटच्या परीक्षेत कल्पना उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाली. कॉलेजने तिला लेक्चररशिप देऊ केली. पण कल्पनाने अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी जायचे नक्की केले. टेक्सास विद्यापीठात एरॉनॉटिक्स विभागात तिला प्रवेशही मिळाला. ऑगस्ट १९८२ मध्ये तिने अमेरिकेत एरोस्पेस इंजिनियरिंगचा अभ्यास सुरू केला. तेथे जीन पियरे (जेपी) या फ्रेंच तरुणाकडून तिने विमान चालवण्याचे प्रशिक्षण घेतले. स्कूबा डायव्हिंग - म्हणजे पाणबुड्याप्रमाणे खोल पाण्यात विहार करण्याचे तंत्रही हस्तगत केले. १९८४ मध्ये कल्पनाने जेपीशीच लग्न केले; आणि कल्पनाचा नवरा तसेच जिवलग मित्र म्हणून जेपीने कल्पनाच्या चौफेर प्रगतीसाठी कंबर कसली. टेक्सासमधून एम. एस. झाल्यावर तिने कोलोरॅडो युनिव्हर्सिटीत एरोस्पेस इंजिनियरिंगवर प्रबंध लिहिला. त्याच सुमारास चॅलेंजर या अवकाशयानाचा १९८६ मध्ये उड्डाण केल्याबरोबर स्फोट झाला. सात अंतरिक्षवीरांचा बळी गेला.

१९८८ मध्ये डॉक्टरेट पूर्ण करून, 'नासा' मध्ये संशोधन विभागात संशोधकाच्या नोकरीसाठी तिने अर्ज केला. अमेरिकेची अंतराळयाने नासाद्वारेच तयार केली जातात आणि अवकाशात सोडली जातात. त्यात आपला सहभाग हवा हे कल्पनाने मनोमन ठरवून, अनेक कठीण चाचण्यांमधून यशस्वीपणे पार पडून 'नासा'मध्ये संशोधकपद हे मिळवलेच! संशोधनापेक्षाही प्रत्यक्ष अंतरिक्षयानातून या विशाल विश्वाचे अवलोकन करायची जिद्द तिला सतत प्रेरणा देत होती. १९९४ मध्ये तिची अवकाशयात्री विभागात नेमणूक झाली. बौद्धिक तसेच भावनात्मक गुणांकांचा विकास करणे, सहकाऱ्यांशी सुसंवाद राखून एकदिलाने काम करणे, कणखर आणि समतोल मनाने प्राप्त परिस्थितीला सामोरे जाणे, आणीबाणीच्या वेळीही स्थिर बुद्धीने निर्णय घेऊन योग्य ती कृती करणे, वगैरे बाबींकडे तेथे विशेष लक्ष दिले जाते.

नासामध्ये कल्पना चावला केसी या आद्याक्षरांनी ओळखली जाई. १९९५ मध्ये ह्युस्टन मधील लिंडन जॉन्सन स्पेस सेंटर येथील प्रशिक्षण केंद्रात तिला धाडण्यात आले. अवकाशयानाची तांत्रिक माहिती देऊन, यान चालवण्याचे 'व्हर्च्युअल' प्रशिक्षण तेथे देण्यात आले. संगणकाच्या सहाय्याने अवकाशयानाच्या प्रतिकृतीवर प्रात्यक्षिके घेण्यात आली. कोणत्याही यंत्रणेत काहीही बिघाड झाला तर तो दूर कसा करावा, उड्डाण करताना व उड्डाण संपवून पृथ्वीवर उतरताना अवकाशयानाच्या वेगात अल्पवेळात जो प्रचंड बदल होतो, त्याला तोंड कसे द्यावे, स्नायूंच्या हालचालींवर नियंत्रण कसे ठेवावे, कृत्रिमरीत्या शून्य गुरुत्वाकर्षण निर्माण करून, त्यात विविध हालचाली करण्याचा सराव करणे, वगैरे बाबींचे ज्ञान व प्रशिक्षण यांचा अंतर्भाव या स्पेस

संशोधनापेक्षाही प्रत्यक्ष अंतरिक्षयानातून या विशाल विश्वाचे अवलोकन करायची जिद्द तिला सतत प्रेरणा देत होती.

सेंटरच्या अभ्यासक्रमात असतो. हा अभ्यासक्रम चालू असतानाच तिची निवड कोलंबिया यानाच्या नोव्हेंबर १९९७ मधील अंतरिक्षयात्रेसाठी झाला; आणि कल्पनाच्या स्वप्नपूर्तीचा क्षण समोर येऊन ठेपला.

दरम्यान तिने अमेरिकन नागरिकत्व स्वीकारले. तिचा नवरा जीन पियरे हा फ्रेंच; पण त्यानेही अमेरिकन नागरिकत्व स्वीकारले. १९९२ मध्ये या दांपत्याने भारताला भेट देऊन नातलग, शाळा कॉलेजमधले शिक्षक व मित्र, गावकरी यांच्या गाठीभेटी घेऊन पूर्वस्मृतींना ताजे तरतरीत केले. नवे भावबंध निर्माण केले. कोलंबियातून उड्डाणाच्या आधी काही दिवस तिला आपल्या नातलगांसमवेत घालविण्याची संधी मिळाली. उड्डाणाच्या वेळी निरोप देण्यासाठीही तिची भावंडे अमेरिकेत आली होती.

१९ नोव्हेंबर १९९७ रोजी कोलंबियाने अवकाशात उड्डाण केले. शून्य वेळेनंतर पन्नासाव्या सेकंदाला ताशी ११०० किलोमीटर वेग गाठला. पुढच्या सातआठ मिनिटात तो १८ हजार किलोमीटर झाला. मधली द्रव इंधन टाकी सुटी होऊन जळत खाली पडल्यावर तो वेग २८ हजार किलोमीटर झाला; आणि यानाच्या पृथ्वीभोवती प्रदक्षिणा सुरू झाल्या. सोळा दिवसांची ही मोहिम होती.

या मोहिमेत कल्पनाकडे स्पार्टन हा ३००० पौंड वजनाचा उपग्रह सोडण्याचे काम होते. या उपग्रहाने पुढे सूर्याच्या बाह्य वातावरणाची छायाचित्रे घेऊन त्यांचे पृथक्करण करून संगणकीय नोंदी करून, त्या विद्युतसंदेशात रुपांतरित करून पाठवायच्या - अशी योजना होती. (परंतु स्पार्टनवरून हे संदेश अपेक्षेप्रमाणे आले नाहीत. मात्र कल्पनाने ते सोडण्याचे काम व्यवस्थित केले; त्यावर नियंत्रणही प्रस्थापित केले.)

कोलंबियातून कल्पनाने भारताचे त्यावेळचे पंतप्रधान इंदरकुमार गुजराल यांच्याशी फोनद्वारे संपर्क साधला. त्यांनी विचारले, ''तिथून पृथ्वी कशी दिसते आहे?''

''अवकाशातल्या एका धुळीच्या ठिपक्यासारखी.''

''सितारोंसे आगे और भी जहाँ है'' असे म्हणून पंतप्रधानांनी विचारले. ''तू भारतात कधी येणार?''

''मोहिमेवरून परतल्यावर.''

''आम्हाला तुझ्या यशाचा अभिमान वाटतो...देशाच्या शिरपेचात तू मानाचा एक तुरा खोवला आहेस. तुझे अभिनंदन.''

पाच डिसेंबर १९८७ रोजी हे अवकाशयान पुन्हा पृथ्वीवर उतरले. या सोळा दिवसात कोलंबियाने पृथ्वीभोवती २५२ फेऱ्या मारल्या. एक कोटी किलोमीटर अंतर कापले. पृथ्वीपासून दीडशे किलोमीटर उंचीवर ते होते.

'आपल्या आकाशगंगेशी माझे नाते जडले आहे. शरीर फुलासारखे हलके बनले आहे. मी म्हणजे माझे शरीर नसून फक्त माझे मन,माझी प्रज्ञा आहे.'

परतल्यावर स्पार्टन उपग्रह सक्रिय का होऊ शकला नाही याचा शोध घेण्यात आला. पहिल्याच टप्प्यात एक तांत्रिक त्रुटी राहिल्याचे लक्षात आले.

कल्पना ही उत्तम अवकाशयात्री आहे असे सर्वांनीच मान्य केले.

कोलंबिया एस टी एस १०७ या मोहिमेसाठी इ. स. २००० मध्ये पुन्हा कल्पनाची निवड झाली. या दुसऱ्या उड्डाणाची ही दीर्घकाळ तयारी करावी लागली. इ. स. २००३ मध्ये १६ जानेवारी रोजी पहाटे कोलंबियाने उड्डाण केले. कल्पना यावेळी कमांडर व फ्लाइट इंजिनियरच्या खुर्चीत बसलेली होती. नेमून दिलेले ऐंशीपेक्षाही जास्त प्रयोग तिने सुरळीत पार पाडले. इथून वजनरहित अवस्थेत नव्वद मिनिटात एक पृथ्वीप्रदक्षिणा पूर्ण होते; ''कर्नाल, भारत, अमेरिका, पृथ्वी, सूर्यमाला यापलीकडे जाऊन आपल्या आकाशगंगेशी माझे नाते जडले आहे, शरीर फुलासारखे हलके बनले आहे. मी म्हणजे माझे शरीर नसून फक्त माझे मन, माझी प्रज्ञा आहे.'' असे तिने कळवले.

''केव्हातरी ताऱ्यांजवळ पोचायच्या स्वप्नाचे बीज माझ्या मनात पेरले गेले. आता ते स्वप्न प्रत्यक्षात उतरले आहे.''असेही समाधानाचे उद्‌गार तिने काढले...

१ फेब्रुवारी रोजी कोलंबिया सकाळी ९ वाजून १६ मिनिटांनी पृथ्वीवर उतरणार होते. पण आठ वाजून ५३ मिनिटांनी या यानाच्या यंत्रणेची माहिती नियंत्रणकक्षावरील संगणकाच्या पडद्यावरून नाहीशी झाली; त्यानंतर तीन मिनिटांनी डाव्या बाजूने तीन तपमापक त्या पडद्यावर दिसेनासे झाले...आणि नऊला एक मिनिट असताना 'कमांडर रॉजर' याचा ''आम्हाला फक्त एकाच नियंत्रकाकडून माहिती मिळत आहे'' असा संदेश आला - आणि - जमिनीपासून सुमारे साठ किलोमीटर उंचीवर असताना कोलंबियाचा स्फोट होऊन त्यातील सर्व प्रवासीही ठार झाले.

...कल्पना चावलाचे हे जीवनचरित्र सर्वांनाच प्रेरणादायक वाटेल.

माधुरी शानभाग यांनी कल्पनाचे कुटुंब, शाळा कॉलेजमधील शिक्षण, अमेरिकेतील डॉक्टरेट, वैमानिक व नासामधील प्रशिक्षण, विवाह, पहिली कोलंबिया मोहिम, शेवटची मोहिम यांची तांत्रिक माहिती वगैरे सर्व तपशील अत्यंत नेमके व नेटके संकलित केले आहेत. कल्पना हा येणाऱ्या पिढ्यांपुढे एक रोल मॉडेल राहील; विज्ञाननिष्ठ पिढीच्या निर्मितीसाठी ती सतत स्फूर्ती देत राहील हे त्यामुळे वाचकांच्या मनावर ठसेल. प्रत्येक घरात कुमारकुमारींना हे पुस्तक दिले गेले पाहिजे.

पृष्ठे : ६८ किंमत :४० रु. सभासदांना : ३० रु. पोस्टेज : २० रु.

चेहऱ्यामागचे चेहरे

लेखक : महादेव मोरे

दुःख, वेदना, दारिद्र्य, होरपळ सहन करूनही जगण्याची जीवापाड धडपड करणाऱ्या तळागाळातल्या माणसांची जिद्द

'चेहऱ्यामागचे चेहरे' या पुस्तकात महादेव मोरे यांनी आपल्याला भेटलेल्या ४५ नमुनेदार व्यक्तींच्या अंतरंगाचा वेध घेण्याचा आणि त्यातील नाट्यपूर्ण संगती-विसंगती पेश करण्याचा घाट घातलेला आहे. 'पुढारी'मध्ये दोन वर्षांच्या कालावधीत ही व्यक्तिचित्रे त्यांनी सदररूपाने सादर केली; आणि निपाणी-कोल्हापूर परिसरातील विविध स्तरातील जीवनाचे बहुरंगी पैलू प्रकट केले.

'धंदा' या पहिल्याच लेखात आपल्याला भेटतो तो बाजारच्या दिवशी भीक मागत हिंडणारा संगाप्पा. ''बायलीड फिरून फिरून पेकाटं ढिल्ली झाली. मोरेदादा, पैलंगत आता अंगात शिताफी ऱ्हायली न्हाई. जरा फिरलं की दमगीर व्हायला व्हते.'' म्हणणारा हा संगाप्पा भीक मागून महिन्याला दोन अडीच हजारांची कमाई सहजपणे करतो - हे ऐकून मोरेदादा चक्रावून जातो. त्याची मुले मोठी झालेली आहेत, चांगली नोकरदार आहेत. श्रीमंत आहेत. भीक मागण्याचा हा धंदा सोड असं ती बापाला सांगतात. पण संगाप्पा त्याला तयार नाही. तो म्हणतो, ''आपुन कमावतोय तंवरच आपली पोझीशन. तंवरच आपलं आपल्या घरात महत्त्व. आपुन कमवायचं बंद केलं की आपली काय पोलमी ऱ्हात न्हाई...मी माझा धंदा का सोडू हो? ह्या धंद्यावरच पोरांना मोठं केलंय...'' भीक मागताना फाटकं धोतर, फाटका शर्ट असा पेहराव करणारा संगाप्पा एसटीतून प्रवास करताना परीटघडीचा झकपक शर्ट, धोतर, कोट, पटका अशा टेचात असतो. ''ह्या फाटक्या कपड्यावर कोण मला यस्टीत घुसू दिल व्हय? म्हंजे, माज्या गावास्नं हितवर मला यस्टीतनंच यायला पायजे की!''...भीक मागण्याचा हा धंदा संगाप्पानं आपल्या चलाख बुद्धिकौशल्यानं एकाच गावापुरता मर्यादित न ठेवता ज्या ज्या गावात मोठा बाजार भरतो त्या त्या गावी बाजारच्या दिवशी जायचा परिपाठ ठेवून खूपच विस्तारला आहे हेही मोरे स्पष्ट करतात.

- आपल्या अवतीभवतीच्या अशा सर्वसामान्य माणसांमधील असामान्यत्व महादेव मोरे न्याहाळतात; आणि वाचकांपुढे त्या माणसांचे वेगळेपण उभे करतात.त्या त्या व्यक्तीच्या व्यावसायिक कौशल्याचीही नोंद घेतात. त्यातले बारकावे टिपतात. त्यांच्या घरगुती कौटुंबिक, आर्थिक जीवनातल्या ताणतणावांचा आणि संघर्षांचाही शक्य तेवढा मागोवा घेतात. त्याच्या सुखदुःखाशी समरस होतात. आपला आणि त्या व्यक्तीचा संपर्क-संबंध कसा आला याचाही

मोरे यांच्या या व्यक्तिचित्रांमधून बेळगाव-निपाणीमधल्या गेल्या पन्नाससाठ वर्षातल्या सामाजिक जीवनातल्या परिवर्तनाचा पटच उलगडतो.

उलगडा करतात.

कुस्तीत तरबेज होण्यासाठी मच्छिंदर आणि बजरंग या दोघा पैलवानांची शागिर्दी पत्करून तालमीत जाणाऱ्याला त्यांची पडेल ती कामं करावी लागतात आणि मालिश करणे, थंडाई घोटणे, राखुडी भाजणं याकडेही लक्ष द्यावे लागते. बजरंगसारखा मच्छिंदर कुस्तीत चलाख नव्हता; मद्दडच होता; कुस्ती सुरू झाल्यावर अर्ध्या तासात तो दमात उघडे आणि लव्हारी शाळेतील भात्यागत त्याची छाती आणि पोट धपापू लागे, अरबाट ताकदीच्या जोरावर तो प्रतिस्पर्ध्याला तटवून धरत असे पण अस्मान दाखवत नसे; मग कुस्ती सोडवावी लागे. यासारखे तपशील ही शागिर्दी करणारे महादेव मोरे देतात. मच्छिंदरच्या अंगभर उठलेल्या खांडकांमुळे त्याची होणारी तगमग, त्यांचे उरलेले गोलसर डाग यांचीही व्यथा वेदना रेखाटतात. भरमसाट व्याजानं पैसे देऊन मच्छिंदर गबर होतो; पण पुढं लागीर झाल्यासारखा वेडसरपणे वागू लागतो; रोडावतो, सगळाच इंस्कोट होऊन जातो.'' ऐन भराच्या आयुष्यात मच्छिंदरला असं माणसानं उठवून त्या वरच्या खेळियानं काय मिळविलं, हे त्याचं त्यालाच ठाऊक!'' अशी हळहळ व खंत लेखकाला वाटते.

मोरे यांच्या या व्यक्तिचित्रांमधून बेळगाव-निपाणीमधल्या गेल्या पन्नाससाठ वर्षातल्या सामाजिक जीवनातल्या परिवर्तनाचा पटच उलगडतो.

टॅक्सी धंद्यातील पहिली ॲम्बेसडर कार आणण्याचा मान मिळवणारे गोपाळराव, आणि एका मेस्त्रीच्या भागीदारीत मोटार रिपेअरिंग गॅरेज चालवणारे महादेव मोरे - या दोघांचे मेतकूट जमते. खिशात दहा रुपये नसतानाही गोपाळराव शब्दावर आणि 'धिडफीड' बोलण्यावर हजारो रुपयांची कामं करून घेत. त्यांच्या डाव्या हाताला यश होते. गावात दोन इमारतींची व ट्रक्सची खरेदी त्यांनी डाव्या हातानंच केली. पण त्यांच्यासारखं कर्तृत्व मुलांमध्ये नव्हते. वृद्धापकाळामुळे गोपाळराव धंद्यातून सायडिंगला पडले. ''एखाद्या कुटुंबात एखादाच माणूस कर्तृत्ववान निघतो आणि तो आपल्या अख्ख्या गोतावळ्याला गरिबीच्या गर्तेतून वर काढतो. गोपाळराव हेच कार्य तडीस नेऊन आता पैलतीराकडे पाहत पहुडले होते.'' असे त्यांच्या आयुष्याचे सार लेखक सांगतो.

महादेव मोरे यांच्या 'चेहऱ्या'मध्ये खूपच विविधता आहे.

तमाशातल्या वगासाठी कोर्टसीन लिहून मागते. पारू कऱ्हाडकरीण. 'ऐन पंचविशीच्या गच्च भरलेल्या बांध्याची, मध्यम उंचीची, केतकी वर्णाची...आणि तिचा गळा...तिचा आवाज...गर्भागारातील लख्ख, उजळ समईच्या प्रकाशागत परमेश्वरानं तिच्या गळ्यात गांधार ठेवला होता. ...गळ्यातून बाहेर पडलेला स्वर असा की विधात्याची जादूच वातावरणावर कलाबूत काढत चालली आहे असं वाटावं...' असं तिचं रूप महादेव मोरे यांना जाणवते.

'गारडी म्हटल्यावर चोरटी जात म्हणून कोणी आम्हाला कामावर ठेवून घेत न्हाईत. तवा चोरी करणं हा आमचा धरमच हाय हो दादा! आम्ही पोटासाठीच तर चोरी करताव,

त्या प्रत्येक व्यक्तीची भाषा वेगळी, जीवनशैली वेगळी; जीवनमूल्ये वेगळी, निवतिचा खेळ, नशिबाचा घोळ... दारिद्र्य.. पण जगण्याचा आवेश मात्र अभंग

फसीवताय, पाकीटमारी करताव; आम्ही चोर, खिसेकापू जरूर हाय, पन खून करणारं मुडदेफरास कसाब न्हवं...दादा, दुनियेत खुळ्यांची संख्या जास्त आणि शहाण्यांची कमी हाय; म्हणून तर म्हटलंय. दुनिया झुकती है, झुकानेवाली चाहिये. इथं झुकणारे जास्त, झुकानेवाले कमी. मी झुकानेवाला हाय, हे काय पाप का?'' असे आपल्या खिसेकापूच्या धर्माचे तत्त्वज्ञान सांगणारा सायबू.

गाढवावर सगळं चंबुगबाळं लादून गावोगाव दातकोरण्या, कानकोरण्या विकणारी बेलत्तार जमातीतील चल्लव्वा, संधिवातावर इलाज करणारा वैद्य औरनाळकर,

डोळ्यातील खडे नळी फुंकून काढणारा मुडीकर 'निम्मा वड्डरागत काळा कुळकळीत...ग्रीकशिल्पागत सणसणीत सहा फुटांची रेखीव देहयष्टी..पव्याच्या धारंगत लांबसडक नाक, टपोरे डोळे...ढाण्यावाघागत जबडा...तान्हुल्यागत जोपासलेल्या मिशा आणि त्यांचे कानाच्या दिशेनं चढवलेले आकडे ...स्ट्रीट फायटर मधला चार्लस ब्रॉन्सन...हलीकूमधला अजित...' असा त्यांना दिसतो.

खेड्यापाड्यांवर अस्वल फिरवून, अस्वलाचे केस घालून केलेले ताईत वा गंडे दोरे विकून बक्कळ पैसा मिळवणारा आणि आता सरकारी घरं मिळाल्यानं गावातच स्थायिक होऊन भीक मागत हिंडणारा आणि दारू पिऊन तर्रर होणारा दरवेशी...

पोटाशी दाबून धरलेल्या मटक्यातून निघालेला ठेका आणि जमिनीवर डब घातलेला मटक्यावरचा ठेका, या दोन्हींचे वेगवेगळे नाद उमटवत, मेरा दिल तोडनेवाले, मेरे दिलकी दुवा लेना'चे सदाबहार सूर आळवणारा अंध तरुण गायक -

अश्लीलतेचे पाचसहा खटले ओढवून घेणारा आणि पैसे लाटणारा महाबिलंदर बोलघेवडा हौशी संपादक बाबासाहेब -

भुका लागल्या की एक तिथं दोन वेळा चापून हांदलणारा आणि गावभर टळो करीत फिरणारा 'आधीसारख्या पोटी हल्ली एकाच बापयाला धरून ऱ्हात न्हाईत' असं म्हणत तीन चार बायका करणारा चकनं ईसन्या...

शुभ्र परीटघडी विजार, नेहरूशर्ट, वेगवेगळ्या पावती पुस्तकांनी भरलेली खांद्यावरची शबनम - अशा थाटात फिरणारा आणि चंदा वसुली करणारा, स्मरणिका काढून कमाई करणारा, कुठलीही नोकरी न करता आरामात जगणारा श्रीकांत.

असे अनंक नमुने आणि त्या प्रत्येकाचे आपल्या आयुष्याचे तत्त्वज्ञान, महादेव मोरे प्रकट करतात. त्या प्रत्येक व्यक्तीची भाषा वेगळी, जीवनशैली वेगळी; जीवनमूल्ये वेगळी. नियतीचा खेळ, नशिबाचा घोळ...दारिद्र्य...पण जगण्याचा आवेश मात्र अभंग. लेखक त्या सर्वांकडे करुणार्द्र बुद्धीने, आश्चर्याने, समंजसपणे, अगतिकपणे, साक्षीभावाने बघतो. त्यामुळे यातील अनेक चेहरे आपल्या मन:चक्षूंपुढे घुटमळत राहतात.

पृष्ठे : २२० किंमत :१५० रु. सभासदांना : ११३ रु. पोस्टेज : २० रु.

द गोल्डन गेट

मूळ लेखक : ॲलिस्टर मॅक्लीन

अनु. अशोक पाध्ये

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षालाच ओलीस ठेवून तीस लाख डॉलर्सच्या खंडणीची मागणी होते तेव्हा.... एक भन्नाट थरारकथा



न्यूयॉर्कच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या उत्तुंग टॉवर्सना विमानांनी धडक देऊन, आगीच्या कल्लोळात त्यांना वितळवून टाकणे - यासारखी अचाट कल्पना ही अफलातून डोक्यातूनच निघालेली असणार; आणि त्या कल्पनेला प्रत्यक्ष कृतीचे रूप देतानाही प्रत्येक बारीकसारीक तपशील आधीच नक्की ठरवून, त्यानुसार सारे काही घडवून आणणे यालाही प्रचंड कल्पकता व योजकता दाखवावी लागली असणार - हे निर्विवाद!

गेल्या काही वर्षात अशा विध्वंसक, दहशतवादी कृत्यांचा नंगानाच जगातल्या अनेक देशांना हैराण करीत आहे. बँकांवरील दरोडे, अण्वस्त्रांना लागणाऱ्या तंत्रज्ञानाची चोरी, खंडणीसाठी विमानांचे, वाहनांचे आणि व्यक्तींचे अपहरण, मादक द्रव्यांचा चोरटा व्यापार, आत्मघातकी दहशतवाद्यांनी घडवून आणलेले बाँबस्फोट आणि अपघात, कारगिलसारख्या क्षेत्रात होणारी घुसखोरी, - हेरगिरी- असे विषय घेऊन शेकडो थ्रिलर्स - थरारकथा लिहिल्या गेल्या आहेत. जेम्स बाँडसारख्या व्यक्तिरेखा या रोल मॉडेल ठरल्या आहेत. आर्नोल्ड श्वार्झनेगरसारखे नट अशा भूमिकांमुळे प्रकाशाच्या झोतात आहेत. आणि अशा घटना या आपल्या जीवनाचा अपरिहार्य भाग बनल्या आहेत. प्रत्येक नेत्याला कमांडोंचे संरक्षण लागते. बाँब निकामी करणारी पथके सर्व शहरात ठेवावी लागतात, संवेदनाक्षम ठिकाणी सार्वजनिक सुरक्षाव्यवस्था कडक असते......

अनेक बेस्टसेलर लेखक अशा अद्भुतरम्य, रोमांचकारक कल्पनांभोवती चमत्कृतिपूर्ण कथावस्तूची गुंफण करून वाचकांना चक्रावून टाकत असतात. अनेक चित्रपट असे विषय हाताळत असतात.

कधी कधी हे लेखक किंवा चित्रपट दिग्दर्शक प्रत्यक्ष घटना घडण्यापूर्वीच आपल्या कल्पकतेने आणि कल्पनाशक्तीने त्या रंगवून आपल्या प्रतिभेची साक्ष पटवत असतात. घटना घडून गेल्यावर त्या अनुषंगाने नाट्यपूर्ण कथानकांचे बहुमजली डोलारे उभे करणारे लेखकही अनेक आढळतात. वाचकवर्गाला, प्रेक्षकवर्गाला, या सर्वांचीच भूल पडते.

ॲलिस्टर मॅक्लीन याची 'द गोल्डन गेट' या कादंबरीची मध्यवर्ती कल्पना अशीच भन्नाट आहे. त्याने थेट अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाचे आणि त्याच्या भेटीला आलेल्या दोन अरब तेलसम्राट राष्ट्रप्रमुखांचे अपहरण करून प्रचंड खंडणी मागणाऱ्या टोळीच्या कारस्थानाची कहाणी या कादंबरीत सांगितली आहे.



□ॲलिस्टर मॅक्लीन अशा भन्नाट कल्पनांना नाट्यपूर्ण उत्कंठावर्धक घटना-प्रसंगाद्वारे वास्तवदर्शी कथानकाचा साज देण्यात तरबेज आहे.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाचे अपहरण ही कल्पनाच अत्यंत अतर्क्य आणि बुद्धीला झिणझिण्या आणणारी. प्रचंड सुरक्षाव्यवस्थेमुळे असे अपहरण करणे मूळातच अवघड; त्यातूनही समजा, अपहरण केलेच तर त्या राष्ट्राध्यक्षाला आणि त्याच्या बरोबरच्या अरब राष्ट्रप्रमुखांना- कुठेतरी लपवून ठेवणेही आवश्यक! अमेरिकेचे गुप्तहेर खाते, पोलीसयंत्रणा, सैन्यदल, आरमार, वायुदल हे काही या कालात निमूट बसून बघत राहील असे मानणेही भाबडेपणाचे! तेव्हा अशी काही मध्यवर्ती कल्पना मनाशी नक्की ठरवून, थरारकथेची विश्वासार्ह अशी रचना करणे ही कुठल्याही लेखकाच्या बुद्धिचातुर्याची परीक्षाच मानायला हवी. या अपहरणाच्या मागे असणाऱ्या टोळीत दहा-वीस माणसे तरी असणाच; ते काही एकट्यादुकट्याचे काम नव्हे; त्यांच्यात पूर्ण सुसंवाद व कार्यविभाजन हवे; तसेच अमेरिकेतील घटनेप्रमाणे राष्ट्राध्यक्षाचे अपहरण झाले असता, तो प्रत्यक्षात सत्ताहीनच झाल्याने, सर्व जबाबदारी उपराष्ट्राध्यक्षावर येते; तेव्हा खंडणीसाठी होणाऱ्या वाटाघाटी या उपराष्ट्राध्यक्षाशीच करणे क्रमप्राप्त म्हणजे एकीकडे ताब्यात असलेल्या राष्ट्राध्यक्षाकडे लक्ष देणे आणि दुसरीकडे उपराष्ट्राध्यक्ष व त्याचे सल्लागार सेनादलप्रमुख यांच्याशी वाटाघाटी करणे या दोन्ही आघाड्या सांभाळण्याची गरज. आता हे अपहरण अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाचे! म्हणजे तेथील टीव्हीवाले आणि पत्रकार- ते काय स्वस्थ बसणार? त्यांनाही योग्य ती माहिती देण्याची व्यवस्था हवीच! अपहरणकर्त्यांना आपल्या बाजूने जनमत वळवण्यासाठी या पत्रकारांचीही मर्जी सांभाळणे त्यामुळे अटळ! आणि समजा, खंडणी मिळाली तर ती घेऊन सुरक्षितपणे परदेशात पळ काढणे - याचीही काही योजना हवीच! अशा अनेक बाबींकडे लक्ष पुरवत कथावस्तूचा डोलारा उभा करणे ही काही साधी बाब नव्हे. पण ॲलिस्टर मॅक्लीन अशा भन्नाट कल्पनांना नाट्यपूर्ण उत्कंठावर्धक घटना-प्रसंगांद्वारे वास्तवदर्शी कथानकाचा साज देण्यात तरबेज आहे. 'दि गोल्डन गेट' मध्ये कथानकातील गुंतागुंती लीलया हाताळण्याचे त्याचे कौशल्य पानोपानी दिसते आणि पुढे काय होणार याबद्दलची उत्कंठा क्षणोक्षणी वाढत राहे.

ऑलिस्टर मॅक्लीनच्या कादंबऱ्यांमध्ये सर्वसाधारणपणे एखाद्या प्रचंड महाकाय यंत्रणा आणि तिच्या विरुद्ध दंड थोपटून उभा राहिलेला एखादा माणूस- असा संघर्ष आढळतो. महाकाय यंत्रणा म्हणजे एखाद्या देशाचे सरकार असले वा एखाद्या बहुराष्ट्रीय धनाढ्य कंपनीचे जगड्व्याळ साम्राज्य असेल. अशा मोठ्या बलाढ्य यंत्रणेचे काम ठप्प करण्याएवढे बुद्धिचातुर्य दाखवणारा एखादा माणूस जेव्हा उभा करायचा असेल तेव्हा तो उच्चतम नेतृत्वगुणांनी संपन्न हवाच. परंतु त्याचबरोबर तो जो गुंता निर्माण करतो, तो गुंता सोडवण्यासाठीही तशाच प्रखर बौद्धिक क्षमतेची गरज असणार. त्यामुळे युद्धे, मोठमोठे दरोडे, तस्करी वगैरे घटना हाताळताना खलनायक आणि नायक या दोहोंच्याही वास्तव, विश्वसनीय व्यक्तिरेखा उभ्या करण्याची क्षमता अपरिहार्यच!

'दि गोल्डन गेट' मध्ये अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे अपहरण करण्याची अफलातून योजना आखणारा पीटर ब्रॅन्सन हा तरुण ३८ वर्षे वयाचा आहे. सहा फूट उंच, दणकट, काळे कुरळे केस आणि निळे डोळे यामुळे त्याचे दर्शन कोणालाही प्रसन्न करणारे असते. तो पोलिस नाही,



हे सगळे अशक्य कोटीतले आहे, वेडेपणाचे आहे; असेही वाटत राहते. परंतु ब्रॅन्सनचा आत्मविश्वास इतका दांडगा असतो की वाचकही या योजनेत फसून जातो.

पण पोलिसाचा गणवेश घालतो. त्याचे नाव कुठलाही पोलीस रेकॉर्डमध्ये ठेवत नाही. त्याची ११ जणांची टोळी आहे; आणि पी-वन या नावाने ब्रॅन्सनचा सर्व सहकारी करतात. पी-टू नावाने रेस्टॉन व मॅक यांना वायरलेसवरून संबोधित केले जाते. पी. थ्री गटामध्ये जॉन्सन व ब्रॅडले या दोघांचा समावेश. या टोळीतील प्रत्येक सदस्य हा आपल्या कामात तरबेज आहे.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाला ओलीस ठेवून प्रचंड खंडणी उकळण्याची योजना अत्यंत काळजीपूर्वक आणि जय्यत तयारी करून ब्रॅन्सन आखतो. राष्ट्राध्यक्षांच्या सान फ्रान्सिस्को दौऱ्याची माहिती गुप्तपणे आधीच मिळाल्यावर हॉटेलवरून निघून तेथील गोल्डन गेट या पुलावरून राष्ट्राध्यक्षांची बुलेटप्रुफ बस जाऊ लागली की ती मध्येच अडवायची; आणि तिथेच त्यांना ओलीस ठेवून खंडणीच्या वाटाघाटी करायच्या या दृष्टीने संरक्षण - सुरक्षिततेच्या सर्व तपशिलाची आखणी ब्रॅन्सन करतो, आणि आपल्या सहकाऱ्यांसमवेत त्या घटनेची अनेकदा तालीमही करून घेतो. राष्ट्राध्यक्षाबरोबर असणारे अरब राष्ट्रप्रमुख, सुरक्षा अधिकारी आणि पत्रकार - टेलिव्हिजनचे छायाचित्रकार वगैरेंचा ताफा या सर्वांना आपल्या ताब्यात ठेवणे, त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करणे, त्याबरोबर त्या ब्रिजच्या संरक्षणासाठी तरतूद करणे, रडार यंत्रणा बसवणे, हेलिकॉप्टर तयार ठेवणे, वाटाघाटीसाठी फोन-वगैरे यंत्रणाही कार्यरत ठेवणे- असे अत्यंत हाय टेक - उच्च तंत्रज्ञान वापरून सर्व तपशील ठरवले जातात. राष्ट्राध्यक्ष ज्या बसमधून प्रवास करणार, त्याच सारखी बस - एक लाख डॉलर्स खच करून ब्रॅन्सन खरेदी करतो, आणि तिच्यात संदेशवाहन आणि संरक्षणाच्या दृष्टीने सर्व उपकरणे बसवून घेतो....

हे सगळे वाचताना आपली मती गुंग होते.

हे सगळे अशक्य कोटीतले आहे, वेडेपणाचे आहे; असेही वाटत राहते. परंतु ब्रॅन्सनचा आत्मविश्वास इतका दांडगा असतो की वाचकही या योजनेत फसून जातो.

ब्रॅन्सनने आखलेल्या योजनेप्रमाणे राष्ट्राध्यक्षांची बस गोल्डन गेट ब्रिजवर अडवली जाते; आणि त्यांच्याबरोबरच्या सैन्याधिकाऱ्यानां व कमांडोंना नि:शस्त्र केले जाते; तसेच एफिन त्यांना सांगतो, ''प्लीज रिलॅक्स, जंटलमेन.... या प्रकाराला तुम्ही दरोडा, वाटमारी, अपहरण असे काही नाव देऊ नये... काहीही म्हटले तरी परिस्थितीत फारसा फरक पडणार नाही. जिथे आहात तिथेच आरामात बसून राहा. कसलीही काळजी करू नका...''

राष्ट्राध्यक्ष म्हणतात, ''मी कोण आहे ते ठाऊक आहे? अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षावर बंदूक रोखण्याचे धाडस करत आहात?.....''

''होय - मला ठाऊक आहे ते सारे. तुम्ही अध्यक्ष आहात त्याला तुम्ही तरी काय करणार? मी जसा आहे तसाच वागणार त्याला मी तरी काय करणार? कृपा करून आम्हाला कसलाही त्रास देऊ नका. तुम्ही नीट वागला तर तुम्हाला कसलाही त्रास होणार नाही..''

एफिन नंतर ब्रॅन्सन अध्यक्षांना सांगतो, ''मी ब्रॅन्सन. आपण जरा सुसंस्कृत नागरिकांप्रमाणे वागू या... नीट बोललो तर मला वाटते हा गुंता सुटेल.''



ब्रॅन्सन हा खरे तर गुन्हेगार परंतु तो वाचकांना प्रिय ठरतो. त्याची बुद्धिमत्ता, त्याची कल्पकता, त्याचे स्वभावाचे ज्ञान-सारेच विलक्षण.

अध्यक्ष म्हणतात, ''तुझ्या सारख्या माणसाच्या तोंडातही हे शब्द शोभून दिसत नाहीत. एक चोर, लुटारू, ठग, डल्लेबाज, डाकू दरोडेखोर- तू एक अट्टल गुन्हेगार, तसेच अत्यंत असामान्य गुन्हेगार आहेस. ...मात्र माझ्या सदसद्‌विवेकबुद्धीला आवाहन वगैरे करायच्या भानगडीत पडू नका. बुद्धी मजकडे नाही. मला फक्त हवे ते साध्य करण्याची बुद्धी लाभली आहे.....''

-आणि खंडणीच्या अटी पोलिस प्रमुख हेंड्रिक्सला ब्रॅन्सन सांगतो: सर्व मिडिया पर्सन्सना ही बातमी मिळेल अशी व्यवस्था करा. त्यासाठी पत्रकारांना येथे बोलवा. टीव्ही कॅमेरामनसाठी दोन हेलिकॉप्टर्सची व्यवस्था करा. मला दोन मोबाइल, सेल्फ प्रॉपेल्ड व रॅपिडफायर विमानविरोधी तोफा हव्यात. त्यावर भरपूर दारूगोळा हवा... सैन्यातले इंजिनिअर्स बोलावून त्यांना पुलाच्या दोन्ही बाजूंना भक्कम पोलादी अडथळे उभे करण्यास सांगा.... उत्तम हॉटेल्समधून रुचकर अन्नपदार्थ सर्वांसाठी मागवा...

नंतर पत्रकार परिषद घेऊन तो आपल्या मागण्या जाहीरपणे करतो, ''तीस कोटी डॉलर्स मला अमेरिकन सरकारकडून हवे आहेत. तीनवरती आठ शून्ये..... नाहीतर हा पूल मी उडवून देईन. त्याशिवाय अडीच लाख डॉलर्स या योजनेच्या तयारीसाठी केलेला खर्च......जर पैसे वेळेत न मिळाले तर दर तासाला वीस लाख डॉलर्स या दराने पेनल्टी... नंतर माझ्यावरचे सर्व आरोप मागे घेऊन मला पूर्ण माफी देणे...''

ब्रॅन्सनच्या या मागण्या टीव्हीवर अध्यक्ष, अर्थमंत्री वगैरेंना समोर बसवून चाललेल्या असतात आणि लक्षावधी अमेरिकन नागरिक हे सर्व दृश्य बघत असतात....

गोल्डन गेट ब्रिजवरचे हे नाट्य कसे संपुष्टात येते, ते येथे सांगण्यात मतलब नाही. त्यासाठी कादंबरीच वाचायला हवी.

ब्रॅन्सनचा डाव हाणून पाडण्यासाठी अमेरिकेतील सगळे उच्चपदस्थ अधिकारी, मंत्री, एफबीआयचे वरिष्ठ अधिकारी हे सर्व सतत खल करीत असतात....पण ते सर्व हवालदिल झालेले असतात. काय करावे ते त्यांना कळत नाही. अशा वेळी पत्रकार म्हणून अध्यक्षांच्या बरोबर असणाऱ्या एका व्यक्तीकडून काही संदेश त्या अधिकाऱ्यांकडे जातात; आणि कोंडी फुटते.....

ब्रॅन्सन हा खरे तर गुन्हेगार. परंतु तो ज्या प्रकारे या थरारकथेत समोर येतो, त्यामुळे तो वाचकांना प्रिय ठरतो. त्याची बुद्धिमत्ता, त्याची कल्पकता, त्याचे मानवी स्वभावाचे ज्ञान -सारेच विलक्षण! एक उत्तम थरारकथा म्हणून 'दि गोल्डन गेट' मनात घर करून राहील.

पृष्ठे : ३०४ किंमत :२२० रु. सभासदांना : १६५ रु. पोस्टेज : २० रु.

टी बुक क्लबचे सभासद व्हा आणि उत्तम अनुवादित पुस्तके ५०% सवलतीत मिळवा! अधिक माहिती साठी संपर्क साधा.

मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०

ग्रामीण बोलीचा शब्दकोश

लेखक : द. ता. भोसले

सुवर्णमुद्रांची झळाळी असणारे
ग्रामीण शब्दांचे अर्थसौंदर्य



प्रा. द. ता. भोसले यांनी आपले अध्यापनकार्य करीत असतानाच कथा, कादंबऱ्या यांची मोजकीच निर्मिती करून मराठी साहित्याची सेवा करण्यात आनंद मानला. आता सेवानिवृत्तीनंतर ग्रामीण जीवनाच्याच वेगवेगळ्या अंगांकडे पुन्हा त्यांनी आपली दृष्टी वळवली आहे. 'सकाळ' मध्ये संस्कृतीच्या पाऊलखुणा नावाचे छोटेखानी सदर चालवून त्यांनी आता विस्मृतीत जात असलेल्या प्रथा, रीती, वस्तू, सणउत्सवांच्या खासियती यांच्या स्मृतीला उजाळा दिला. त्या सदरातील लेखांच्या पुस्तकाला पुरस्कारही मिळाला. त्यानंतर लोकसत्तामध्ये ग्रामीण शब्दांवरची छोटी छोटी टिपणे त्यांनी लिहिली. वर्षभरात तीनशे शब्दांवर अशी टिपणे तयार झाली. त्यांचे पुस्तक 'ग्रामीण बोलीचा शब्दकोश' या नावाने मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे बाजारात आले आहे. हा नुसता शब्दकोश नव्हे. केवळ अर्थापेक्षा स्पष्टीकरणात्मक टिपांवर त्यात भर आहे.

डॉ. अशोक केळकर यांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत वापरातील वस्तू आणि वापरातले शब्द - या दोहोंच्या माध्यमातून संस्कृतीची समृद्धी आणि संस्कृतीतील बदल यांची कशी चुणूक दिसते यावर प्रकाश टाकला आहे. पूर्वी शाई लौकर वाळत नसे; तेव्हा टिपकागदाचा वापर करावा लागे. आज रासायनिक शाया द्रुत वेगाने वाळतात; त्यामुळे टिपकागदाची गरज उरलेली नाही. दुसऱ्याची मते सहजगत्या स्वीकारणाऱ्या मुलाला त्याकाळी टिपकागदाची उपमा दिली जाई, तीही आता त्यामुळे कालबाह्य आणि अप्रस्तुत ठरली. वापरातले शब्द असे बदलत जातात किंवा लुप्त होतात. शब्दांच्या अर्थातही बदल होतात; आणि अनेक म्हणी व वाक्प्रचार आपल्या मूळ संदर्भाशिवाय प्रचारात राहून संभ्रम निर्माण करतात... शब्दांच्या माध्यमातून भाषिक आणि सांस्कृतिक इतिहासाचाही मागोवा लागू शकतो; आणि 'जुनी घरंदाज ग्रामीण संस्कृती आणि उंडारलेल्या शहरांपुढे काहीशी ओशाळलेली नवी ग्रामीण संस्कृती या द्वंद्वाकडेही' अधूनमधून नजर जात राहते. डॉ. केळकर यांना या शब्दकोशातून स्मृतिरंजन आणि द्वंद्वदर्शन अशी दुहेरी प्रतीती वाचकांना येईल असा विश्वास वाटतो.

डॉ. द. ता. भोसले यांनीही काही निरीक्षणे नोंदवलेली आहेत.

* बोलींमुळे प्रमाणभाषा समृद्ध व सशक्त होत असते.

* बोलीभाषांकडे निकोप व स्वीकारशील भूमिकेतून न पाहिले तर प्रमाण भाषेच्या वापराला व आविष्कार क्षमतेला मर्यादा पडतात. तिचे भाषाव्यवहारातले स्थान गौण होते आणि बोली



शब्द केवळ संकेत घेऊन येत नाही, संस्कृती व समाजजीवनही घेऊन येत असतो. लोकसंस्कृतीचे जतन या शब्दांतून होते.

भाषेतील शब्दांकडे दुर्लक्ष होते. शब्दरूपी धन मातीत गाडून ठेवलेल्या सुवर्णमुद्रांप्रमाणे निरुपयोगी ठरते.

* प्रमाणभाषेने अशा सुवर्णमुद्रांकडे दुर्लक्ष करणे अनिष्ट होय.

* बोलीभाषेतील शब्दांनी प्रमाणभाषेला श्रीमंती येते. बोलीतले शब्द अत्यंत चपखल व नेमके असतात. त्यांना समर्पक पर्यायी शब्द उपलब्ध नसतो. परंतु असे शब्द वापरात न राहिले तर हळू हळू विस्मृतीत जातात.

* एखादी वस्तू व्यवहारातून बाद झाली की तिचा निदर्शक शब्दही बाद होतो.

* लोप पावलेले शब्द म्हणजे लोप पावलेली आपली संस्कृतीच!

* शब्द केवळ संकेत घेऊन येत नाही, संस्कृती व समाजजीवनही घेऊन येत असतो. लोकसंस्कृतीचे जतन या शब्दांतून होते.

* ग्रामीण बोलीतील अनेक शब्द द्राविडीयन, विशेषत: कानडी भाषेतून आलेले दिसतात. संस्कृतपासून आलेले शब्दही बरेच आहेत.

* ग्रामीण भागात वाढलेल्या पण आता शहरात रुळलेल्या वाचकांना आपल्या आपल्या मातीची, शेतीची, रीतिरिवाजांची आणि जीवनशैलीची आठवण देणाऱ्या या शबदांतून भूतकाळात पुन्हा डोकावण्याची संधी या शब्दांमुळे मिळू शकेल.

डॉ. द. ता. भोसले यानीं या पुस्तकात दिलेल्या ३०० शब्दांचे तसे काही खास वर्गीकरण वगैरे केलेले नाही. त्यातील क्रमवारीमागेही काही सूत्र आहे असे नाही. आरंभी वर्णानुक्रमे शब्दसूची दिली आहे, त्यामुळे नेमका शब्द शोधणे वाचकांना शक्य होईल.

स्पष्टीकरणे व अर्थ देताना व्युत्पत्ती कोश वगैरेंचा ही आधार घेतला आहे. केवळ स्मृतीवर वा संदर्भावर भर देऊनही कुठे कुठे विवरण केले दिसते. उदा. बुरंगाट. पाठ भिजली तरी पोट भिजत नाही, केवळ चिखल अधिक पातळ केला जातो असा पाऊस म्हणजे बुरंगाट.... बूर किंवा बुरंट हे या शब्दाचे मूळ असावे असे विवेचन करून द. ता. थांबतात. अनेक शब्दांचे स्पष्टीकरणही असेच मोघम येते. व्युत्पत्तीबद्दलचे काही अंदाजही अघळपघळ व द्राविडी प्राणायामासारखे वाटतात. उदा. एरू या कानडी शब्दापासून इरड हा शब्द बनला. एरू म्हणजे शेण. गुरांची विष्ठा. गावदरीला पडलेले उष्टेपाके शिळे अन्न खाण्यासाठी गुरांना सोडणे- म्हणजे इरड. या दोहोंचा संबंध जोडणे एकूण कठिणच! शिंदळ, जितराब, डुबलाव, लगोरी यासारखे शब्दही स्पष्ट करण्यासाठी व्युत्पत्तीचा आधार समाधान देत नाही.

घर, शेती, शरीर, जमीन, कपडे, भांडी, दागिने, उपकरणे व वस्तू, खाद्य पदार्थ, खेळ व खेळणी, वजनमापे, स्वभावविशेष, पाऊस-वारा, वार, व्यवसाय, अशा गोष्टींशी संबंधित असणाऱ्या शब्दांमुळे आपल्या ग्रामीण भागातील जीवन शैलीवर वा सामाजिक चालीरीतींवर प्रकाश पडतो......त्यामुळे एखाद्या ललित लेखासारखा पूर्व स्मृतींचा खजिना खुला करणारा हा शब्दकोश आपल्या मनात घुटमळत, घोटाळत राहतो.

पृष्ठे : १५२ किंमत :११० रु. सभासदांना : ८३ रु. पोस्टेज : २० रु.

फुले आणि काटे

जत्रा बालसाहित्याची

अमरावती जिल्ह्यात परतवाडा अचलपूर मागच्या गेल्या महिन्यात बालसाहित्य जत्रेचे आयोजन करण्यात आले होते. त्याच्या उद्घाटनाचे निमंत्रण आले तेव्हा तेथे नेमके काय असेल, याची पुरती कल्पना नव्हती. अचलपूर तालुक्यातच माझे लहानसे खेडे- शिरजगाव बंड- आहे. या वर्षी दिवाळीत घरी गेल्यावर सुट्टीच्या चार दिवसांत अंगणातल्या उन्हात घरातल्या पुस्तकांना, मासिकांना वाळवण दिले. आता किती दिवस ही मासिके घरात ठेवायची आणि कुणासाठी, असे मनाशी म्हणून जुनी मासिके-पुस्तके समोर येईल त्याला देण्याचा सपाटा लावला. दिवाळीत खेड्यापाड्यांमध्ये वाजंत्रीवाले लोक अंगणात वाजंत्री वाजवायला अद्यापिही येतात. या वर्षी त्यांच्याशी बोलणे झाले. तेव्हा त्यांच्यापैकी काही शाळेत जाणारी, आठवी-नववीत शिकणारी मुले होती. त्यांनी आनंदाने भरभर जुने 'किशोर'चे अंक नेले. काही दिवाळी अंक त्यांना दिले. तेव्हा मनात आले की ही मुले काय वाचत असतील?

आज मध्यमवर्गीयांच्या घरातही टी. व्ही. जरूर आहे; पुस्तक नाही. याबद्दल पुस्तकप्रेमी, शिक्षणप्रेमी, लेखक, प्रकाशक सारे बोलताहेत. अशा स्थितीत कुठेतरी कुणीतरी 'बालसाहित्य जत्रा' भरवते आहे, म्हटल्यावर उद्घाटनाचे निमंत्रण स्वीकारणे हे नैतिक कर्तव्य समजून मी गेले आणि स्तिमित झाले. त्या मंडपात दोन दिवस मी आठ-आठ तास बसून होते. भोवती मुले हिंडत होती, पुस्तके पाहत होती, कार्यक्रम बघत होती, गोंगाट करत होती. वेगवेगळ्या स्टॉलमधून भिरीभिरी हिंडत होती. आयोजकांना हेच हवे होते. या जत्रमागे काही निश्चित स्वरूपाचे पूर्वनियोजन होते. कल्पकता होती. मुलांच्या मनांचे, त्यांच्या आवडीनिवडीचे भान होते. शहरातल्या मोठ्या नेहरू मैदानावरच्या मंडपात पुस्तकांचे स्टॉल्स तर होतेच. अमरावतीच्या 'पॉप्युलर'चा, ग्रंथाली, ज्योत्स्ना इत्यादि मुंबईच्या प्रकाशनांचा, 'नवनीत'चा, 'चांदूर बाजार'च्या 'प्रयास'चा स्टॉल होता. मराठी आणि विशेषत: उर्दू पुस्तके कमीच होती. पण त्या विभागात अशी पुस्तके पाहायला मिळणे, हेही त्या खेड्यापाड्यात आलेल्या मुलांचे भाग्यच म्हणावे लागेल. मुलांच्या पुस्तकांचे असे काही जग असते, याची माहिती मुलांनाच काय; पण त्यांच्या पालकांना, गावकऱ्यांना आणि शिक्षकांनादेखील नसली तरी आश्चर्य नाही असा तो सारा प्रदेश आहे. आसपासच्या सात किलोमिटरच्या परिसरातल्या ३५ शाळांचे एक ते सात या वयोगटातले विद्यार्थी शिक्षकांसह त्या जत्रेला भेट देत होते आणि जत्रेत हिंडून पुस्तकांशी संबंधित असे मजेमजेचे केळ, कार्यक्रम अनुभवत होते, हेच मला अप्रूप वाटले. सारे वातावरण जत्रेचे, उल्हासाचे, आनंदाचे होते. पण ही जत्रा साहित्याची होती! नाच, गाणी लहान मुलांची नाटके, लहान मुलांचा सिनेमा, शुद्धलेखन, भाषा, साहित्यनिर्मिती यांची ओळख व्हावी असे कार्यक्रम ठेवलेले होते. त्या भागातल्या मुलांना 'दिंडी' माहीत असणारच, पण 'ग्रंथदिंडी'- आणि तीही मुलांनी काढलेली ग्रंथांची पालखी, झाडांची पालखी त्यांनी प्रथमच पाहिली असणार. जवळच्या खेड्यापाड्यांतल्या शाळांमधून चालत किंवा बसने आलेली मुले गणवेशात होती, पण बहुतेक अनवाणीच होती. पण त्या सर्वांनाच खूप मजा वाटत होती, हे त्यांच्या

लकलकत्या चेहऱ्यावर उमटलेले दिसत होते. पुण्यातील मुलींच्या नेटकी, सुबक हालचालींनी मोहक वाटणारी नृत्ये पाहताना त्यांना नक्कीच काहीतरी नवे पाहत आहोत असे वाटत हाते. लीलाधर हेगडे यांच्या 'वल्हव रं नाव, वल्हवली'च्या सुरात सूर मिसळून गाताना ती थरारली होती. सारी जत्रा म्हणजे त्या मुलांच्या त्या वयातला एक अनोखा अनुभव होता, जो त्यांना आयुष्यभर लक्षात राहील असा होता.

परतवाडा- अचलपूर गावातली मुले एकदा शाळेबरोबर आली. पण काही पुन्हा आली. मला भेटलेल्या एकाने पुस्तक वाचून सारांश लिहिण्याच्या स्पर्धेत भाग घेतला होता, तर दुसऱ्याने 'कोलाज' करून पाहिले होते. बोलक्या बाहुल्यांच्या दालनात झिम्मड होती. आकाशदर्शनाचा स्लाइड शोदेखील त्यांना प्रथमच पाहायला मिळत होता. राघवेंद्र नांदे यांनी 'सर्पमित्र' स्लाइड शो तर दाखवलाच, पण प्रत्यक्ष अजगर, धामण हे देखील मुलांना हाताळण्यास दिले. मुलांना स्पर्धासाठी कागद-पेन्सिली, पोस्टकार्डे दिली होती. मधोमध महाराष्ट्राचा नकाशा होता आणि त्यात थोर साहित्यिकांची गावे दाखवलेली होती. साहित्यिकांची हाताने काढलेली चित्रे खांबाखांबावर लावलेली होती. दोन-दोन तासांनी गटागटाने एकेक शाळा आपापली मुले घेऊन नेहरू मैदानाच्या फाटकाशी थांबत होती. आतल्या बाजूला आदी आलेल्या शाळांचे विद्यार्थी दोन तास मैदानभर भिरभिरत होते. तिथे त्यांना मौज वाटावी अशी खूप दालने होती. शब्दखेळ, पत्रलेखन स्पर्धा, चिखलदरा येथील आस्था वर्गातल्या विद्यार्थ्यांच्या कलाकृती बघणे, कोलाज प्रदर्शन पाहाणे आणि स्वत: निर्माण करणे, 'पुस्तक वाचा, चित्र काढा,' 'पुस्तक वाचा- सारांश लिहा', 'दिलेल्या मजकुरातील चुका शोधा, चित्र बघून मजकूर लिहा, कथा लिहा, दिलेल्या वस्तूची जाहिरात करा, विविध पक्ष्यांची माहिती देणाऱ्या स्लाइडस् पाहा, बोलक्या बाहुल्यांचे नाट्य अनुभवा, वन्य प्राणी रंगवा, ब्रेल लिपी कशी असते ते बघा, ब्रेल वाचून पाहा, अशा काही स्पर्धा होत्या. त्यात पहिल्या-दुसऱ्या-तिसऱ्या क्रमांकाना पुस्तके बक्षीस मिळाली, तर काहींना 'मुखवट्यात चेंडू फेका- पुस्तक जिंका', 'रिंग फेका- पुस्तक जिंका' यांत शुद्धलेखन आणि व्याकरण यांचे भान वाढवणारे तक्ते गळ्यात घालून मुले वावरत होती दोन दिवस. या सगळ्या दालनात मुले हिंडली.

प्रवेशदारापाशी घसरगुंडीवर चढून उंच हात हलवणारी बालके रंगवली होती, ती सर्वांचे स्वागत करीत होती. समोर स्टेज हाते आणि त्यावर काही ना काही कार्यक्रम सुरू होते. मंगल बक्षी, किशोर पाठक, प्रतिमा इंगोले, लीलाधर हेगडे, पुण्याच्या मुलींनीं सादर केलेली शाळेतल्या कवितांवरची समूहनृत्ये, गोंधळ, अमरावतीच्या 'अभिव्यक्ती' संस्थेने सादर केलेले बालनाट्य- 'खोट्याच्या कपाळी गोटा', संध्याकाळी 'भागो भूत' हा मुलांचा सिनेमा आणि शेवटी सुषमा देशपांडे यांचा 'व्हय मी सावित्रीबाई' हा एकपात्री प्रयोग!

या साहित्यजत्रेचे विशेष महत्त्व मला वाटले ते समाजाच्या दुर्बल आर्थिक गटातील मुलांना कधी नव्हे ते हे सारे बघता अनुभवता आले यामुळे! विदर्भात डॉ. पंजाबराव देशमुखांमुळे शिक्षणविषयक जागृती विशेष आहे. शिवाजी एज्युकेशन सोसायटीच्या तर लहानलहान मुलांना 'शायीत' पाठवले जाते. या भागात मुख्य रोजगार हमी किंवा रस्ते, पूल, धरणे बांधणे. बाकी बेकारी, त्यामुळे आर्थिक विपन्नता भरपूर. आता तर घराघरांत आई-बाप मजुरीला वावरात आणि मुले प्राथमिक किंवा माध्यमिक शाळेत! सुटीच्या दिवशी दिवसभर वेटाळात खेळत, हिंडत वेळ घालवणारी. महागाईच्या दिवसात फुकट मिळते म्हणूनच शिकायला मुलांना पाठवले जाते; पण इतर

काही नाही. शाळांमधल्या शिक्षकांकडून जेवढे मिळेल ते आणि तेवढेच. या स्थितीचे भान असलेल्या शिक्षणाधिकाऱ्यांना हाताशी धरून, शिक्षकांना उत्तेजन देऊन, शासकीय यंत्रणेचा उत्तम वापर करून घेऊन खरे तर खेडोपाडी कार्यक्रम राबवले गेले पाहिजेत.

या साहित्यजत्रेची प्रेरणा अमरावतीच्या जिल्हाधिकारी मनीषा वर्मा यांची होती. त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी परिश्रम करून त्यांचा हेतू सफल केला, सिद्धीला नेला. आज महाराष्ट्रात अनेक ठिकाणी तरुण जिल्हाधिकारी येत आहेत. त्यांच्याकडे कल्पना आहेत आणि त्या राबवून घेऊ शकणारी यंत्रणाही! त्यांनी ग्रामीण विभागाकडे, तेथल्या शाळांकडे, उद्याच्या पिढीच्या भवितव्याकडे लक्ष दिले पाहिजे. या जत्रेला 'युनिसेफ'च्या महाराष्ट्रातील अधिकारी विजया चौहान यांनी आर्थिक मदत मिळवून दिली होती.

आनंदाने भारावलेले दोन दिवस मनात साठवून मुले घरोघरी परतली. अशा प्रकारच्या योजना अंमलात आणणारे तरुण, तडपदार, अधिकारी महाराष्ट्राला लाभोत, ही शुभेच्छा मनोमन उच्चारीत मी परतले.

-प्रभा गणोरकर (लोकसत्तावरून)

गोमंतकीय लोकवेदाची शोधयात्रा

१९२२ साली मोशीन्योर सेबस्तियांव रुदोल्फ दाल्गाद या भाषाशास्त्रींनी, कोंकणी भाषेचा भाषाशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्याच्या हेतूने कोकणी म्हणींचा एक संग्रह तयार करून पोर्तुगीज भाषेतून प्रकाशित केला आणि कोकणी साहित्याच्या अभ्यासाची मुहूर्तमेढ रोवली. मोशीन्योर दाल्गाद यांच्या या कार्यानंतर काही जिज्ञासू वा उत्साही व्यक्तींनी या क्षेत्रात उतरण्याचा प्रयत्न केला. आज कला अकादमी, कोकणी अकादमी व मराठी संस्था यांचे या क्षेत्रातील योगदान अनन्यसाधारण आहे. विनायक खेडेकर, पांडुरंग फळदेसाई, राजेंद्र केरकर, पूर्णिमा परब-केतकर, चंद्रकांत गावस, प्रकाश पर्येकार, प्रकाश वजरीकर, स्नेहा महांबरे, अजित पैगीणकर, जयंती नायक आदींनी लोकवेदाच्या विविध जीवनाचा अभ्यास चालविला आहे. त्यातून गोमंतकीय लोकसंस्कृतीचे सर्वांगीण दर्शन घडत असले तरी सखोल अभ्यासाऐवजी याचे बरेचसे हौशी स्वरूप आहे. गोव्याच्या भावविश्वात बरेचसे भिजून चिंब होत झपाटल्यागत ते लिहीत आले आहेत. पण खेडेकर, पांडुरंग फळदेसाई किंवा जयंती नायक यांनी स्वाभाविक जिव्हाळ्याने निरीक्षण-परीक्षण करून लिहिल्याने त्यांचे ग्रंथ लोकसंस्कृतीच्या आकलनासाठी संदर्भग्रंथ म्हणून बरेचसे मौल्यवान ठरले आहेत.

खेडेकर यांनी ललित कलांच्या अभिजात आणि लौकिक अशा अंगांवर लिहिले आहे. गोमंतकाचा कानाकोपरा त्यांनी रसडोळस जिज्ञासेने न्याहाळला आणि म्हणूनच ग्रांथिक साधनांची पुरेशी उपलब्धी नसतानाही क्षेत्रीय अभ्यासाच्या भरभक्कम बैठकीवर गोमंतकीय लोकसंस्कृतीचे हे सांग सायुध शिल्प त्यांनी कला अकादमी प्रकाशित 'लोकसरिता' या ग्रंथात उभे केले आहे.

राजेंद्र केरकर व त्यांच्या पत्नी पूर्णिमा यांनी सत्तरी तालुक्यातील लोकदैवतावर अभ्यास चालविला आहे. गोव्यात अशी दैवते हजारो आहेत. त्यातूनच लोकदैवते म्हणून मानली गेलेल्यांची गणती करणे, त्यांची माहिती मिळविणे हे सोपे काम नव्हे. दैवतांचे उन्नयनीकरण पाहाण्यासारखे आहे. वारूळ हे सांतेर या मातृदैवताचे प्रतीक आहे. सांतेरीला काही ठिकाणी भूमका (भूमिदेवता), माया अशी नावे आहेत. कालांतराने वारुळे झडली व त्यांना मुखवटे लाभले, प्रतिमा तयार झाली.

सांतरे हे नाव अपभ्रष्ट रूप वाटल्याने शांतादुर्गा असे तिचे नामकरण झाले. वेताळ, देवचार हीसुद्धा ग्रामदैवत किंवा लोकदेवतेची रूपे. त्यांचे उन्नयन झाल्यावर त्यांना शिववेताळ, आजा किंवा सांखळेश्वर, सांख्यळयो अशी नावे मिळाली. काही ठिकाणी प्रतिमाशिल्पे आली. त्यांचे पूजारूपही पालटले. गोमंतक हा देवदैवतांनी समृद्ध आहे. पोर्तुगीज राजवटीत अनेक दैवतांचा विध्वंस करण्यात आला. देवळे तोडून तेथे चर्चेस बांधण्यात आली पण अद्याप त्यांची मूलस्थाने कायम आहेत. बहुतेक लोकांचे धर्मांतर झाले. पण धर्मांतरितांची संस्कृती, दैवतविषयक श्रद्धा, भ्रम, विश्वास कायम राहिले. एवढ्या कालावधीनंतरही ख्रिस्ती जीवनात विशेषत: ख्रिस्ती बहुजनसमाजात दैवतांविषयीच्या श्रद्धा कायम आहेत. लोकजीवनाशी संबंध असलेली ब्रह्मा, भूत, देवचार वाठारो, बाराजण, खेत्री, म्हास अशीही दैवते सर्वत्र आढळतात. या अमानवी शक्ती असून शिक्षित वर्गाचाही त्यांच्यावर विश्वास आहे. सत्तरी- काणकोणासारख्या भागात जिवंत मुलाला मृत आईबरोबर पुरण्याचीही प्रथा हल्लीहल्लापर्यंत चालू होती.

गोव्यातील संशोधकांचे बहुतेक काम लोकसाहित्यावर चालले आहे. पण त्यांच्यावर आक्षेप घेतला जातो की, ते निरीक्षणे करून लिहितात तेव्हा प्रत्यक्षात व त्यांच्या लिखाणात बराच फरक जाणवतो. तर काहींचा अभ्यास केवळ शैक्षणिक दृष्टिकोनातून चालतो. त्यांची पुस्तके अगदीच बेचव वाटतात. विनायक खेडेकर यांच्या मते, लोकवेदावर भारंभार लिहिणारे बरेचजण सध्या तयार होत असले तरी अजून २५ टक्केही काम झालेले नाही. पेरणीजागर सारखे प्रकार गोव्यातून नामशेष होत चालले आहेत. पण अजून कोणी त्यासंबंधी व्यवस्थित निरीक्षणे प्रसिद्ध केलेली नाहीत.

लोकमहाभारतांची 'गंडुल्या काणी' ही स्थानिक परिभाषेतील कथा. पण तिचाही अभ्यास झालेला नाही. डॉ. रा. चिं ढेरे यांनी 'लोकसरिता'ला लिहिलेल्या प्रस्तावनेत म्हटले आहे, गोमंतकाच्या लोकसंस्कृतीचा अभ्यास हा समग्र दक्षिणेच्या संस्कृतीच्या अभ्यासासाठी नितांत आवश्यक आहे. महाराष्ट्राशी भौगोलिक, भाषिक, सांस्कृतिकदृष्ट्या अविभाज्य संबंध असलेला गोमांतक हा प्रदेश केरळ-कर्नाटकाशीही जवळीक साधणारा आहे. तो परशुरामभूमीचा घटक असल्याने रेणुका- परशुराम-मिथकातून आंध्राशीही जवळीक राखणारा आहे. परशुरामभूमीत ज्या सप्र कोकणांचा समावेश होता, त्यात अपरांतबरोबर गोमंतक आणि केरळ या दोहोंना आणि केरळ या दोहोंना महत्त्वाचे स्थान आहे. 'सह्याद्री खंड' या संस्कृत ग्रंथात अपरांतातील रामक्षेत्र किंवा इषुताक्षेत्र यासह गोमंतकातील अनेक क्षेत्रांचा महिमा जसा गायलेला आहे तसाच माहूर या आंध्र सीमेवरील रेणुका क्षेत्राचाही महिमा आहे.'

गोव्यातील लोकसाहित्याच्या शास्त्रशुद्ध आणि गंभीरस्वरूपी अभ्यासाला खरी सुरुवात झाली ती १९९० नंतर. म्हैसूर विद्यापीठातून लोकसाहित्याच्या अभ्यासाचे शास्त्रीय प्रशिक्षण घेऊन जयंती नायक या क्षेत्रात उतरल्या आणि गोव्यातील या विषयाची परिमाणेच त्यांनी बदलून टाकली. अज्ञात असलेले लोकसाहित्याचे कित्येक प्रकार (उदा. बनवड, रामशेवड, दिनलो (स्त्री नृत्य) कातयो, लोकगाथा इत्यादी) त्यांनी अभ्यासकांसमोर आणले. संकलनाचे कार्य करतानाच या विषयाच्या अंतरंगात शिरून त्याचे मूळ आणि कूळ जाणून घेण्याचा प्रयत्न केला. आतापर्यंतच्या संशोधकांनी या विषयाच्या संदर्भात मांडलेली मते त्यांनी खोडून काढली. धालो, शिमग्यासारखे उत्सव हे फावल्या वेळी समाजाचे मनोरंजन करण्यासाठी नाचले जाणारे खेळ अशी या आधीच्या विद्वानांनी केलेली विधाने चुकीची आहेत हे त्यांनी दाखवून दिले. गोव्याची मूळ संस्कृती ही मातृसत्ताक असून

अज्ञात लोकसाहित्यात सापडणारे आदिबंध त्यांनी उलगडून दाखवले.

लोकसाहित्यावरची दहा पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. परिसंवादांत सादर केलेले १५ निबंध, तसेच २५ अभ्यासपूर्ण लेख. 'आमोणे- एक लोकजीण', 'पेडणेचो दसरो', 'लोकबिंब', 'कोकणी लोककाणयो', वगैरे महत्त्वाची पुस्तके आहेत. 'कलेंची बनवड' या पुस्तकात त्यांनी गोव्यातील कुळंबी जमातीच्या मरण प्रथेशी निगडीत बनवड या प्रकाराचा अभ्यास मांडलेला आहे. 'आमोणे-एक लोकजीण' या ग्रंथात 'आमोणे' या एकाच गावातील लोकजीवनाचा विविधांगी अभ्यास जयंती नायक यांनी केलेला आहे. 'आमोणे' प्रमाणेच 'पेडणेचो दसरो' या पुस्तकात लोक उत्सवाचा सखोल अभ्यास सापडतो. 'लोकबिंब' हे लोकसाहित्याच्या तात्त्विक आणि सैद्धांतिक लिखाणातून जन्माला आलेले पुस्तक आहे.

जयंती नायक यांचा अभ्यास हा फक्त गोव्याच्या सीमेमध्ये मर्यादित नसून, कोकणी लोकवेदाचा मागोवा घेत त्या केरळ- कर्नाटकातही पोहोचल्या आहेत.

या क्षेत्रात कार्य करायला हव्या त्या प्रमाणात नवीन पिढी पुढे येत नाही, ही त्यांची खंत आहे. नवीन पिढीने आधुनिकतेच्या वेगवान प्रवाहात नष्ट होत चाललेल्या परंपरांच्या ठसठशीत खुणा पुसल्या जाण्यापूर्वी त्यांची सूक्ष्म नोंद करून व्यापक अभ्यास करायला हवा. खेडेकर म्हणतात, 'धेंपो विश्वस्त मंडळाने या कामाचे महत्त्व ओळखून पांडुरंग फळदेसाई यांना शिष्यवृत्ती देऊन गौरविलेले आहे. मानवी संशोधन खात्यामार्फत केंद्र सरकारच्या वतीनेही या कार्यासाठी दरवर्षी शिष्यवृत्त्या दिल्या जातात. कोकणी अकादमीने तर या कामासाठी आपला स्वतंत्र विभागच स्थापन केला आहे.'

दक्षिणेच्या सांस्कृतिक परंपरेची महासत्ये लोकवेदाच्या शोधयात्रेतून प्रकाशमान झाली तर मोठा सांस्कृतिक ठेवाच आपल्याला गवसणार आहे.

(महाराष्ट्र टाइम्सवरून)

लोकवाङ्मयाचे दर्शन घडवणारी ढंगदार पुस्तके

रिवणावायली मुंगी

राजन गवस
किंमत : १३०रु.

खसखशीचा मळा

द. ता. भोसले
किंमत : ७५रु.

मोरावळा

शिवाजी सावंत
किंमत : ६०रु.

मालनगाथा : २

इंदिरा संत
किंमत : २००रु.

पुरस्कार

पिठाच्या गिरणीत सर्व लेखन केले : मोरे

मेहता पब्लिशिंग हाऊस फाऊंडेशनच्या वतीने देण्यात येणारे 'स्वामी'कार रणजित देसाई पुरस्कार ह. मो. मराठे (मधलं पान), महादेव मोरे (चेहऱ्यामागचे चेहरे) आणि सौ. उमा कुलकर्णी (महाश्वेता - मूळ लेखिका सुधा मूर्ती) यांना डॉ. आनंद यादव यांच्या हस्ते कोल्हापूर येथे प्रदान करण्यात आले.

''लिहिण्यासाठी प्रसन्न वेळ, फुले, अगरबत्ती अशा वातावरणाची मला कधी गरज भासली नाही. पायातून उंदीर, घुशी पळत आहेत, अशा वातावरणात पिठाच्या गिरणीत बसून मी माझे सर्व लेखन करीत आलो...'' ज्येष्ठ साहित्यिक महादेव मोरे बोलत होते, तेव्हा त्यांच्या निवेदनातील निरागसपणाला आणि प्रांजळपणाला रसिक उपस्थितांची मनापासून दाद दिली.

श्री. मोरे म्हणाले, ''रणजित देसाई यांच्या नावाचा पुरस्कार मिळाल्याची बातमी मी वाचली, त्याचवेळी वाळुसरा पडलेल्या जित्राबावर बुरंगाट पडल्यासारखी माझी अवस्था झाली. कारण १९९० पासून म्हणजे गेली बारा वर्षे माझ्यावर पुरस्काराचं बुरंगाट पडलं नव्हतं, ते रणजित देसाई यांच्या नावाच्या पुरस्कारामुळं पडलं.''

ते म्हणाले, ''मी सकाळी आठ वाजल्यापासून रात्री साडेआठ वाजेपर्यंत पिठाच्या गिरणीत काम करतो. मधल्या गिऱ्हाईक नसलेल्या काळात लिहितो. पिठाच्या गिरणीत आलेल्या चेहऱ्यामागचे हे चेहरे आहेत. मी टॅक्सी ड्रायव्हिंग केलं, गॅरेज चालवलं, मिरचीच्या चटणीचं काम केलं. हे सगळं करीत असताना लिहीत राहिलो. गिरणीत रात्री लिहीत बसतो, त्यावेळी पायातून उंदीर, घुशी पळत असतात. त्याचा मला कधीही व्यत्यय आला नाही. एकदा तर आढ्यावरून उंदीर तोंडात धरलेला साप माझ्या टेबलावर पडला. असे कितीतरी अनुभव आहेत. अत:करण भरून येतं, अस्वस्थ वाटतं, त्यावेळी लिहीत असतो. त्यामुळे मला कधीही त्यासाठी विशिष्ट वातावरणाची गरज भासली नाही.''

ह. मो. मराठे यांनी पत्रकारितेच्या प्रवासाबद्दल सांगितले. ते म्हणाले, ''१९६५ मध्ये कोल्हापुरात दीनानाथ भोसले यांच्या 'इंद्रधनुष्य' दैनिकात पत्रकारितेची सुरवात केली. त्यानंतर पुढारी, किर्लोस्कर, लोकप्रभा, घरदार, मार्मिक, नवशक्ती असा प्रवास झाला. हा प्रवास बेशिस्त, विचित्र वळणाचा आहे. तो यशस्वी किंवा सफल नाही; पण रंजक आहे. पुष्पक प्रकाशनाचे ह. ल. निपुणगे यांनी या प्रवासाचे पुस्तक प्रसिद्ध केले. आधी त्याचे नाव 'न्यूज प्रिंट' असे ठेवले होते, नंतर बदलून ते 'मधलं पान' असे करण्यात आले.''

फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. आनंद यादव म्हणाले, ''कोल्हापुरात साहित्यिक, सांस्कृतिक केंद्र

उभे राहावे, या उद्देशाने रणजित देसाई पुरस्काराचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.''

मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. कमलाकर दीक्षित यांनी फाऊंडेशनची माहिती दिली. सौ. सुप्रिया वकील यांनी सूत्रसंचालन केले.

शांतिलाल भंडारी यांना नानावटी फेलोशिप

पुणे विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागातर्फे देण्यात येणारी नानावटी फेलोशिप शांतिलाल भंडारी यांना प्राप्त झाली आहे. जैन धर्म आणि तत्त्वज्ञान यांच्या विशेष अभ्यासासाठी ही फेलोशिप आहे.

डॉ. यू. म. पठाण यांना साहित्य अकादमीची फेलोशिप

६३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. यू. म. पठाण यांना यंदाची साहित्य अकादमीची 'सीनियर फेलोशिप' मिळाली आहे. ही फेलोशिप मार्च २००३ पासून दोन वर्षांसाठी असून दरमहा बारा हजार रुपयांची आहे. डॉ. पठाण 'मुस्लिम संतांचं मराठी वाङ्मयाला योगदान' या विषयावर संशोधन करतील. आजवर डॉ. पठाण यांची ३५ मराठी पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पंचवीस विद्यार्थी पीएच,डी.झाले आहेत. १९९९ साली महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाची जीवनगौरववृत्ती त्यांना मिळाली होती. त्याचप्रमाणे तुलनात्मक साहित्याच्या अध्ययनासाठी दिल्ली येथील के. के. बिर्ला फाउंडेशनची फेलोशिपही त्यांना मिळाली होती. 'मराठी-फारसी अनुबंध : भाषिक, वाङ्मयीन व सांस्कृतिक' हा त्यांचा ग्रंथ लवकरच प्रसिद्ध होणार आहे.

प्रा. पुरुषोत्तम पाटील यांना 'मुक्ताई' पुरस्कार

चेतश्री प्रकाशनातर्फे देण्यात येणारा 'मुक्ताई पुरस्कार' या वर्षी धुळे येथील प्रा. पुरुषोत्तम पाटील यांच्या 'तुकारामाची काठी' या पुस्तकाला जाहीर झाला आहे. प्राचार्य मा. य. वैद्य, 'अनुष्टुभ'चे संपादक प्रा. गो. तु. पाटील, प्रा. अनुराधा पोतदार यांच्या समितीने ही निवड केली. एक जानेवारी ते ३१ डिसेंबर या काळात प्रकाशित झालेल्या वैचारिक समीक्षात्मक पुस्तकांसाठी हा पुरस्कार देण्यात येतो.

इंद्रजित भालेराव यांना हरिश्चंद्र दुःखी पुरस्कार

''इंद्रजित भालेराव हा मातीत आनंदजनलोक पहाणारा कवी आहे. स्त्रीदु:ख असो की कुणब्याचं दु:ख असो; दु:ख मार्मिकपणे हेरणं इंद्रजितला उत्तमपणे साधलं आहे. त्यामुळे दु:खाचे वेगवेगळे आवाज त्याच्या कवितेतून ऐकायला येतात. आणि म्हणूनच भालेरावांची संपूर्ण कविता सांस्कृतिक दस्तऐवज आहे.''असे पेरा काव्यसंग्रहाला हरिश्चंद्र दु:खी काव्यपुरस्कार देताना विजया राजाध्यक्ष यांनी जालना येथ म्हटले. इंद्रजितच्या कवितेने मराठी कवितेला ताजेपणा दिला. बहिणाबाई चौधरी यांचे खोल संस्कार यांच्या कवितेवर अधिक्याने असून इंद्रजितच्या भारावून टाकणाऱ्या कवितेविषयी मला निरंतर उत्कट प्रेम वाटत आले आहे. 'हंगाम' आणि 'माझ्या कवितेला यावा शेणामातीचा दर्वळ' ह्या इंद्रजितच्या दोन कविता विजयाबाईंनी विशेषकरून साहित्यप्रेमींपुढे ठेवल्या. 'पीकपाणी', 'कुळंबिणीची कहाणी' आणि 'आम्ही काबाडाचे धनी' - या कवितासंग्रहाचे संदर्भ देऊन डॉ. विजयाबाईंनी इंद्रजित भालेराव यांच्या कवितेमधील ऊर्जास्थाने

उलगडून दाखवली.

कुसुमाग्रजांच्या नावाने कोणतीही गोष्ट मिळणे हे माझे भाग्य - विंदा

'कुसुमाग्रज' या नावातच अशी जादू आहे की, त्यांच्याशी संबंधित असणारी कोणतीही गोष्ट मिळणे हे मी माझे भाग्य समजतो, असे उद्‌गार कवी विंदा करंदीकर यांनी काढले.

महाराष्ट्र कला निकेतन व कुसुमाग्रज प्रतिष्ठान वितरित पारितोषिक स्वीकारल्यानंतर विंदा आपल्या भावना व्यक्त करीत होते. कुसुमाग्रजांच्या नावाने यापूर्वी आपल्याला १९८७ साली मराठवाडा मराठी साहित्य संघाचा तर १९९३ साली 'जनस्थान' हा पुरस्कार मिळाला असून आज हा तिसरा पुरस्कार मिळत असल्याबद्दल विंदांनी आयोजक संस्थांचे आभार मानले. संगीतकार यशवंत देव, गीतकार शांताराम नांदगावकर, कविवर्य नारायण सुर्वे, कवयित्री वंदना विटणकर, वात्रटिकाकार रामदास फुटाणे, कवयित्री कौमुदी गोडबोले, अभिनेते अजय वढावकर, कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे विश्वस्त अनंत कुबल तसेच विसुभाऊ बापट, शैलेश प्रभावळकर, यांचाही शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आमदार प्रमोद नवलकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या स्मरणिकेचे प्रकाशन किरण शांताराम यांच्या हस्ते झाले. 'कविश्रेष्ठ कुसुमाग्रज...एक नक्षत्र' हा विशेष कार्यक्रमही यावेळी झाला.

शाळा, महाविद्यालयात असताना कविता पाठ केल्या तरी चारपैकी एकच कडवे लक्षात राहायचे. त्यामुळे सर्व कवींना विनंती करावीशी वाटते की, त्यांनी एका कडव्याची एक कविता करावी आणि चार कडव्यांच्या चार वेगळ्या कविता कराव्यात, असे यावेळी उपहासाने बोलताना आमदार प्रमोद नवलकर म्हणाले. आम्ही जे ४०० ओळींत लिहितो ते ही कवी मंडळी चार ओळींत लिहितात.

आजच्या दृष्टीने 'चर्मकार इन ट्रान्झीशन' महत्त्वाचे - कुमार केतकर

विज्ञान आणि ज्ञानाला कोणत्याच सीमारेषा नसतात. त्यामुळेच इंग्रजांनी आपल्या देशातील लहान-लहान जातींचा सखोल अभ्यास केला. डॉ. बाळकृष्ण भोसले यांचे 'चर्मकार इन ट्रान्झीशन' हे पुस्तक त्यादृष्टीने महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन दैनिक 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, एखाद्या जातीचा अभ्यास करताना तो स्वत:चे स्वत्व न घालवता नि:पक्षपातीपणे करावा लागतो आणि ते भान डॉ. भोसले यांनी सांभाळले आहे.

मुंबई विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. प्रल्हाद जोगदंड म्हणाले की, चर्मकार समाजाच्या व्युत्पत्तीपासून स्थित्यंतरापर्यंतची माहिती या पुस्तकात दिलेली आहे. नवबौद्ध व चर्मकार समाजासह इतर बौद्धेतर दलित जाती यांच्यातील संबंधांबद्दलही त्यांनी तपशीलाने चर्चा केली आहे. चर्मकार समाजाला धर्मांध लोकांकडे ढकलण्याचा प्रयत्न होत असताना या समाजाला आंबेडकरी आंदोलनाकडे आणण्याचे काम हे पुस्तक करेल, असा विश्वास यांनी व्यक्त केला.

डॉ. प्र. न. जोशी पुरस्कार

स्नेहवर्धन प्रकाशनतर्फे डॉ. प्र. न. जोशी यांच्या व अन्य व्यक्तींच्या नावाने अनेक पुरस्कार

देण्यात येतात. दि. २५ एप्रिल रोजी प्रा. राम शेवाळकर यांच्या हस्ते त्यांचे वितरण करण्यात आले.

१. डॉ. प्र. न. जोशी संतमित्र ग्रंथ पुरस्कार - बाळासाहेब जांगले (अमृतधारा)

२. डॉ. प्र. न. जोशी विज्ञानमित्र ग्रंथ पुरस्कार- डॉ. दिलीप देवधर (आनंदी वृद्धत्व)

३. डॉ. द. दि. पुंडे समीक्षामित्र ग्रंथ पुरस्कार - डॉ. अरुण टिकेकर (कालमीमांसा)

४. संजीवनी मराठे साहित्यसखी ग्रंथ पुरस्कार - डॉ. अरुणा ढेरे (विश्वास रामजी घोले)

५. डॉ. घोले परिवार प्रकाशक पुरस्कार - राजहंस प्रकाशन पुणे.

मुक्ताई पुरस्कार

अंमळनेरच्या 'चेतश्री-प्रकाशना' तर्फे दरवर्षी' देण्यात येणारा 'मुक्ताई-पुरस्कार' यंदा महाराष्ट्रातील नामवंत कवी/लेखक प्रा. पुरुषोत्तम पाटील यांच्या 'तुकारामाची काठी' या पुस्तकास प्राप्त झाला आहे.

परीक्षक म्हणून प्राचार्य मा. य. वैद्य, प्रा. गो. तु. पाटील (संपादक 'अनुष्टुभ'), प्रा. अनुराधा पोतदार यांनी काम पाहिले.

प्रा. रेणापूरकर यांना कालिदास पुरस्कार

गुलबर्गा येथे नूतन विद्यालय संस्थेच्या महाविद्यालयातर्फे गीताजयंती निमित्त विविध कार्यक्रम झाले. 'गीता पठणा'च्या स्पर्धा झाल्या. त्यादिवशी विशेष कार्यक्रम म्हणून गुलबर्गा येथील एक श्रेष्ठ कवि प्रा. हरिश्चंद्र रेणापूरकर यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. रेणापूरकरांचा नुकताच केन्द्रशासना तर्फे कालिदास पुरस्कार प्रदान करून नवी दिल्ली येथे प्रमाणपत्र व रु.२५हजार देऊन सन्मान करण्यात आला. गुलबर्गा येथील संस्थेचे अध्यक्ष. प्रा. भाऊसाहेब देऊळगावकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन प्रा. रेणापूरकरांचा सत्कार करण्यात आला.

आयडियल वाचक पुरस्कार समारंभ

ग्रंथप्रसारक शरद जोशी यांना 'संत नामदेव' पुरस्कार वितरित.

डोंबिवली येथील एक ज्येष्ठ ग्रंथप्रसारक शरद जोशी यांना संतसाहित्याचे गाढे अभ्यासक व लेखक श्री. वामनराव देशपांडे पुरस्कृत संत नामदेव पुरस्कार दादर (मुंबई २८) येथे झालेल्या एका कार्यक्रमात देण्यात आला.

दादरच्या आयडिअल बुक डेपोच्या वतीने दरवर्षी उत्तम वाचक पुरस्कार दिला जातो. यंदाचा हा पुरस्कार वितरण समारंभ दादरच्या धुरू हॉलमध्ये नुकताच पार पडला. लोकसत्तेचे संपादक कुमार केतकर यांच्या हस्ते प्रथम पुरस्कार (दहा ग्रॅमची सुवर्णमुद्रा) सांगलीच्या सदानंद रघुनाथ कदम यांना देण्यात आला. प्रसिद्ध कवी अनुक्रमे डॉ. उर्मिला चाकूरकर (पैठण) व प्रा. अल्ताफ खान (सावंतवाडी) देण्यात आले. याच कार्यक्रमात शरद जोशी यांना त्यांच्या ग्रंथप्रसार कार्यासाठी संत नामदेव पुरस्कार (शाल, श्रीफळ व रू.१०००/- रोख) केतकरांच्या हस्ते देण्यात आला.

क्लबचे सभासद व्हा आणि क्लबची पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा!

टी बुक क्लब ११ - सभासद फी ५०रु.

या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!

जगप्रसिद्ध इंग्रजी कादंबऱ्यांचे सरस मराठी अनुवाद

या बुक क्लबचे सभासद **५० रु.** भरून होता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासद झाल्यास ही पुस्तके आपण निम्म्या किंमतीत मिळवू शकता. या क्लबमधील पुस्तके जसजशी प्रकाशित होतील, तसतशी आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.**ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.** या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. पुढच्या बुक क्लबसाठी नव्याने फी भरावी लागेल. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके २५% सवलतीत मिळू शकतील.

आतापर्यंतच्या बुक क्लबमधील उपलब्ध पुस्तकांसाठी ५० रु. भरा आणि कोणतीही सहा किंवा सर्व पुस्तके एकाच वेळी निम्म्या किंमतीत मिळवा. सहा पुस्तकांसाठी ५० रु. व सर्व पुस्तकांसाठी एकूण पोस्टेज १०० रु. फक्त!

पुस्तकाचे नाव	मूळ लेखक	अनुवाद	किंमत	सभासदांना
नॉट विदाऊट माय डॉटर	बेट्टी महमूदी	लीना सोहोनी	२००रु.	१००रु.
द टर्मिनल मॅन	मायकेल क्रायटन	अरुण मांडे	१२०रु.	६०रु.
डिस्क्लोजर	मायकेल क्रायटन	माधव कर्वे	२२०रु.	११०रु.
काँगो	मायकेल क्रायटन	अरुण मांडे	१६०रु.	८०रु.
ज्युरॅसिक पार्क	मायकेल क्रायटन	प्रमोद जोगळेकर	२५०रु.	१२५रु.
द लॉस्ट वर्ल्ड	मायकेल क्रायटन	प्रमोद जोगळेकर	२२०रु.	११०रु.
नॉट अ पेनी मोअर, नॉट अ पेनी लेस	जेफ्री आर्चर	अंजनी नरवणे	१२०रु.	६०रु.
टू कट् अ लाँग स्टोरी शॉर्ट	जेफ्री आर्चर	लीना सोहनी	१८०रु.	९०रु.
द फोर्थ के	मारिओ पुझो	वनिता सावंत	२००रु.	१००रु.
द लास्ट डॉन	मारिओ पुझो	अनिल काळे	३५०रु.	१७५रु.
द हॉट झोन	रिचर्ड प्रेस्टन	प्रमोद जोगळेकर	२००रु.	१००रु.
साक्षी	सरला बार्नबस	स. वा. मुळे	१९०रु.	९५रु.
हितगुज	कॅरन पेन	वृन्दा दाभोळकर	२००रु.	१००रु.
द फिस्ट ऑफ गॉड	फ्रेडरिक फोरसीथ	अनिल काळे	३००रु.	१५०रु.
क्रोमोझोम - ६	रॉबिन कुक	वैशाली जोशी	३५०रु.	१७५रु.
द मिरॅकल	आयर्विंग वॅलेस	जयवंत चुनेकर	३००रु.	१५०रु.
डॉक्टर झिवागो	बोरिस पास्तरनाक	आशा कर्दळे	२५०रु.	१२५रु.
फिअर इज द की	ॲलिस्टर मॅक्लीन	अशोक पाध्ये	१६०रु.	८०रु.
द सिस्टरहुड	कॉलिन फोर्बस्	अंजनी नरवणे	२५०रु.	१२५रु.
कन्टेजन	डॉ. रॉबिन कुक	प्रमोद जोगळेकर	२४०रु.	१२०रु.
३००१द फायनल ओडिसी	आर्थर सी. क्लार्क	प्रमोद जोगळेकर	१६०रु.	८०रु.

बालनगरी

बालमित्रांनो,

मेहता मराठी ग्रंथजगत मध्ये आता खास तुमच्यासाठी 'बालनगरी' हा विभाग सुरु करत आहोत.

त्यामध्ये तुम्हाला छान छान चित्रकथा वाचायला मिळतील. मनोरंजक माहिती, कोडी, चुटके, वगैरे नवलाईच्या गोष्टीही असतील. तुमच्या आनंदात त्यामुळे नक्कीच भर पडेल. त्याचबरोबर आम्ही काही स्पर्धाही लावणार आहोत. त्यात भाग घ्या आणि बक्षीसही मिळवा. आम्ही तुमच्यासाठी खूप छान छान पुस्तके छापत असतो. तीही तुम्ही वाचायला हवी आपल्या आईबाबांना ती आणायला सांगा.

'बालनगरी' मध्ये आम्ही तुमचे साहित्यही छापणार आहो. तुम्हाला आवडलेला एक हास्यविनोद पोस्टकार्डावर लिहून पाठवा त्याबरोबर तुमचे पूर्ण नाव,पत्ता,इयत्ता,शाळा सर्व व्यवस्थित लिहा,आम्हाला आवडलेले विनोद आम्ही बालनगरीत छापू.आहे की नाही मज्जा?

संपादक

मुलांचे विनोद

आजोबा : आमच्या बंटीला व्हिटॅमिनच्या गोळ्या डॉक्टरांनी घ्यायला सांगितल्या आहेत. द्या पाहू व्हिटॅमिनच्या गोळ्या.

दुकानदार : कोणते देऊ? ए, बी, सी?

आजोबा : कोणत्याही द्या हो. अजून आमच्या बंटीला ए बी सी डी येतंय कुठे?

सुरभि खांडेकर
मुधोळकर पेठ, अमरावती.
७ वी, समर्थ हायस्कूल.

बाई : सरिता, सांग बघू दळवळणाचे मार्ग कोणते?

सरिता : टिळक रोड, लक्ष्मी रोड, बाजीराव रोड

बाई : अगं, हे तू कुठे शिकलीस?

सरिता : बाई इथून मी दळण घेऊन वळणावळणाने घरी जाते!

कोमल बांदेकर
श्रीवर्धन अपार्टमेंटस १५/३ दुसरा मजला, हिंगणे खुर्द पुणे - ५१
४ थी, ज्ञानगंगा प्रशाला.

राहूल : आई, मी आज ६ डास मारले. त्यातले ३ पुरुष होते व ३ स्त्रिया होत्या.

आई : आँ? तुला कसे कळले की ३ पुरुष होते व ३ स्त्रिया होत्या ते?

राहूल : सोप्प आहे ! ३ सिगरेटच्या पाकीटापाशी होते तर ३ आरशापाशी!

प्रशांत दांडेकर
८४ शुक्रवार पेठ, पुणे २
७ वी नू. म. वि. प्रशाला.

हत्ती : मुंगीताई एवढ्या लगबगीने कोठे चाललीस?

मुंगी : मी अगदी घाईत आहे. बाजारात जाऊन मी कापड आणणार व शिंप्याकडे ड्रेस शिवायला टाकणार.

हत्ती : मग माझंही काम कर ना ! तुझ्या ड्रेसमधल्या उरलेल्या कापडात माझेही कपडे शिवायला सांग !

रूचिता सपार
सर्व्हे नं.११/बी ४ ई विणकर सोसायटी, पद्मावती पुणे
३ री.,विद्याविकास विद्यालय

◆ मे २००३
◆ वर्ष तिसरे
◆ अंक पाचवा

मेहता मराठी ग्रंथजगत

संपादक : सुनील मेहता

कार्यकारी संपादक : शंकर सारडा

संपादन सहाय्य : सुनीता दांडेकर

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस

संपादक-मुद्रक-प्रकाशक :
सुनील मेहता,
१२१६ सदाशिव पेठ,
धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०.
फोन : ४४७६९२४
फॅक्स : ०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com

मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*

— *अनुक्रमणिका* —

संपादकीय -	२
साहित्यवार्ता	५
अ. भा. मराठी प्रकाशक संघ वार्ता	२५
पुस्तक परिचय	
स्वप्नाकडून सत्याकडे:माधुरी शानभाग	२६
चेहऱ्यामागचे चेहरे : महादेव मोरे	३०
द गोल्डन गेट : अनु.अशोक पाध्ये	३३
ग्रामीण बोलीचा शब्दकोश:द.ता.भोसले	३७
फुले आणि काटे	३९
पुरस्कार	४४
बालनगरी	
शिकारी शंभू	५०
गंमत जंमत	५४
मुलांचे विनोद	५५
अद्भुत गोष्टी	५९
वाचकांचा प्रतिसाद	६०
स्टार योजना	६१

वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.
३ व पाच वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

अमर चित्र कथा

अनेक वर्षे दुर्मिळ असलेली मुलांच्या खास आवडीची चित्रमय पुस्तके आता उपलब्ध !

संपादक : अनंत पै

२६० रुपयांचा संच २२० रुपयांत !
पोस्टेज २५रु.

राजा हरिश्चंद्र

प्रामाणिकपणा व सत्यनिष्ठा याची शिकवण देणारी महान कथा.



२०रु.

अभिमन्यु

अफाट शौर्यानं झुंजलेला कुमार अभिमन्यु.

२०रु.

विक्रमादित्य

पराक्रमाचे प्रतिक व भारताचे भूषण ठरलेला महापराक्रमी राजा.

२०रु.

भीष्म

सर्व संकटांना धैर्यानं तोंड देणाऱ्या भीष्माची कहाणी.

२०रु.

अमर चित्र कथा

२६० रुपयांचा संच २२० रुपयांत !
पोस्टेज २५रु.

संपादक : अनंत पै

पृथ्वीराज चौहान

महाप्रतापी राजा पृथ्वीराज चौहानची रोमहर्षक कथा.



२०रु.

सम्राट अशोक

जगाच्या इतिहासातही तोड नाही अशा राजाची कहाणी.



२०रु.

छत्रपती शिवाजी

अभिमानाने छाती फुगावी अशी मराठ्यांच्या अद्वितीय राजाची कहाणी.



२०रु.

राणा प्रताप

स्वातंत्र्याची महान प्रेरणा देणारा राणा प्रताप.

२०रु.

अमर चित्र कथा

२६० रुपयांचा संच २२० रुपयांत !
पोस्टेज २५रु.

संपादक : अनंत पै

प्रल्हाद

लहान वयात सर्वश्रेष्ठ भक्त ठरलेल्या प्रल्हादाची कथा



२५रु.

कर्ण

आयुष्यभर संघर्षमय जीवन जगणाऱ्या महारथी कर्णाची कथा.



२५रु.

श्रीरामाची कथा

अनंतकाळ मानवाला स्फूर्ती देणारी श्रीरामाची कथा



२५रु.

चाणक्य

भारताच्या प्रबल एकछत्री साम्राज्याचा निर्माता.



२५रु.

वस्तूची निर्मिती कशी होते?

अद्‌भुत गोष्टी

ॲटम बॉंब
विशिष्ट परिस्थितीत
वस्तूंचे रुपांतर उर्जेत
होऊ शकते या
तत्त्वावर अणुबॉंब
निर्माण करण्यात आला.

अल्फा अणूंना
प्रचंड गतिजन्य उर्जा
दिली, आणि ऊर्जेच्या मार्गात
मोठा अडथळा उभा केला तर
काय होईल?

ते अडथळे त्या ऊर्जेतून
प्रोटॉन्स, इलेक्ट्रान्स
(आणि ॲंटिप्रोटॉन्स आणि
पॉझीट्रॉन्स) निर्माण करतील.
त्याचा पुढचा टप्पा म्हणजे
खाण्यास योग्य असे घन पदार्थ
निर्माण करणे.
पण त्याबाबत अजून संशोधन
चालू आहे.

प्रति,

वाचकांचा प्रतिसाद

मा. संपादक,
मेहता मराठी ग्रंथजगत.
सप्रेम नमस्कार.

या धकाधकीच्या जीवनातही आपला 'मेहता मराठी ग्रंथ जगत' चा अंक अकोला जिल्ह्यातील पातूर तालुक्यामध्ये असलेल्या एका छोट्याशा गावात जेव्हा येऊन धडकतो तेव्हा खरोखरच मनस्वी आनंद वाटतो. अंक पाठविल्याबद्दल प्रथमत: आपले हार्दिक आभार!

मेहता मराठी ग्रंथजगतचे आकर्षक मन वेधून घेणारे मुखपृष्ठ वाचकाचे प्रथमत: लक्ष केंद्रित करते. आपण वाचकाच्या मनाची जिज्ञासा पूर्ण करणारी आणि वाचकाला एकदम वेगळाच अनुभव देणाऱ्या अनेक पुस्तकांचा परिचय करून देता. त्यामुळे आमच्या मनात भरच पडत असते. तसेच अनेक उपयुक्त साहित्यवार्ता व मराठी साहित्यातीलच नव्हे तर संपूर्ण विश्वासातील ग्रंथविश्वच जणू तुम्ही आमच्यासमोर ठेवत असता. ज्या पुस्तकांचा उपयोग आम्हाला संदर्भग्रंथ म्हणून देखील करता येतो. आपला प्रत्येक अंक संग्रही ठेवावा असाच असतो. आपल्या या नवख्या प्रवासास मन:पूर्वक शुभेच्छा. धन्यवाद.

प्रा. अशोक इंगळे, मु. हिंगणा, पो. दिग्रस बु. ता. पातूर, जि. अकोला

मा. संपादक,
मेहता मराठी ग्रंथजगत, पुणे ३०
स.न. वि. वि.

अलेक्झांड्रिया लायब्ररीचे पुनरुज्जीवन' हे एप्रिल २००३ अंकातील संपादकीय गुणग्राही व मार्मिक वाटले खलिफा ओमरने अलेक्झांड्रिया येथील पुस्तक संग्रह नष्ट करताना जे तर्क लढविले होते ते आजही तर्कशास्त्रातील हेत्वाभासाचे उदाहरण म्हणून दिले जाते. ओमरने म्हटले होते की जर अलेक्झांड्रिया येथील ग्रंथामध्ये कुराणात सांगितलेलेच असेल तर ते ग्रंथ अनावश्यक आहेत. जर त्यामध्ये कुराणात नसलेले सांगितले असेल तर ते ग्रंथ पाखंडी आहेत. तेथील पुस्तकात कुराणात सांगितलेले असेल अगर नसेल. एकतर ती सर्व पुस्तके अनावश्यक अगर पाखंडी आहेत. या कारणाने ती जाळून टाकणेच योग्य आहे. या पार्श्वभूमीवर लायब्ररीचे पुनरुज्जीवन हा काळाने उगविलेला सूडच होय.

रा.व्य जोशी, कोणार्क अपार्टमेंट्स, वडवली सेक्शन, अंबरनाथ (पू) ४२१५०१

खास आकर्षक योजना

स्टार योजना

सिल्व्हर स्टार गट - **५०० रुपयांच्या मूळ किमतीची खरेदी करणाऱ्या ग्राहकाला २०० रुपयांची पुस्तके मोफत !**

गोल्डन स्टार गट - **१००० रुपयांच्या मूळ किमतीची खरेदी करणाऱ्या ग्राहकाला ४५० रुपयांची पुस्तके मोफत !**

डायमंड स्टार गट - **२००० रुपयांच्या मूळ किमतीची खरेदी करणाऱ्या ग्राहकाला १००० रुपयांची पुस्तके मोफत !**

मुदत फक्त ३१ मे २००३!

मोफत पुस्तके फक्त स्टॉक असेपर्यंतच!

मोफत पुस्तकांची यादी

रणजित देसाई

माझा गाव	१५०/-
प्रतिक्षा	८०/-
शेकरा	६०/-
मोरपंखी सावल्या	६०/-
कातळ	९०/-
प्रपात	९०/-
संचित	६०/-

वि. स. खांडेकर

गडकरी : व्यक्ती आणि वाङ्मय	२००/-
वामन मल्हार जोशी : व्यक्ती विचार	८०/-
आगरकर : व्यक्ती आणि विचार	८०/-
पाकळ्या	७०/-
दवबिंदू	६०/-
प्रीतीचा शोध	१५०/-
प्रसाद	१४०/-

आनंद यादव

भूमिकन्या	९०/-
झाडवाटा	९०/-
सैनिक हो, तुमच्यासाठी	२०/-
स्पर्शकमळे	१००/-

निरंजन घाटे

निसर्गपुत्र	८०/-
वेध पर्यावरणाचा	१५०/-
आरोग्य वेध	४५/-
शरीर वेध	४५/-
तंत्रज्ञानाचे विश्व	
संगणक, यंत्रमानव	२०/-
मानवी युद्धसाधने, लेझर्स	२०/-
माहिती प्रसार साधने, दळणवळण/वाहतूक	२०/-
ज्ञानदीप	७०/-
आत्मवेध (विज्ञान)	१२०/-
खेळ आणि विज्ञान	४०/-

ओशो

एक एक पाऊल ८०/-

वि. स. वाळिंबे

एडविना आणि नेहरु
: कॅथरिन क्लेमंट २५०/-
कथा ही दिवावादळाची १००/-
जयहिंद आझाद हिंद १००/-
आज इथे : उद्या तिथे ४५/-

तसलिमा नासरिन

फेरा ७०/-
निर्बाचित कलाम १५०/-

शान्ता शेळके

आंधळ्याचे डोळे : नॉर्मन कुझिन्स १५०/-
पावसाआधीचा पाऊस ९०/-
निमित्तानिमित्ताने: राजीव गांधी ७०/-
संस्मरणे ८०/-
रंगरेषा ८०/-

उमा कुलकर्णी

परिशोध : एस. एल. भैरप्पा १००/-
चिदंबर रहस्य : के. पी. पूर्णचंद्र तेजस्वी १२५/-
मायामृग : के.पी.पूर्णचंद्र तेजस्वी १००/-
तंतू : एस. एल. भैरप्पा ४५०/-

माधवी देसाई

नियती ६०/-
शुक्रचांदणी १००/-

अंजनी नरवणे

अणसार : वर्षा अडालजा १८०/-
सागरतीरी : ध्रुव भट ८०/-
वडवाई २००/-
गहाण पडलेली टेकडी: मारिया श्रेस १२०/-
द सिस्टरहुड : कॉलिन फोर्बस् २५०/-
खाना-खजाना १००/-

शिवाजी सावंत

शेलका साज १२०/-
कांचनकण ७०/-
मोरावळा ६०/-

इतर लेखकांची

आजचा मेनू ११०/-
ड्रिंक्स व कॉकटेल्स १२५/-
द लास्ट डॉन : मारिओ पुझो ३५०/-
डॉ.झिवागो : बोरिस पास्तरनाक २५०/-
३००१ द फायनल ओडिसी १६०/-
साक्षी : सरला बार्नबस १९०/-
डिस्क्लोजर : मायकेल क्रायटन २२०/-
काँगो : मायकेल क्रायटन १६०/-
एकदाच अशी रात्र येते
: रॉजर डॉनलॉन ७०/-
कोमा : रॉबिन कुक ९०/-
संस्कार : यू. आर. अनंतमूर्ती ८०/-
मंदिरा : सुनील गंगोपाध्याय १२५/-
सुंदरबनच्या जंगलात ६०/-
हितगुज : संपा. कॅरेन पेन २००/-
टोकियोच्या नभांगणातील
चमकत्या तारका १८०/-
मुंबई... मुंबई! : विक्रम चंद्र १५०/-
द्वंद्व : विजयदान देथा १५०/-
चिनी अक्षर साहित्य १००/-
शिदोरी ५०/-
सेंट्रल बस स्टेशन १००/-
दिग्विजय (नेपोलियन बोनापार्ट) ४००/-
रोदँ २९०/-
संचित ५०/-
चितेवरच्या कळ्या १३०/-
फॅक्टरी गेट १५०/-
मूल ९०/-
काशभट ७०/-
प्रवाहातील तारु १२५/-
गाजव्यथा १००/-
इथे फुलांना मरण जन्मता ८०/-
शापित राजहंस २५०/-
अंधाराचे वारसदार १००/-
काट्यावरची पोटं १००/-
मुक्तिशोध-यात्रा १७०/-
दक्षिणरंग २५०/-
पैलू १४०/-

मद्य नव्हे, हे मंतरलेले पाणी १२०/-
आठवणींचा मोहर १६०/-
उद्याच्या सुंदर दिवसासाठी १००/-
अवती भवती १२०/-
शोध सुखाचा ८०/-
हिमकोंदणातील हिरा ८०/-
आय्. सी. ८१४ अपहरणाचे
१७३ तास १२०/-
कारगिलनामा १६०/-
शिलंगणाचं सोनं २५०/-
नागरिक १५०/-
भारतीय राजकारणातील गुन्हेगारी
व भ्रष्टाचार २००/-
ख्यातनाम इतिहासकार १५०/-
बिग इगोज,स्मॉल मेन ८०/-
शतदा प्रेम करावे १२५/-
व्यथित मनानं सांगावसं
वाटतं की... १००/-
डायाना आणि चार्ल्स १३०/-
सेक्स, स्कॉच, अँड स्कॉलरशिप १२५/-
प्रवाहातील पक्षी ७५/-
बोन्साय ७५/-
अज्ञाताचे विज्ञान (विज्ञान) १३०/-
व्हर्च्युअल रिॲलिटी (विज्ञान) १५०/-
रिवणावायली मुंगी १३०/-
कावळे आणि माणसं १००/-
शिवार १००/-
झोका १००/-
उत्तरार्ध १३०/-
मनस्विनी १२०/-
खसखशीचा मळा ७५/-
मुळे आणि पाळे ८०/-
कालिंदीच्या तीरावरती ७५/-
शेष-अवशेष १२५/-
इस्कोट ७०/-
लोलक १००/-
गॉरगोनाईज ५०/-
पोस्ट-मार्टेम १२५/-
नक्षत्रांच्या प्रकाशात १००/-

कातरवेळ ७०/-
गुंता सोडविताना ११०/-
वि.स. खांडेकरांची कविता १३०/-
विज्ञानातून लोकसंख्या शिक्षण ६०/-
जिज्ञासेतून विज्ञान ३५/-
पेशीबद्ध जीवन
: एक निरंतर प्रवास ५०/-
शास्त्र-गंमत जत्रेत चौकस चिंगी ७०/-
विश्वातील सजीवसृष्टी ६०/-
माहितीचे महामार्ग ७०/-
परिक्षानळीतील जंगले ४५/-
नवचैतन्याचा झरा ६५/-
नवी पिढी नवे राज्य ६०/-
नामशेष झालेले प्राणी ५०/-
सागरातील नवलाई ८०/-
शरीरातील विविध संस्था -
फुप्फुसे, हृदय, मेंदू २५/-
अंत:स्राव, गर्भाशय, जठर २५/-
स्नायू, अस्थि २५/-
सुखद मातृत्व ७०/-
शर्यती स्पर्धा खेळ १००/-
आपण आणि आपले आरोग्य ७०/-
व्यवस्थापनाची गीता ४०/-
बुद्धिबळाचा ओनामा ८०/-
काळ चालला पुढे ४०/-
यशाचा कानमंत्र ५०/-
करोडोंचे सामान्यज्ञान ८०/-
कोटीमोलाची प्रश्नोत्तरे ७०/-
अमृतधारा-संतकाव्यातील वेचे ७०/-
मराठी व्याकरण परिचय ८०/-
मराठी निबंध ज्योती ८०/-
स्वामी : एक शोध १५०/-
मराठी नाटक : नव्या दिशा
नवी वळणे ७०/-
मराठी ग्रामीण साहित्य
परिसर आणि प्रवाह ४०/-
दलित साहित्य :
प्रवाह आणि प्रतिक्रिया १००/-
स्त्रीसुधारणा विषयक
मराठी नाट्यलेखन २००/-